**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. प्रकाश बिनसाळे)**

ॲड निरंजन डावखरे : सभापती महोदय, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसबंधात चर्चा सुरु होत असतांना सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाही. त्यामुळे सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात यावी अशी सर्व विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची मागणी आहे.

**तालिका सभापती (श्री. प्रकाश बिनसाळे )** : सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.00 ते 11.10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे )**

**पृ.शी.:** राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती

**मु.शी.:** राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, जयंत प्र.पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, आनंद ठाकूर, अशोक ऊर्फ भाई जगताप, किरण पावसकर, सुभाष झांबड, रामहरी रुपनवर, जगन्नाथ शिंदे, जयवंतराव जाधव, शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

( प्रस्ताव पुनः प्रस्तुत झाला )

**तालिका सभापती** : नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेस सुरुवात होत आहे. माननीय विरोधी पक्ष नेता हे ऑन लेग होते, त्यांनी त्यांचे भाषण पुढे सुरु करावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे आपण सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित केली होती. जो दहा मिनिटांचा वेळ वाया गेला आहे तो वेळ सत्ताधारी पक्षातून वजा करुन आम्हाला देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती या विषयावर आम्ही नियम 260 अन्वये प्रस्ताव आणलेला आहे, त्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यातील महानगरांमध्ये देखील महिला आणि मुलींचे जीवन असुरक्षित झाले आहे. नौपाडा येथून भिंवडीकडे जाण्यासाठी दोन मुली एका रिक्षामध्ये बसल्या. रिक्षाचालकाच्या संशयास्पद हालचालीमुळे आणि त्याच्या असभ्य हावभावामुळे त्या मुलींनी चालत्या रिक्षामधून उडी मारली. त्या मुली मरता मरत वाचल्या. अशा अनेक घटना मुंबईसह अन्य मोठ्या महानगरांमध्ये घडत असल्याचे आपणास पहावयास मिळत आहे.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय, आघाडी सरकार सत्तेवर असताना राज्यात कायदा आणि सुव्यवस्था नाही असे जे आरोप करीत होते ते आज सत्तेमध्ये असून त्या गोष्टीस चार महिन्यांचा कालावधी उलटून गेलेला आहे. परंतु या चार महिन्यात कायदा आणि सुव्यवस्थेचे वाभाडे निघाल्याचे चित्र आपण पाहात आहोत.

सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्री (ग्रामीण) येथे उपस्थित आहेत. मी त्यांच्याच जिल्ह्यातील घटना सांगतो. राज्यातील पोलीस तरी सुरक्षित आहेत काय, असा प्रश्न निर्माण झालेला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव पोलीस स्टेशनमधील पोलीस नाईक श्री.दीपक कोलते डयुटीवर असताना ज्या आरोपीला पकडण्यासाठी गेले त्या आरोपींनी दीपक कोलते यांचा निर्घृण खून केला. ही घटना दिनांक 3 फेब्रुवारी, 2015 रोजीची आहे. दीपक कोलतेच्या कुटुंबाना भेटण्यासाठी माननीय मंत्री गेले होते, मी देखील गेलो होतो. या घटनेतील मुख्य आरोपी पिन्या ऊर्फ सूरज भारत कापसे आणि बाप्पा विघने आहेत. ही घटना घडल्यानंतर आजही त्या आरोपींना पकडण्यात आलेले नाही. ही घटना कशी घडली ते सांगतो. दीपक कोलते याच आरोपींना पडण्यासाठी गेले असताना त्यांचा रस्त्यामध्ये अॅक्सीडेंन्ट होऊन त्यांचा हात फ्रॅक्चर झाला. डॉक्टरांनी त्यांच्या हाताला प्लास्टर बांधले आणि 10 दिवसांची विश्रांती घेण्यासाठी सांगितले. त्याप्रमाणे दीपक कोलते यांनी पोलीस स्टेशनमध्ये अर्ज करुन 10 दिवसांची वैद्यकीय रजा मंजूर करुन घेतली. त्यानंतर ऑफीसला जॉईन होण्यापूर्वी त्यांनी डॉक्टरला हात दाखविला. डॉक्टरने त्यांना अजून 15 दिवसांची विश्रांती घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी पोलीस स्टेशनला तसा अर्ज केला, परंतु त्यांच्या वरिष्ठांनी अर्ज नामंजूर करुन त्यांना डयुटीवर जॉईन होण्यास सांगितले. दीपक कोलते कामावर गेले त्याच दिवशी आरोपी पिन्या उर्फ सूरज भारत कापसे आणि बाप्पा विघने यांना पकडण्यासाठी त्यांना आणि त्यांच्या एका सहकाऱ्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली. मी त्यांच्या कुटुंबाना भेटलो, त्यावेळी त्यांनी सांगितले की, कोलते आणि त्याचे सहकारी आरोपींना पकडण्यासाठी येत आहेत हे आरोपींना कसे समजले ? याचा अर्थ कोलते आणि त्याचे सहकारी आरोपींना पकडण्यासाठी जात आहेत हे पोलीस स्टेशनमधील अन्य लोकांना माहीत होते. मी येथे जबाबदारीपूर्वक बोलतो की, पोलीस स्टेशनमधील कोणीतरी कर्मचारी मोबाईलवर



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

आरोपींच्या संपर्कात होते, त्यामुळे कोलतेचा खून झालेला आहे. या दोन आरोपींवर अहमदनगर आणि बीड जिल्ह्यमध्ये अनेक गुन्हे आहेत. या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार पिन्या ऊर्फ सूरज कापसे याचे वडील अंतर्वेली खुर्द गावात भाजपचे विद्यमान सरपंच आहेत. आरोपीला राजाश्रय मिळत आहे आणि त्याचे वडील गावाचे प्रमुख आहेत म्हणून त्याला अटक होत नाही अशी चर्चा लोकांमध्ये आहे. दीपक कोलतेचा डयुटीवर असताना खून झाला आहे. एखादा पोलीस अधिकारी डयुटीवर आपले कर्तव्य बजावत असताना त्याचे अशाप्रकारे निधन झाले तर आपण त्यास "शहीद" म्हणतो. वाळूची गुन्हेगारी संपविण्यासाठी दीपक कोलते शहीद झालेले आहेत. पोलिसांचे मारेकरी सापडत नसतील तर पोलीसांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होईल आणि ती होणे योग्य नाही.

सभापती महोदय, दीपक कोलतेच्या कुटुंबाला "विशेष बाब" म्हणून 25 लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात यावे अशी माझी आपल्यामार्फत सरकारला विनंती आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी दीपक कोलते यांच्या पत्नीला शब्द दिलेला आहे. आम्ही देखील त्यांच्यासाठी काही तरी करु. त्यांच्या पत्नीने अनुकंपा तत्वावर पोलीस विभागात नोकरी करण्यास नकार दिलेला आहे. ज्या खात्याने माझ्या नव-याचा बळी घेतला, डयुटीवर काम करीत असताना मृत्यू आला, अशा खात्यात मला नोकरी करायची नाही असे त्यांनी डोळ्यात पाणी आणून सांगितले. आपणास "विशेष बाब" म्हणून नोकरी द्यायची असेल तर अन्य कोणत्याही विभागात नोकरी द्यावी परंतु पोलीस विभागात नोकरी देऊ नये. आपण त्यांची विनंती मान्य करावी अशी माझी कळकळीची विनंती आहे.

सभापती महोदय, याच विषयावर खालच्या सभागृहात चर्चा झाली आणि त्या चर्चेस माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. आपण टी.व्ही.लावला किंवा वर्तमानपत्र उघडले तर रोज कुठे ना कुठे महिलांवर किंवा मुलींवर अत्याचार घडल्याचे दिसून येते. हिंगोली जिल्ह्यातील नायगाव तालुक्यातील आश्रमशाळेमध्ये अल्पवयीन मूकबधीर मुलींचे लैंगिक शोषण झाले. या घटनेमध्ये आश्रमशाळेतील सेवकाने मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची बाब उघड झाली आहे. आजही या प्रकरणाचा तपास पारदर्शक आणि योग्य पद्धतीने होत नाही म्हणून तेथील ग्रामस्थांनी मोर्चे काढले.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

कोलतेंच्या हत्येच्या तपासाबाबत असेच होत असेल, आश्रमशाळेतील अल्पवयीन मुलींवर करण्यात येणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या तपासाच्या बाबतीत असेच होत असेल तर कोणाकडे दाद मागायची, असा सर्वसामान्य गोरगरिबांना प्रश्न पडला आहे. राज्यमंत्री महोदय, आपल्या पक्षाचे सरकार आल्यानंतर गेल्या चार महिन्यांच्या काळात आपण किती चांगले काम केले हे जरी उत्तरात सांगितले तरी या घटनांमुळे आम्ही त्यावर कसा विश्वास ठेवायचा ? मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावे लागेल की, गेल्या चार महिन्यात सरकारच्या दुर्लक्षितपणामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे बिघडली आहे.

सभापती महोदय, लातूर येथे गनिमी कावा संघटनेच्या लोकांनी एका प्रेमी युगुलाला कशाप्रकारे बेदम मारहाण केली या बाबतची व्हिडीओ क्लीप कदाचित सर्वांनी बघितली असेल. लातूर हा माझ्या जिल्ह्याच्या शेजारील जिल्हा आहे. महोदय, मी ती व्हिडीओ क्लीप पाहिल्यानंतर मला खूप चीड आली आणि असे वाटले की, आपण सर्वकाही सोडून द्यावे. ती क्लीप बघितल्यानंतर मला प्रश्न पडला की, राज्यात काय सुरु आहे ? ती क्लीप बघितल्यानंतर मला वाटले की, आपणही कायदा हातात घ्यावा. मला वाटते ज्यांनी ती क्लीप बघितली असेल त्या सर्वांना हेच वाटले असेल. महोदय, पोलिसांचे अपत्य असलेल्या एका प्रेमी युगुलाला गनिमी कावा संघटनेच्या लोकांनी बेदम मारहाण केली. या प्रकरणी संबंधितांवर गुन्हा नोंदविला गेला, त्यांना अटक झाली आणि नंतर जामीनही मिळाला. महोदय, अशा संघटना पुढे येऊन व्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालत असतील आणि एका प्रेमी युगुलाला मरेपर्यंत मारहाण करीत असतील तर, खरोखरच हे कायद्याचे राज्य आहे काय, असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. सन्माननीय गृह राज्य मंत्र्यांच्या नावामध्ये 'राम' आहे. मी त्यांना विचारु इच्छितो की, खरोखरच हे 'राम राज्य' आहे काय ? राज्यात गनिमी कावा संघटनेसारख्या अनेक संघटना आहेत. त्या संघटना वेगवेगळ्या क्षेत्रात स्वतःची दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. माझी या चर्चेच्या माध्यमातून मागणी आहे की, अशा सर्व संघटनांवर सरकारने बंदी घातली पाहिजे.

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील वाळीत प्रकरण आपल्याला माहीत आहे. या विषयी सभागृहात चर्चा झाली तेव्हा माननीय गृह राज्यमंत्र्यांनी त्याला उत्तर दिले होते. त्यांनी या

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

ठिकाणी जे वक्तव्य केले त्याचे मी स्वागत करतो. रायगडसारखी घटना या राज्यात पुन्हा घडू नये यासाठी सरकार जो कायदा करु पाहत आहे तो पुरेसा असेल तर ठीक आहे. परंतु या संदर्भात कायदा करुनही जर वाळीत टाकण्याच्या घटना थांबणार नसतील तर त्यासाठी राज्य सरकार आणि गृह विभागाला वेगळी पावले उचलावी लागतील.

सभापती महोदय, काल-परवा सामाजिक कार्यकर्ते श्री.भारत पाटणकर साहेबांना पुन्हा एकदा धमकी देण्यात आली. त्यांना धमकी देत असताना त्यांच्या लेखाचे काही अंक सुध्दा त्यांना पाठविण्यात आले. महोदय, डॉ.नरेंद्र दाभोळकर आणि कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांना हत्येपूर्वी जशी धमकी आली होती तशाच प्रकारची धमकी सामाजिक कार्यकर्ते श्री.भारत पाटणकर यांना आली आहे. या दोन हत्या झाल्यानंतर व सर्व गोष्टींचा ऊहापोह झाल्यानंतर, श्री.भारत पाटणकर यांना पोलीस संरक्षण दिल्याचे आम्ही फक्त टी.व्ही.वर बघितले, वर्तमानपत्रातून वाचले. पण दोन सामाजिक कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्यानंतर त्यांच्या मारेकऱ्यांना अद्यापपर्यंत अटक होत नाही. अशा हत्या घडवून आणणारे लोक कायदा व सुव्यवस्थेला न घाबरता पुन्हा एकदा सामाजिक कार्यकर्त्याला धमकी देत असतील तर गृह राज्यमंत्री महोदय, आपण ह्दयावर हात ठेवून विचार करावा की, या राज्यात खरोखरच कायदा व सुव्यवस्थेचे राज्य आहे काय ?

महोदय, राज्यात सत्तांतर झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी गृह विभागाची जबाबदारी स्वीकारली. त्यावेळी त्यांनी मोठ्यामोठ्या गोष्टी करणार असल्याचे सांगितल्या. तद्‌नंतर वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल इनडोअर स्टेडियमवर दिनांक 20 डिसेंबर, 2014 रोजी 'एआयबी-नॉक आऊट' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमातील अश्लील वक्तव्यांची व्हिडीओ क्लीप यु-ट्युबवर कशी फिरली आणि कोणी कोणी बघितली हे माहीत नाही. परंतु त्या कार्यक्रमामध्ये नामवंत निर्माते, नामवंत दिग्दर्शक, बॉलीवूडमधील नामवंत कलाकार यांचा सहभाग होता. त्या कार्यक्रमात या लोकांनी अश्लीलतेचे आणि बीभत्सपणाने सादरीकरण केले. या कार्यक्रमाला परवानगी कशी मिळाली या बाबत राज्य सरकार आणि गृह विभागाकडे विचारणा केली होती. महोदय, त्या कार्यक्रमाला कॉमेडी शोच्या नावाखाली परवानगी दिली होती. त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कार्यक्रमातून करमणूक होणार होती म्हणून सरकारने त्या कार्यक्रमावर कोणताही कर लावला

..3..



श्री.धनंजय मुंडे....

नाही. परंतु त्या कंपनीने उक्त कार्यक्रमासाठी तिकिटाचा दर प्रती तिकीट 4 हजार रुपये ठेवला व ती तिकिटे ऑनलाईन विकण्यात आली. असे करुन त्या कंपनीने राज्य सरकारला फसविले. उलट त्या कंपनीने सरकारला सांगितले की, हा कार्यक्रम कॉमेडी शो असल्यामुळे या कार्यक्रमावर कोणताही कर लावण्याची गरज नाही. महोदय, माझी विनंती आहे की, आयएबी-नॉक आऊटसारखा कार्यक्रम राज्यात पुन्हा आयोजित करण्यात येऊ नये. जर अशा प्रकारचा कार्यक्रम होणार असेल तर त्यांना सेन्सॉर बोर्डची परवानगी घेणे बंधनकारक केले पाहिजे. मराठी किंवा हिंदी भाषेचा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी सेन्सॉर बोर्डची परवानगी घ्यावी लागते. तो चित्रपट 'यु' दर्जाचा आहे की 'ए' दर्जाचा आहे या बाबतचे प्रमाणपत्र सेन्सॉर बोर्डकडून दिले जाते. मी विचारु इच्छितो की, निर्माते, दिग्दर्शक, अभिनेते, अभिनेत्री यांच्याकडून अश्लील भाषेत शिवीगाळ करणारा कार्यक्रम हा करमणुकीचा होऊ शकतो काय, तसेच अशा कार्यक्रमासाठी सेन्सॉर बोर्डची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही काय ? महोदय, मला खंत या गोष्टीची आहे की, आम्ही या प्रकरणी संबंधितांवर काही तरी कारवाई करावी असे पोटतिडीकीने सांगून सुध्दा त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही. आयोजकांनी त्या कार्यक्रमाचे तिकीट 4 हजार रुपये दराने विकल्याचे सर्व पुरावे उपलब्ध आहेत. परंतु अद्यापपर्यंत या कंपनीवर कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही. मी विचारु इच्छितो की, सरकारला या कंपनीला का मदत करावीशी वाटली ? त्या कंपनीने असे कोणते मोठे काम केले होते, त्या कंपनीने अशी कोणती करमणूक केली होती, हे उत्तराच्या भाषणातून स्पष्ट झाले पाहिजे. महोदय, सदरहू कंपनीच्या अधिकाऱ्यांवर आणि त्याच बरोबर या कार्यक्रमात ज्यांनी अश्लील सादरीकरण केले त्यांच्यावर गृह विभागाने कायदेशीर कारवाई केली पाहिजे, अशी मी मागणी करतो. तसेच इतके दिवस संबंधितांवर कारवाई का केली नाही याचे सुध्दा उत्तर दिले पाहिजे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेमध्ये उत्तर देताना सांगितले की, रियल इस्टेटमध्ये अंडरवर्ल्डचा पैसा आला आहे. महोदय, 1995 ते 1997 या काळात एखाद्या कुटुंबाने

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

भव्य स्वरूपात लग्न सोहळा आयोजित केला तर त्या कुटुंबाला अंडरवर्ल्डकडून खंडणीसाठी फोन यायचे. परंतु तद्‌नंतर म्हणजे 1999 मध्ये आमच्या पक्षाचे आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर

..4..



श्री.धनंजय मुंडे....

संपूर्ण अंडरवर्ल्ड संपविण्याचे काम त्या सरकारने केले, याचा मला नक्कीच अभिमान आहे. त्यावेळी बुलेट टु बुलेट पध्दत होती. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटेजी, आपण खाली बसून मला उद्देशून काही बोलू नका. मी 1999 चे सांगत आहे. त्यावेळी माझे काका गृह मंत्री नव्हते. मी आरोप करणे योग्य नाही. आपण त्यांना काय काय त्रास दिला हे मला सांगायला लावू नका.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

आमच्या काकांना आपल्या पक्षाने किती त्रास दिला या संदर्भात मी जाहीरपणे बोलायला लागलो तर वेळ कमी पडेल. मला त्या गोष्टीवर बोलायचे नाही.

**तालिका सभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आपण माझ्याकडे बघून बोलावे. आपण आपापसात बोलू नये. सभागृहाचा वेळ वाया जात आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मला कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा करायची आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांच्या भावना समजू शकतो. पहिल्यांदा त्यांना मुंडे साहेबांनीच विधानपरिषदेवर आणले आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना मंत्री केले तर मला आनंदच होणार आहे.

सभापती महोदय, आम्ही गुन्हेगाराचे संरक्षण काढून घेतले, आम्ही ज्या गुन्हेगाराचे संरक्षण काढले, त्याचा अंडरवर्ल्डशी संबंध होता. अंडरवर्ल्डशी संबंध असलेला श्री. अनिल जयसिंघानी हा आंतरराष्ट्रीय कुविख्यात बुकी आहे. आबा राज्याचे गृहमंत्री होते, त्यांनी ही परिस्थिती पाहिल्यानंतर श्री. अनिल जयसिंघानीचे संरक्षण काढले, त्याला संरक्षण दिले नाही. हे सरकार सत्तेत आल्यानंतर पुन्हा आंतरराष्ट्रीय बुकी म्हणून श्री. अनिल जयसिंघानीला संरक्षण देण्यात आले. त्याला ते सरंक्षण कोणत्या कारणासाठी दिले ? आता क्रिकेटच्या वर्ल्ड कपच्या मॅचेस सुरू असताना संरक्षण दिले गेले आहे. क्रिकेटच्या वर्ल्ड कपच्या मॅचेस सुरूअसताना आंतरराष्ट्रीय बुकी गृह खात्याकडे संरक्षण मागतो. तुमच्याकडे तो आंतरराष्ट्रीय बुकी असल्याच्या नोंदी आहेत. आंतरराष्ट्रीय बुकीला तुम्ही संरक्षण देता. श्री. अनिल जयसिंघानी याने काय केले की, तुम्हाला त्याला संरक्षण द्यावेसे वाटले ? मी जबाबदारीपूर्वक सांगतो. विधानसभेतील सत्ताधारी पक्षाचे एक सन्माननीय सदस्य आहेत. ते विधानसभा सभागृहातील सन्माननीय सदस्य असल्यामुळे मी त्यांचे नाव घेत नाही. श्री. अनिल जयसिंघानीला संरक्षण मिळाले तेव्हापासून सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य माननीय मुख्यमंत्र्यांना त्याचे संरक्षण काढून घ्या असे सांगत आहेत. परंतु, त्याचे संरक्षण काढून घेतले जात नाही. श्री. अनिल जयसिंघानीला संरक्षण का दिले याचे उत्तर सभागृहाला मिळाले पाहिजे. सभागृहाला पाहिजे असेल तर एका इंग्रजी वर्तमानपत्राकडे श्री. अनिल जयसिंघानीच्या काही

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

व्हिडिओ क्लिप्स, वॉईस क्लिप्स आहेत. तो पोलिसांकडून देण्यात आलेल्या संरक्षणाच्या मदतीने इतर छोट्या मोठ्या बुकींवर धाड टाकतो. पोलिसांच्या संरक्षणामुळे त्याने त्यांच्यावर फार मोठी दहशत बसविली आहे. आपले असे कायदा व सुव्यवस्थेचे राज्य आहे. आपल्याकडे कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात काय उत्तर आहे ? तुमच्याच पक्षातील एका सन्माननीय सदस्याकडून याचे संरक्षण काढून घेण्यासाठी 4 पत्रे देण्यात आली आहे. परंतु, त्याचे संरक्षण काढून घेतले जात नाही. पोलिसांच्या संरक्षणामुळे पोलिसांचा ताफा सोबत घेऊन तो इतर बुकींवर धाडी टाकत असल्याच्या व्हिडिओ क्लिप्स सोशल मीडियावर फिरत आहेत. कुविख्यात आंतरराष्ट्रीय बुकीला पोलिसांकडून संरक्षण देण्यात आले आहे. पोलिसांची दहशत दुसऱ्या बुकींवर टाकून तो त्यांचा धंदा बंद करतो आणि त्याच्या व्हिडिओ क्लिप्स करून तोच सोशल मीडियावर टाकत आहे. पोलीस संरक्षण घेऊन त्याची एवढी मजल होत असेल तर माननीय गृह राज्यमंत्री प्रा. राम शिंदे यांच्या राज्यात कायद्याचे राज्य आहे का ? आता 2 महिने उलटून गेले आहेत. वेळोवेळी संरक्षण काढून घ्या असे सांगितले गेले आहे. परंतु संरक्षण काढून घेतले जात नाही. आपण सभागृहात सांगावे की, कोणत्या आधारे त्याला संरक्षण दिले आहे. त्याच्या जीवाला असा काय धोका होता, आपल्याला त्याची एवढी काय काळजी होती की त्याला संरक्षण दिले आहे ? कॉ. पानसरे सारखे विचारांना बांधलेले लोक फिरायला गेले असता दिवसाढवळ्या त्यांना गोळ्या घालून मारले जाते. मात्र त्यांना संरक्षण देण्याच्या संदर्भात कधी विचार केला जात नाही. परंतु, अशा आंतरराष्ट्रीय बुकीला पोलीस संरक्षण दिले जाते. आपण त्याला संरक्षण का देता, याचे उत्तर मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, सभागृहात एक लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. आम्हाला त्यातून अपेक्षित उत्तर मिळाले नाही. एमडी नावाच्या नवीन अंमली पदार्थाच्या संदर्भातील तो विषय होता. मेफेड्रॉन नावाचा अंमली पदार्थाच्या सेवानामुळे 10 जणांचा जीव गेला आहे. मुंबईपासून सर्व महानगरांमध्ये सातारा, कोल्हापूर, सांगली येथे तो अंमली पदार्थ मिळत आहे. मी सांगितले की, त्या पदार्थाचे रॉ मटेरिअल गुजरातमधून येते, तो महाराष्ट्रात बनविला जातो, महाराष्ट्रात त्याचा पुरवठा होतो आणि तो तेथून गोव्याला पुरविला जातो. मरिन लाईन्स पोलीस स्टेशनमधील एका लॉकरमध्ये 12 किलो एमडी हा अंमली पदार्थ सापडला. राज्य सरकारने या संदर्भात एका



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

कॉन्स्टेबलला निलंबित केले. पोलीस निरीक्षकाला पोलीस स्टेशनमध्ये 12 किलो एमडी पदार्थ आहे हे माहीत नाही का ? पोलीस निरीक्षकाची या संदर्भात फक्त बदली केली गेली. या पोलीस स्टेशनमध्ये भरपूर धंदा झाला, आता दुसऱ्या पोलीस स्टेशमध्ये कर असे वाटत असल्यामुळे बदली केली गेली. माझा प्रश्न असा आहे की, या संदर्भात सदर एरियाच्या डीसीपीवर कारवाई का केली नाही ? एखादा माणूस थोडा चुकला तर त्याच्या वरिष्ठावर कारवाई करतात. मग एमडी या अंमली पदार्थाशी संबंधित असलेल्या कॉन्स्टेबलच्या अधिकाऱ्याच्या बाबतीत असे का घडत नाही ? आम्हाला या संदर्भातील उत्तरात अपेक्षित आहे. जीवघेणा अंमली पदार्थ पोलीस स्टेशनकडून विक्री केला जात असेल आणि पोलीस संबंधित असतील तर पोलिसांवर सुध्दा कारवाई केली पाहिजे.

सभापती महोदय, अहमदनगर जिल्ह्यातील एक घटना समोर आली आहे. अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील बांबोरी गावामध्ये घडलेली ही घटना आहे. लातूरची गनिमी कावा संघटना, जी कोणती असेल, कदाचित येथे ती संघटना जरी नसली तरी .... 20-25 मुलांच्या टोळक्याने असे कृत्य केले की, या घटनेमुळे संपूर्ण राज्याला मान खाली घालावी लागली. मी सभागृहात नियम 289 अन्वये सभागृहातील बाकीचे सर्व कामकाज बाजूला सारून यावर चर्चा घ्यावी अशी मागणी केली होती. परंतु, आमची मागणी मान्य झाली नाही. त्यामुळे मला कायदा व सुव्यवस्थेच्या माध्यमातून हा विषय सभागृहापुढे मांडावा लागत आहे. एक मुलगा आणि एक मुलगी आपल्या इच्छेने लग्न करण्यासाठी पळून गेले. ती मुले बालके होती. त्यांना परत बोलावून मुलाला मुलाच्या घरी व मुलीला मुलीच्या घरी नेण्यात आले. दुसऱ्या दिवशी सकाळी 25-30 जणांनी मुलाला मरेपर्यंत मारले, त्याच्या वडिलांना मारले, नग्न केले. मुलाच्या आईलाही नग्न करण्याचा प्रयत्न झाला. मुलाची बहीण गरोदर असूनही तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. सदर घटनेची व्हिडिओ क्लिप सव्वा तासाची असून बांबोरी येथील एका वार्ताहराने ती घटना रेकॉर्ड केली. हे पोलिसांना समजले त्यावेळी वार्ताहराला सुध्दा पकडले गेले. पुन्हा याबाबत वेगळा विषय होऊ नये म्हणून त्याच्याकडून चित्रफित घेण्यात आली. खरी घटना चित्रफितीमध्ये आहे. बांबोरीत मुलाची नग्नपणे धींड काढली जाते हे कोणाला शोभणारे आहे का, आपल्याला शोभणारे आहे का ? माननीय राज्यमंत्री तरूण, तडफदार प्राध्यापक आहेत, मंत्री झाल्यानंतर त्यांना काय झाले हे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

समजत नाही. त्यांना तरी ही शोभणारे आहे का ? कोणतेही मंत्री ईश्वराला साक्षी ठेवून मी गोपनीयता पाळीन आणि कोणाशीही ममत्व बाळगणार नाही, असे शपथ घेताना म्हणतात. संजय दत्त याच्या फर्लोच्या बाबत काय झाले हे सर्वांना माहीत आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे........

असे का वाटते, ममत्त्व का बाळगले गेले ? संजय दत्त यांना पहिली फर्लो रजा मिळाल्यानंतर याच गृह राज्यमंत्री महोदयांनी टी.व्ही.वर अशी बाईट दिली होती की, "ही देण्यात आलेली फर्लो रजा बेकायदेशीर आहे, अशी कशी रजा देता येईल, संजय दत्त राज्य सरकारचा जावई आहे का ?" राज्यमंत्री महोदयांची दोन्ही स्टेटमेंटस् माझ्याकडे रेकॉर्ड केलेली आहेत. पहिली फर्लो रजा संपल्यानंतर संजय दत्त आणि त्यांचे वकील जेलमध्ये पोहोचण्याच्या अगोदर एका नॅशनल न्यूज चॅनलला गृह राज्यमंत्री महोदयांनी असा बाईट दिला की, "तुरुंग अधिकाऱ्यांकडे फर्लो रजेचा अर्ज पेंडिंग असेल तर असे गृहीत धरावे की, पुढील 15 दिवस फर्लो रजा मिळते." आता मला राज्यमंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, तुम्ही ममत्व दाखविले नाही का ? आपण मंत्री पदाची घेतलेली शपथ मोडली नाही का ? एखाद्या कायदा व सुव्यवस्था टिकवणाऱ्या गोष्टीबाबत हे घडले असते तर आम्ही नक्कीच मंत्री महोदयांचे अभिनंदन केले असते, संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या पाठीशी उभा राहिला असता. कोणाची फर्लो रजा, कोण व्यक्ती आहे, याच्याशी आम्हाला काही देणेघेणे नाही. मला एवढेच निदर्शनास आणावयाचे आहे की, मंत्री महोदयांनी एखाद्याविषयी ममत्त्व का बाळगले आणि जर बाळगले असेल तर त्यांनी घेतलेली मंत्री पदाची शपथ त्यांनी मोडली नाही का ? जेलमधून आरोपीचे वकील असे स्टेटमेंट देतात की, हमने ऐसा सुना कि मंत्री जी ने ऐसा कहा कि अगर आपका ॲप्लिकेशन पेंडिंग है तो समझ लो फर्लो कंटिन्यू हो गई. मंत्री जी ने कहा तो हमने ऑर्डर समझ लिया, फिर हम निकल आए. हजर होण्यासाठी गेलेला एखादा गुन्हेगार, ज्याला शिक्षा झाली आहे, तो मंत्री महोदयांच्या एका स्टेटमेंटमुळे जेलमधून माघारी जातो, मंत्री महोदयांनी दिलेली बाईट आणि त्याव्दारे केलेले स्टेटमेंट ऑर्डर समजून जेलमधून परत माघारी जातो, हे संपूर्ण महाराष्ट्राने बघितले नाही, महाराष्ट्राची मान खाली गेली नाही, मंत्री महोदयांनी ममत्त्व बाळगल्याने त्यांनी घेतलेली शपथ मोडली नाही ?

सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्री प्रा.राम शिंदे आमच्या जिल्ह्यात आले. तत्कालीन गृह मंत्री स्व.आर.आर.पाटील यांनी माजलगाव येथे एक पोलीस स्टेशन मंजूर केले होते. त्या पोलीस स्टेशनच्या भूमीपुजनासाठी मंत्री महोदय माजलगाव येथे आले होते. त्या कार्यक्रमात त्यांनी एक स्टेटमेंट केले आणि त्याव्दारे पैसे खाण्याच्या बाबतीत सल्ला दिला. माझ्याकडे त्या

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे........

स्टेटमेंटची सुध्दा व्हिडिओ क्लिप आहे. ते असे म्हणाले की, "कुणाला कोठे पैसे खायचे असतील तर जरूर खा, माझ्या खात्यात खाऊ नका." असे कसे होऊ शकते ? आमची सत्ता असताना आम्हाला बेजबाबदार ठरवून तुम्ही जनतेची फसवणूक केली, सत्तेवर आला आणि तुम्ही किती चांगले आणि साव आहात, हे दाखविण्याचा आपला सावपणा आम्हाला त्यामधून दिसून आला. परंतु, ज्याला आपण हात दाखवून अवलक्षण म्हणतो, तशीच गत आपली झाली.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तरात एक गोष्ट आली. ते उत्तर ऐकून मला आश्चर्याचा धक्का बसला. ते असे म्हणाले की, "पूर्वी कन्व्हीक्शन रेट 17 टक्के होता, तो आता 28 टक्के झाला आहे." माझ्या मनात असा प्रश्न निर्माण झाला की, तीन महिन्यात असे काय घडले, किती फास्ट ट्रॅक कोर्ट महाराष्ट्रामध्ये सुरु झाले की, ज्यामुळे कन्व्हीक्शन रेट एवढा वाढला. परंतु, जेव्हा ही आकडेवारी तपासली त्यावेळी लक्षात आले की, ते जो कन्व्हीक्शन रेट दाखवीत आहेत, ती एक दिशाभूल आहे. एखाद्याने सिग्नल तोडला की, त्याला पावती द्यायची, कोर्टात पाठवायचे, तेथे त्याला 100 रुपये दंड होतो, तो भरला म्हणजे झाले कन्व्हीक्शन. एखादा ट्रिपलसिट पकडला गेला, त्याला पावती द्यायची, कोर्टात पाठवायचे, तेथे त्याला 200 रुपये दंड होतो, तो भरला म्हणजे झाले कन्व्हीक्शन. एखादी काळीपिवळी गाडी पकडली, त्याला पावती द्यायची, कोर्टात पाठवायचे, तेथे त्याला 300 रुपये दंड होतो, तो भरला म्हणजे झाले कन्व्हीक्शन. मी जबाबदारीने सांगतो की, मुख्यमंत्री महोदय देत असलेली गेल्या तीन महिन्यातील कन्व्हीक्शन रेटबाबतची आकडेवारी अशा प्रकारची आहे. मी अजूनही त्यांना अशी विनंती करीन की, त्यांनी खरी माहिती सांगावी. वर्षानुवर्षे जी प्रकरणे सुरु आहेत, ज्याबाबत अद्याप अंतिम निकाल झालेला नाही, न्यायालयात त्या केसेस सुरु आहेत आणि तीन महिन्यात त्याचे निकाल लागले, कन्व्हीक्शन रेट वाढला, असे घडले आहे का ? कायदा व सुव्यवस्थेच्या चर्चेच्या उत्तरात मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, "कायदा व सुव्यवस्था तर सोडाच, पण कायद्याची भीती कधी वाटेल, ज्यावेळी या राज्याचा कन्व्हीक्शन रेट जास्त असेल." मला असे विचारावयाचे आहे की, अशा प्रकारचा कन्व्हीक्शन रेट असावा ? ही गोष्ट राज्याला शोभणारी नाही. ही निव्वळ दिशाभूल आहे. किमान

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे........

विधानसभेत झालेली दिशाभूल विधानपरिषदेत उत्तर देताना करु नका. त्याऐवजी त्यांनी खरी परिस्थिती सांगावी. अन्यथा, जबाबदारीने मी ही माहिती देण्यास तसार आहे की, हा कन्व्हीक्शन रेट कशा प्रकारचा आहे. अचानकपणे कन्व्हीक्शन रेट कसा वाढला, हे त्यांनी सभागृहासमोर ठेवावे, आम्हीही तो कशा प्रकारे वाढविला आहे, हे तुमच्या समोर ठेवण्यास तयार आहोत. खोटे बोलायचे पण रेटून बोलायचे, हे बरोबर नाही.

सभापती महोदय, एका इंग्रजी वर्तमानपत्रात आलेली बातमी राज्याच्या गृह विभागाला शोभणारी आणि परवडणारी नाही. ही अतिशय चिंताजनक बाब आहे. राज्याचे मुख्यमंत्री महोदय अनेक दिवसांपासून राज्याच्या पोलीस महासंचालकांना भेटीची वेळ देत नाहीत, अशा प्रकारची बातमी वर्तमानपत्रात छापून आली आहे. नेमकी परिस्थिती काय आहे, नेमके कोण चुकत आहे ? खरोखरच मुख्यमंत्री महोदयांनी पोलीस महासंचालकांना भेटीची वेळ दिलेली नाही का ? पोलीस महासंचालकांना कायदा व सुव्यवस्थेबाबत काही महत्त्वाचे सांगावयाचे असेल आणि मुख्यमंत्री महोदय गेल्या एक महिन्यापासून त्यांनी भेट मागितली असताना ती देत नसतील तर या राज्याची कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील का ? नक्की काय घडले आहे, कळायला मार्ग नाही. पोलिसांमध्ये दोन गट आहेत, मोठी लॉबी आहे, असेही वर्तमानपत्रात छापून आले आहे. एक गट मुख्यमंत्री महोदयांना असे सांगतो आहे की, पोलीस महासंचालकांना भेटीची वेळ देऊ नका. खरोखरच असे असेल तर ते महाराष्ट्राला शोभणारे नाही. महाराष्ट्राच्या कायदा व सुव्यवस्थेबाबत ही चिंताजनक गोष्ट आहे.

सभापती महोदय, आणखी एक महाभयंकर प्रकार गेल्या चार महिन्यांपासून राज्यात घडत आहे. हा प्रकार लाचलुचपत प्रतिबंधक विभागामध्ये घडत आहे. गेल्या एक वर्षापासून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे प्रमुख श्री.प्रवीण दिक्षीत हे आहेत. त्यांनी भ्रष्टाचाराच्या विरोधात मोहीम उघडली आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. परंतु, खालच्या स्तरावर, प्रत्येक जिल्ह्यामध्ये मात्र वेगळ्या घटना घडत आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रेड टाकल्यानंतर एखाद्या दोषी नसलेल्या माणसाला तुम्ही सुध्दा दोषी आहात, अशा प्रकारे विभागाचे अधिकारी फोन करीत आहेत आणि त्याला ब्लॅकमेल करीत आहेत. अशा पध्दतीने लाचलुचपत प्रतिबंधक

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे........

विभागामध्येच लाच घेतली जात आहे, असे भयंकर प्रकार महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये घडत आहेत. याकडे कुणाचे लक्ष आहे का ? विधानसभेमध्ये राज्यातील कायदा व सुव्यवस्था फार चांगली आहे, असे सांगितले गेले असले तरी ती वस्तुस्थिती नाही.

सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून पुन्हा एकदा सांगावयाचे आहे की, विधानसभा निवडणुकीच्या काळात आघाडी सरकार चुकीचे आहे, आघाडी सरकारच्या काळात कायदा व सुव्यवस्था चांगली नव्हती, अशी भाषणे करुन तुम्ही लोकांचा विश्वास मिळविला आणि आज मात्र कॉम्रेड पानसरेंच्या खुनाच्या बाबतीत जेव्हा वाहिन्यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे विचारणा केली तेव्हा मुख्यमंत्री महोदय असे म्हणतात की, सिस्टिमचे फेल्युअर आहे. मला असे विचारावयाचे आहे की, या सिस्टिमचे नियंत्रण कोणाकडे आहे ? आम्ही सत्तेत असताना आम्ही फेल्युअर होतो आणि आता तुम्ही सत्तेवर आल्यानंतर सिस्टिम फेल्युअर आहे, असे कसे होऊ शकते ? राज्यातील जनतेला तुम्ही असा विश्वास दिला होता की, हो आम्ही हे करु.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

या सिस्टीमध्ये काही त्रुटी असतील तर ती सिस्टीम चार महिन्यात का सुरळीत करण्यात आली नाही, हा महाराष्ट्राच्या जनतेचा विश्वासघात नाही काय ? हा महाराष्ट्रातील जनतेचा नक्कीच विश्वासघात आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने कॉ.गोंविदराव पानसरे यांच्या हत्तेबाबत हा प्रस्ताव आणलेला आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने मी जे मुद्दे सभागृहात उपस्थित केले आहेत, त्या सर्व मुद्यांचे उत्तर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी द्यावे, गृहखाते त्यांच्याकडे असल्यामुळे आम्हाला मुख्यमंत्री महोदयांकडून उत्तराची अपेक्षा आहे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये विरोधी पक्ष नेत्यांनी कायदा व सुव्यवस्थेचा प्रस्ताव सभागृहात मांडला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, गेल्या पंधरा वर्षातील घटना मी सांगत नसून गेल्या दहा वर्षात महिलांवरील अत्याचारात प्रचंड वाढ झाली आहे. 2013 मध्ये ज्या घटना घडल्या आहेत, त्यापेक्षा जास्त घटना नोव्हेंबर, 2014 पर्यंत घडल्या आहेत. असे प्रकार का होत आहेत, महिला सुरक्षित रहाव्यात अशी सर्वांची इच्छा असताना गेल्या दहा वर्षात छोट्या मुलींपासून 35 ते 40 वय वर्षे असलेल्या महिला देखील सुरक्षित नाहीत. याची कारणे शासनाने शोधण्याची गरज आहे. गेल्या दहा वर्षातील आकडेवारी पाहता सन 2012-2013 या एकाच वर्षात 24,895 महिलांवर अत्याचार घडले आहेत. गेल्या चार महिन्यांचा मी उल्लेख करणार नाही. सन 2013 मध्ये नॅशनल क्राईम ब्रॅन्चने सर्व्हे करुन जो अहवाल दिलेला आहे तो अतिशय गंभीर आहे. कोणत्याही महिलेवर अत्याचार होणे, आपल्या राज्यात महिला सुरक्षित नसणे, याचा विचार गंभीरपणे करण्याची आवश्यकता आहे, असे माझे व सर्वांचेच मत आहे.

सभापती महोदय, सन 2009-2010 व 2011-2012 मध्ये मोठ्या प्रमाणात केसेस रजिस्टर झाल्या आहेत. सन 2009 मध्ये 1483 केसेस रजिस्टर आहेत. त्यापैकी फक्त 182 गुन्हे सिध्द झाले आहेत. इतर केसेसमधील गुन्हेगार तसेच सुटले आहेत. गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचे काम अशा केसेसच्या माध्यमातून होत आहे. सन 2010 मध्ये 1599 केसेस रजिस्टर होत्या. केस रजिस्टर होत नाही असे नाही. यापैकी फक्त 146 गुन्हेगारांना शिक्षा झाली आहे. सन 2011-2012 मध्ये 1701 केसेस रजिस्टर झाल्या आहेत. फक्त 205 केसेसचे निकाल लागले आहेत. महिलांवरील अत्याचारांच्या केसेसचा निकाल लागण्याचे प्रमाण अत्यंत गंभीर आहे. इतर गुन्हेगार का सुटतात याचा विचार करण्याची गरज आहे. सन 2010 मध्ये दहा वर्षाखालील मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या केसेस 108 आहेत, सन 2011 मध्ये 136 केसेस झाल्या होत्या. सन 2010 मध्ये 10 ते 18 वयोगटातील मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या 689 केसेस आहेत. सन 2011 मध्ये 709 केसेस आहेत. सन 2009 मध्ये लैंगिक शोषणाच्या 1099 केसेस आहेत. त्यापैकी फक्त 22 केसेसचे निकाल लागले आहेत. सन 2010 मध्ये 1180 केसेस रजिस्टर आहेत, त्यापैकी फक्त

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस...

34 केसेसचे निकाल लागले आहेत, सन 2011 मध्ये 1071 केसेस रजिस्टर झाल्या आहेत व त्यापैकी फक्त 38 केसेसचे निकाल लागले आहेत. याचे कारण पोलिसांनी केलेली चौकशी व कोर्टात सादर केलले तक्रारीचे अपूर्ण पुरावे हे मुळात चुकीचे आहेत. पोलिसांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अशा केसेस मधील गुन्हेगार सुटत आहेत.

सभापती महोदय, मुलींच्या अपहरणाचा विषय अतिशय गंभीर आहे, हा विषय मी सभागृहात अनेक वेळा उपस्थित केला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात अपहरण होत असून गुन्हेगार मोकाट फिरतात. त्यांना तातडीने जामीन मिळतो. मी माझ्या जिल्ह्यातील एक घटना सांगते. सन 2013 मध्ये एक सहा वर्षाची मुलगी शाळेत जात होती. मुलगी शाळेत जात असताना एका माणसाने तिला उचलून मोटार सायकलवर बसवून पळवून नेत होता, तेव्हा काही लोकांनी व पोलिसांनी त्या मुलाला रेल्वे स्टेशनवर पकडले. रेल्वे येण्याची वेळ झाली होती. त्या मुलीला रेल्वेतून घेऊन जाऊन तो फरार होणार होता, त्याच वेळी नेमके त्याला पकडण्यात आले. मी स्वतः पोलीस स्टेशनमध्ये जाऊन सांगितले की, मुलगी मिळाली, गुन्हेगार मिळाला त्या मुलीला पळवून नेण्यामागे गुन्हेगाराचा काय उद्देश होता याची माहिती मला पाहिजे, असे मी तेथील पोलीस अधिकाऱ्यांना सांगितले. मला दुर्दैवाने सांगावे लागते की, तो गुन्हेगार एका वेश्येकडे नोकर म्हणून काम करीत होता. त्या मुलीला तो कोणत्या उद्देशाने पळवून नेत होता हे त्यातून समजून येते. तरी देखील त्यावेळच्या पोलिसांनी वरवर चौकशी करुन त्या गुन्हेगाराला जमानत घेऊन सोडून दिले. सन 2013 मध्ये पोलिसांवर कारवाई करण्याची आम्ही मागणी केली होती. मी स्वत सभागृहात हा विषय लक्षवेधी सूचना व प्रश्नोत्तराच्या माध्यमातून उपस्थित केला होता. मी स्वतः तत्कालीन गृहमंत्री स्व.आर.आर.पाटील यांना भेटले होते. आबा बद्दल मला अत्यंत सहानुभूती आहे. कोणतीही गोष्ट आम्ही सांगितल्यावर ते प्रामाणिकपणे करीत होते. त्यांनी पोलिसांकडून माहिती घेऊन अशी विचारणा केली की, असा प्रकार का घडला आहे. परंतु काय दिशाभूल झाली याची मला माहिती नाही, त्या पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई न होता त्याची दुसरीकडे बदली करण्यात आली. अशा पध्दतीच्या घटना घडतात, तेव्हा गुन्ह्यांचे प्रमाण का वाढते यामागील सत्य आपण समजून घेतले पहिजे.

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, सन 2013-2014 मध्ये भद्रावती शहरात 18 वर्षाची मुलगी रेल्वे ट्रॅकवर नग्न व कटलेल्या अवस्थेत सापडली होती. त्या केसमध्ये तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी मुलीच्या डेथ बॉडीबरोबर सर्व पुरावे जाळून टाकले आहेत. या केसमध्ये वास्तविक कोणतीही व्हिडीओ कॅसेट काढण्यात आली नाही. व्हिडीओ कॅसेट काढण्याचा सरकारचा नियम आहे. स्व.आर.आर.पाटील साहेब आमच्याबरोबर बैठकीला आले होते, त्यांनी असे सागितले की, यानंतर व्हिडीओ कॅसेट काढलीच पाहिजे. त्यावेळी जर गुन्हा लक्षात आला नाही, तर व्हिडीओ कॅसेट पाहिल्यानंतर त्या गुन्ह्यातील बारीक गोष्टी लक्षात येतात. कायद्याप्रमाणे पी.आय. यांना स्वतः चौकशी करण्याचा अधिकार पूर्णपणे नसतो. एस.पी. किंवा डी.वाय.एस.पी. यांना बोलवावे लागते. सर्व पध्दतीची त्या ठिकाणी चौकशी करावी लागते. 18 वर्षाची मुलगी नग्न अवस्थेत रेल्वे ट्रॅकवर कटलेल्या अवस्थेत आढळली होती. एका पोलीस रिपोर्टमध्ये असे नमूद केले होते की, त्या मुलीच्या गुप्तांगावर प्रचंड वार करण्यात आले आहेत. दुसऱ्या पोलीस रिपोर्टमध्ये असे नमूद केले होते की, असा प्रकार घडला नसून ती मुलगी पागल होती. मी त्यांना असे सांगितले की, आपल्या देशात किंवा राज्यात बाई पागल असली तरी ती कपडे घालते, हे तुम्हाला का कळत नाही. या केसच्या बाबतीत देखील मी स्व.आर.आर.पाटील यांना सांगितले होते. त्यांनी चौकशी लावण्याची मागणी मान्य केली होती. त्यानंतर आघाडी सरकार बरखास्त झाले. आता मुख्यमंत्री महोदयांनी या प्रकरणाची पुन्हा चौकशी सुरु केली आहे. या प्रकरणात तेथील पोलीस अधिकाऱ्याने एकही पुरावा ठेवलेला नाही. माझी सरकारला विनंती आहे की, पोलिसांवर कडक कारवाई करण्यास सुरुवात केली जाईल, त्यांना कायद्याचा धाक बसेल तेव्हाच खऱ्या अर्थाने चांगले व खरे निकाल देण्यास ते सुरुवात करतील. मी मुख्यमंत्री महोदयांना विनंती करते की, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना आताच्या आता निलंबित करावे. त्याच्याविरुध्द चौकशी सुरु करुन भविष्यात कोणाच्याही डोक्यात असे घाणेरडे विचार येऊ नयेत, यासाठी कडक कारवाई करण्याची गरज आहे. असे केले तर महिलांना मोठ्या प्रमाणात कायद्याने सुरक्षा मिळू शकेल.

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, राज्य घटनेच्या कलम 39 अन्वये मुलांचे शोषण होऊ नये त्यांना स्वतंत्रपूर्वक व सन्मानाने जीवन जगता यावे. आवश्यक त्या सोईसुविधा मिळाव्यात. मोकळे जीवन जगता यावे. केंद्र शासनाने सन 2007 मध्ये सर्व्हे केला, त्या सर्व्हेला सात वर्षे पूर्ण झाली आहेत. या सर्व्हेमध्ये 53 टक्के मुले व मुली लैंगिक शोषणात सापडली आहेत. या मुलांचे शोषण मोठ्या प्रमाणात झाले आहे. असा रिपोर्ट केंद्र शासनाने दिला आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.......

हे सर्व कोणी तरी करीत आहे, असे मी म्हणणार नाही. परंतु, महाराष्ट्र राज्यात हे सर्व प्रकार घडत असताना खऱ्या अर्थाने पोलिसवाला हाच आमचा संरक्षक असू शकतो. आम्ही लहानपणी पोलिसांना दादा म्हणत होतो. आम्हाला पोलीस दिसले तर आम्ही त्यांना नमस्कार करीत होतो. कारण आम्हाला त्यांच्या वर्दीबद्दल अतिशय आदर होता. परंतु आज मात्र पोलिसांबद्दल आदर राहिलेला नाही, हे चित्र बदलण्याची आवश्कता आहे आणि हे सरकार याबाबत निश्चितपणे विचार करेल, असा मला विश्वास आहे. कारण, आम्ही अगोदरच्या शासनाकडे ज्या गोष्टींची मागणी केली होती त्या गोष्टी आम्हाला त्यांनी दिल्या नाहीत. परंतु आता आमच्या शासनाने त्या सर्व गोष्टी देण्याचे कबूल केलेले आहे आणि त्यामुळे भविष्यातील चित्र चांगले असणार आहे, असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, नोव्हेंबर, 2014 मध्ये आमचे सरकार सत्तेवर येण्यापूर्वी सहा महिन्यात बलात्काराच्या 2958 घटना घडल्या होत्या. म्हणजे मागील आकडेवारीपेक्षा ही आकडेवारी जास्त आहे. नोव्हेंबर, 2014 मध्ये अपहरणाच्या 1909 घटना घडलेल्या आहेत. 31 ऑक्टोबर संपल्यानंतरचे हे रेकॉर्ड आहे. एका वर्षात अपहरणाच्या 1874 केसेस दाखल झाल्या होत्या. परंतु, सहा महिन्यात अपहरणाच्या केसेसची संख्या 1909 पर्यंत पोहोचली. म्हणजे संपूर्ण वर्षाचे रेकॉर्ड डाऊन करुन ही गुन्ह्यांची संख्या वाढलेली आहे. सन 2013 मध्ये हुंडाबळीच्या 2048 घटना घडल्या होत्या, तर नोव्हेंबर महिन्यात हुंडाबळीच्या 390 घटना घडलेल्या आहेत. नोव्हेंबर, 2013 मध्ये लैंगिक अत्याचाराच्या 1494 केसेस दाखल झाल्या होत्या आणि नोव्हेंबर, 2014 मध्ये 9102 केसेस झालेल्या आहेत. म्हणजे वर्षभरातील रेकॉर्ड संपवून आम्ही पुढे गेलेलो आहोत. अशा प्रकारे घटना घडत असतील तर पोलिसांनाच प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. आपल्याला माहिती आहे की, आपल्या कार्यकर्त्यांचे पोलीस स्टेशनमध्ये काम असेल तर आपण पोलीस स्टेशनमध्ये जातो. माझ्या एका कार्यकर्त्याला बंडीच्या उभाऱ्यांनी मारहाण केली होती. त्याला एवढी मारहाण करण्यात आली होती की, त्यांच्या संपूर्ण अंगावर सूज आली होती. परंतु, या प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.......

कलम 323 ची केस दाखल करण्यात आली. नंतर त्याची जमानत झाली. त्यावेळी मी पोलीस स्टेशनमध्ये गेले आणि सांगितले की, या माणसाला एवढी मारहाण करण्यात आलेली असताना 324 कलम का लावण्यात आले नाही ? मला पोलिसांनी सांगितले की, ज्या माणसाला मारहाण करण्यात आलेली आहे त्याच्या अंगातून रक्त निघालेले नाही. संबंधित व्यक्तीला रुग्णालयात पाठविल्यानंतर त्या व्यक्तीचा रिपोर्ट पोलीस कशा पद्धतीने बघतात, हे माझ्या लक्षात आले. बांगडीने खरचटले तरी रक्त निघते. शार्प धातूने जखम झाली तर 324 कलम लावले जाते आणि उभारीने मारहाण केली तर 323 कलम लावले जाते. मला पोलिसांनी सांगितले की, आम्ही डॉक्टरांच्या रिपोर्टमध्ये चाकू, शार्प हत्यार किंवा आणखी कोणते हत्यार वापरण्यात आले आहे काय एवढेच बघतो. ज्या व्यक्तीला मारहाण केली त्याच्या अंगातून रक्त निघाले तर 324 कलम लावले जाते आणि कितीही बेदम मारहाण केली, परंतु रक्त निघाले नाही तर 323 कलम लावले जाते. म्हणून अशा पद्धतीचे कायदे असतील किंवा पोलिसांना अशा प्रकारे प्रशिक्षण दिले जात असेल तर त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. पोलिसांना नवीन पद्धतीने प्रशिक्षण देण्याची आवश्कता आहे. कारण, कायदे बदलले आहेत आणि त्याच बरोबर, गुन्ह्यांचे प्रकार आणि गुन्हे करण्याच्या पद्धती देखील बदललेल्या आहेत. त्यामुळे मी माननीय गृह राज्यमंत्र्यांना सांगू इच्छिते की, आता पोलिसांना प्रशिक्षण देण्याची अत्यंत आवश्कता आहे.

सभापती महोदय, गडचिरोली, वर्धा जिल्ह्यात दारुबंदी आहे. परंतु, वर्धा रेल्वे स्टेशनवर दारु मिळते. तेथे 13 हजार गुन्हे दाखल झालेले आहेत. खऱ्या अर्थाने आपल्याला दारुबंदी करावयाची असेल तर महिलांचे वार्डा-वार्डात गट तयार करुन त्यांना अधिकार दिले पाहिजेत. त्यासाठी कायदेशीर तरतूद केली पाहिजे. आपण अशा पद्धतीने महिलांचे, युवकांचे वार्डा-वार्डात दबाव गट निर्माण कले तर त्याचा फायदा होईल, असे माझे मत आहे. म्हणून शासनाने अशा पद्धतीने महिलांचे, युवकांचे वार्डा-वार्डात दबाव गट निर्माण करावेत, अशी माझी विनंती आहे.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.......

सभापती महोदय, लैंगिक वाङ्मय लिहिणे, प्रसिद्ध करणे आणि ते बाजारात विकणे, हा गुन्हा आहे. दुसरी गोष्ट अशी की, आपण वर्तमानपत्र वाचतो. वर्तमानपत्रामध्ये सेक्सवर लिहिले जात नाही काय, वर्तमानपत्रात चित्र छापलेले नसतात काय ? मग आपण त्यावर बंदी आणणार आहात की नाही ? एकीकडे आपण सेक्स रेट वाढला असे म्हणतो. म्हणून सेक्स वाङ्मयावर बंदी घालण्याची आवश्यकता आहे. स्त्री कोणत्याही जाती धर्माची, पंथाची असो. तिची जात केवळ स्त्री जात असते. स्त्री ही स्त्रीच आहे. तिला कोणत्या जातीमध्ये, पंथामध्ये बसविण्याची आवश्यकता नाही. असे असताना शिवधर्म सारख्या लोकांनी एखाद्या समाजातील स्त्रियांच्या बाबतीत अश्लील लिखाण करुन आपली भडास काढण्याचा प्रयत्न केलस अयेल तर अशा लेखणी विरांवर कारवाई करण्याची आवश्कता आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. त्यांनी शिमग्याच्या दिवशी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन एका सेलिब्रिटी महिलेच्या संदर्भात लिखाण करुन ते वॉट्सॲपवर टाकले. त्यानंतर काही युवकांनी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन त्याच्यावर गुन्हा दाखल केला. अशा प्रकारची पुस्तके लिहावयाची ? मी त्या माणसाचा एकच किस्सा सांगते. आम्ही लक्षद्वीप येथे गेलो होतो. त्यावेळी इयत्ता 12 वी मधील मुली त्या बेटावर ट्रिपसाठी आल्या होत्या. ती व्यक्ती अंगावर फक्त हाफ चड्डी घालून त्या मुलींमध्ये कप बशीचा खेळ करायला गेली होती. हे त्या व्यक्तीला शोभले काय आणि त्यांनी महिलांबद्दल लिहावे, महिलांबद्दल सांगावे ? त्यांनीच महिलांबद्दल पुस्तके लिहावीत आणि ती शाळेतील मुलांना द्यावीत ? म्हणून माझे असे मत आहे की, बाजारात असे जे वाङ्मय असेल, मग ते अशा प्रकारचे कोणतेही वाङ्मय असो त्यावर कायद्याने बंदी घालावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सध्या नवीन टेक्नॉलॉजीमुळे मोठ्या प्रमाणावर सायबर गुन्हे घडत आहेत. नवीन टेक्नॉलॉजीमुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण 75 टक्के वाढलेले आहे. त्यामुळे या संदर्भात देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. तसेच, बलात्कार किंवा खून झाल्यास त्या केसचा रिपोर्ट पाहिजे असेल तर आपण फॉरेन्सिक लेबॉरेटरीच्या रिपोर्टची मागणी करतो. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आपण देखील ही मागणी करीत होता. आमच्या शासनाने प्रत्येक

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.......

जिल्ह्यात फॉरेन्सिक लेबॉरेटरी द्यावयाचे ठरविले आहे. ती लेबॉरेटरी एकाच विभागात एकच होती. नागपूर येथे तपासणी केल्यानंतर ते नमुने बंगलोर येथे पाठवावे लागत होते, ही वस्तुस्थिती आहे. परंतु, आता प्रत्येक जिल्ह्यात जेव्हा फॉरेन्सिक लेबॉरेटरी होईल त्यामुळे ताबडतोब रिपोर्ट प्राप्त होतील आणि त्या माध्यमातून ताबडतोब निकाल लागतील. नवीन टेक्नॉलॉजीमुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण 75 टक्क्याने वाढलेले आहे. सर्व जिल्ह्यात नव्हे तर विभागामध्ये देखील सायबर क्राईमची ऑफिसेस नाहीत. म्हणून या शासनाने प्रत्येक जिल्ह्यात सायबर क्राईमचे ऑफिस निर्माण केलेले आहे. मुलांना मोबाइल, फेसबुक अशा सर्व गोष्टींमध्ये इन्टरेस्ट आहे. मुलांना काय करावे, काय करु नये हे माहीत नसल्यामुळे कळत न कळत त्यांच्या हातून मोठ्या प्रमाणात गुन्हे घडतात आणि त्यामुळे मुले-मुली फसतात. म्हणून सायबर क्राईमच्या बाबतीत शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करुन बिघडणाऱ्या आणि आयुष्य बरबाद होणाऱ्या मुला-मुलींना वाचवावे, अशी विनंती करुन मी येथेच थांबते.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सायबर क्राईमच्या संदर्भात उल्लेख केला. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात मी याच विषयावर लक्षवेधी सूचना दिली होती. मी या विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांना सविस्तर पत्र लिहिलेले आहे. मी वेगवेगळ्या विषयांवर मुख्यमंत्री महोदयांना दोन-तीन पत्रे दिलेली आहेत. परंतु, आता दोन महिने होऊन देखील मुख्यमंत्री महोदयांकडून माझ्या पत्राला साधे उत्तर देखील मिळालेले नाही.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी आपले भाषण सुरु करावे. आपण आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझ्या पक्षातर्फे या प्रस्तावावर बोलणारा मी पहिला वक्ता आहे.......

**तालिका सभापती** : मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्याला दुपारी 1.00 वाजेपर्यंत या प्रस्तावावरील चर्चा पूर्ण करावयाची आहे. या प्रस्तावावर बोलण्यासाठी अनेक सन्माननीय सदस्यांनी नावे दिलेली आहेत. आपल्या पक्षाकडून 10 सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत. त्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी वेळेचे बंधन पाळले पाहिजे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझ्या पक्षातर्फे या प्रस्तावावर बोलणारा मी पहिला वक्ता आहे. त्यामुळे आपण मला बोलण्यासाठी वेळ द्यावा, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्या पक्षाकडून 10 सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत. आपल्या पक्षातर्फे जी नावे आलेली आहेत ती आपण कमी करुन द्यावी.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 260 अन्वये उपस्थित केलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या विषयावरील चर्चेत सहभाग घेण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मी आतापर्यंत माननीय सदस्यांनी मांडलेल्या कोणत्याही मुद्यांची पुनरावृत्ती न करता माझे विचार मांडणार आहे. अनेक माननीय सदस्यांना या विषयावर आपली मते मांडावयाची असल्यामुळे आपण या चर्चेला वेळ वाढवून द्यावा अशी मी विनंती करतो. मी मुद्दाम आपले लक्ष एका महत्वाच्या गोष्टीकडे वेधू इच्छितो.

सभापती महोदय, 'मी मराठी' या वाहिनीवर निवृत्त अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री.पी.के.जैन यांनी एक वक्तव्य केले. सध्या ते एका राजकीय पक्षाचे प्रवक्ते आहेत. त्यांनी जे वक्तव्य केले ते महाराष्ट्राच्या 11.5 कोटी जनतेने ऐकले आणि पाहिले आहे. श्री.जैन साहेबांनी असे म्हटले की, 'पोलीस खात्यामध्ये सरकार कोणाचेही असले तरी सभागृहात कायदा व सुव्यवस्थेची चर्चा होत असताना आकडेवारी कशी सादर करायची हे आम्हाला चांगले माहिती आहे.' हे त्यांनी जाहीरपणे सांगितले आहे. आम्ही फक्त आकडेवारीच्या जंजाळात फसणार आहोत की आम्हाला खरोखर या संदर्भात काही ठोस उपाययोजना करायची आहे? तीन महिन्याच्या काळात सरकारने सर्व काही करावे असे आम्ही म्हटलेले नाही. परंतु असे सांगण्याचा प्रयत्न का केला जातो? 15 वर्षे आम्ही सत्तेत होतो, त्या काळात पोलीस खात्याची लक्तरे वेशीवर टांगली गेली. परंतु कायद्याचा वचक आहे याचे भान तुम्हा आम्हाला राहिले पाहिजे. यापूर्वी आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर असताना सुध्दा मी सभागृहात हेच सांगत होतो. आकडेवारी किती कमी झाली, किती वाढली हे न सांगता आज पोलीस दलाबद्दल आणि कायदा व सुव्यवस्थेबद्दल पुरोगामी महाराष्ट्रासमोर जे चित्र निर्माण झाले आहे त्याची चिंता आपल्याला असावयास हवी. त्या संदर्भात सभागृहामध्ये चिंतन झाले पाहिजे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देत असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी काही गोष्टींचा ऊहापोह केला. गुन्हे उघडकीचे प्रमाण वाढले पाहिजे. परंतु हे प्रमाण वाढविण्याचे काम सरकारचे नसून पोलीस दलाचे आहे. पुरावे गोळा करणे, ते सिध्द करणे हे पोलीस दलाचे काम आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी व माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी दिलेली उदाहरणे बोलकी आहेत. पोलीस यंत्रणेला जाब विचारावा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

19-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) H.2

SGB/ ST/ AKN/ 12:10

श्री.भाई जगताप.......

लागेल, हे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात काय सांगितले हे मी सांगणार नाही. कारण त्यामुळे आकडेवारीचा प्रश्न येईल. आकडेवारी देऊन मला सभागृहाचा वेळ घ्यायचा नाही. त्यांनी जी जगलरी केली ती माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडली आहे. तीन महिन्यात गुन्हे प्रकटीकरणाचा वेग वाढला. मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, 1995 ते 1999 या काळात हा रेट 10 टक्के होता. हा रेट 10 वरुन 17 टक्क्यापर्यंत यायला 15 वर्षे लागली. हा रेट 17 वरुन 70 टक्के झाला तर आम्हाला आनंदच होईल. त्यासाठी सभागृहाचा वापर करण्यात यावा. त्यासाठी काय करावे लागेल याची चिंता करा, त्याचे स्वागतच होईल. परंतु त्या काळात काय झाले, यावेळी असे झाले असे सांगून या विषयावरील चर्चेला न्याय देता येणार नाही. आज पोलीस दलाकडून एवढे झाले, तेवढे झाले याची आकडेवारी कशी येते हे जैन साहेबांनी सांगितले. म्हणून माझी विनंती आहे की, या विषयाच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र पोलीस दलाचा, विशेषतः मुंबई पोलीस दलाचा थाट, धाक आणि दरारा जगभर प्रसिध्द होता. अलीकडे तो कमी का झाला याला काहीतरी कारणे असतील, ती कारणे शोधत असताना, पोलीस दलाकडे बोट दाखवित असताना कदाचित आपल्याला त्या विभागामध्ये काही कमतरता आहे का या गोष्टीकडे पाहणे आवश्यक आहे. पोलीस दलाचा कणा म्हणून पोलीस उप निरीक्षक आणि त्याच्या हाताखालचा कर्मचारी वर्ग आहे. त्याबाबत काय स्थिती आहे? आज पोलीस दलामधील बहुसंख्य मंजूर पदे भरलेली नाहीत. वाढते शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यादृष्टीने काही समीकरणे निश्चित केलेली आहेत, त्याची पूर्तता होताना दिसत नाही. काल राज्याचा अर्थसंकल्प मांडण्यात आला. या अर्थसंकल्पामध्ये पोलीस विभागाकरिता किती निधी उपलब्ध करुन दिला?

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस हे विरोधी पक्षात असताना अर्थसंकल्पावर अभ्यासपूर्ण भाषण करायचे. आम्ही त्यांची भाषणे ऐकण्यासाठी आवर्जून उपस्थित रहायचो. त्यांची भाषणे ऐकून आम्ही बोलायला शिकलो. माननीय मुख्यमंत्र्यांनी अनेकदा पोलीस

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दलातील समस्या, पोलीस कर्मचाऱ्यांचे कामाचे तास, त्यांच्या सुरक्षेचे प्रश्न या विषयावर आघाडी सरकारवर आरोप केलेले होते. आघाडी सरकार पोलीस विभागासाठी पुरेसा निधी देत नाही असे

...3...



श्री.भाई जगताप......

म्हटले होते. पोलिसांना बुलेटप्रूफ जॅकेट देण्याचा प्रश्न, सागरी किनाऱ्यावरील गस्ती नौकाचा प्रश्न वारंवार सभागृहात चर्चेचा विषय ठरलेला होता. आज काय स्थिती आहे? आज पोलीस दलाची अवस्था काय आहे याकडे पाहण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माझे वडील पोलीस खात्यात काम करीत होते. मी आयुष्यभर या वर्दीची शान आणि मान पाहिलेला आहे. पोलीस खात्यातील अयोग्य गोष्टींचे मी अजिबात समर्थन करणार नाही. देशभरात, विशेषतः राज्यामध्ये पुलाखाली संसार मांडणाऱ्यांना मोफत घरे दिली जातात. परंतु पोलीस वसाहतींची दुर्दशा प्रत्यक्ष जाऊन बघा. मी 32 वर्षे पोलीस वसाहतीत राहिलेलो आहे. तेथे पाण्याचा पत्ता नाही, शौचालयांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. अक्षरशः जेलमधील अवस्था पोलीस वसाहतीमध्ये पहावयास मिळते, हे मी जबाबदारीने सांगत आहे. या संदर्भात कोणी कधी भाष्य केले नाही. त्यांना 24 तास काम करावे लागते. कामाच्या ताणामुळे त्यांना कोणतेही सण साजरे करता येत नाहीत. जरा कुठे खट् झाले तर आपण त्यांच्याकडे अंगुलीनिर्देश करतो. ते करणे आवश्यक आहे. परंतु पोलिसांना मंजूर केले जाणारे भत्ते वेळेवर मिळत नाहीत. पोलीस कर्मचारी अतिरिक्त काम करतात, त्याबद्दल दिले जाणारे भत्ते त्यांना वेळेवर का मिळत नाहीत?

नंतर आय.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते.)**

श्री.भाई जगताप...

एक वेळ अशी आली होती की, संगणक प्रणालीमध्ये बिघाड झाल्यामुळे पोलिसांचे पगार देखील एका विशिष्ट तारखेला होऊ शकले नव्हते. त्यावेळी आमचे सरकार होते. पोलिसांच्या अडचणी आपल्या भाषणातून दूर होणार नाहीत. त्यासाठी आपल्याला निधीची व्यवस्था करावी लागेल. एखादे बजेट हे फक्त शेतकऱ्यांसाठी, राज्याच्या सुरक्षेसाठी असले पाहिजे. पण असे कधीही पाहण्यात आलेले नाही. आपण राजकीय भाषणे करतो व त्याला राजकीय उत्तर मिळते. मला माननीय मुख्यमंत्र्यांबद्दल प्रचंड आदर आहे. माननीय मुख्यमंत्री हे आता कोणत्या एका पक्षाचे नाहीत. ते या राज्याचे मुख्यमंत्री आहेत. ते या राज्याचे प्रमुख आहेत. आम्ही राज्याच्या प्रमखाकडून अपेक्षा ठेवायची नाही तर मग कोणाकडून ठेवायची ? लोकांनी आपल्याला भरभरून मते देऊन राज्यावर बसविले आहे. कदाचित आमच्याही चुका झाल्या असतील. चार महिन्यांची सरकारने आकडेवारी देत असताना सन 2004, 2010 मध्ये काय झाले याची आकडेवारी देऊ नये. येथे तुलनात्मक चर्चा करण्याबाबत माझे दुमत नाही. आता आपण सत्तेवर येऊन काय केले आहे ? येथे कन्व्हीक्शन रेटचा उल्लेख करण्यात आला आहे. सन 1995 मध्ये कन्व्हीक्शनचा रेट हा 10 टक्के होता. हा आकडा रेकॉर्डवर असून तो मी माझा घरातून आणलेला नाही.

सन्माननीय महोदया, आजही पोलीस दलामध्ये अनेक अडचणी आहेत. आता आपण पोलिसांना घरे दिली जातील अशा प्रकारची घोषणा केली आहे. यासाठी आपण निश्चित काही तरी कार्यक्रम द्यावा. आयपीएस अधिकाऱ्यांची मलबार हिल, वरळी, जुहू येथे स्वतःची घरे आहेत. मी त्याच्या विरोधात नाही. आपल्याला पोलीस शिपायांची घरे कुठे आहेत ते माहीत आहे काय ? कळवा, मुंब्रा, दिवा, डोंबिवली, धारावाची झोपडपट्टी, जुहू येथील झोपडपट्टी, भोईवाड्यातील बी.डी.डी.चाळ, नायगाव, घाटकोपरमधील पंतनगर येथे पोलिसांची घरे आहेत. पंतनगर, घाटकोपर येथे माझे शालेय जीवन गेले. आज आपण त्या घरांची अवस्था काय आहे ती जरा पाहून या. यासंबंधी शासन कधी तरी चर्चा करणार आहे की नाही ? पोलिसांना घरे दिली जातील असे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले असल्यामुळे मी आशावादी आहे. मात्र, ती कशी दिली जातील यासंबंधी देखील त्यांनी खुलासा करणे आवश्यक आहे. आता आपण सत्तेवर पाच वर्षे आहात. त्यामुळे सदर घरे देण्यासाठी शासनाने निश्चित असा कार्यक्रम घोषित केला पाहिजे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

आम्ही त्याचे निश्चितच स्वागत करू.

सभापती महोदय, मी गँगवॉर वर बोलणारच आहे. शासनाने पोलीस दलातील गँगवॉर मोडून काढावे. मुंबई पोलिसांचा जगात दबदबा होता. त्याचा उल्लेख मी सुरूवातीला केला आहे. पण हा दबदबा आता कमी का झाला आहे ? आज आयपीएस अधिकाऱ्यांच्या देखील लॉबी झाल्या आहेत. एवढेच नव्हे तरी कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखील लॉबी तयार झाल्या आहेत. त्यामुळे जो तो आपल्या पद्धतीने काम करीत आहे. आयपीएस अधिकारी स्वतःच्या स्वार्थासाठी महाराष्ट्राची इभ्रत वेशीवर टांगणार असतील तर ते योग्य नाही. त्यामुळे माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, यामध्ये आपण लक्ष घालावे. माननीय मुख्यमंत्री संवेदनशील आहेत म्हणून मला मुद्दाम सांगावेसे वाटते की, कॉ.पानसरे यांचे निधन झाले त्या दिवशी ते एका कार्यक्रमामध्ये होते. कॉ.पानसरे यांनी समाजाला एक वेगळा विचार देण्याचा प्रयत्न केला होता. डॉ.नरेंद्र दाभोळकर, कॉ.पानसरे यांच्यासारखे अनेक जण या महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. त्यामुळे महाराष्ट्राला वैचारिक पातळीचे अधिष्ठान लाभले आहे. कॉ.पानसरे यांचा ज्या दिवशी मृत्यू झाला त्या दिवशी माननीय मुख्यमंत्री नाशिक येथील पोलीस मुख्यालयातील एका कार्यक्रमात होते. त्यावेळी त्यांचे फटाके वाजवून स्वागत करण्यात आले होते. ह्याच काय त्या आपल्या संवेदना ? काही गोष्टी करणे आवश्यक असते हे आम्ही समजू शकतो. त्या गोष्टीला माझा विरोध नाही. कॉ.पानसरे यांचा देह चितेवर जळत असताना फटाके फोडण्यात येत होते. तरी सुद्धा माननीय मुख्यमंत्री काहीच बोलत नाही. असे असताना देखील आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना संवेदनशील म्हणत आहोत. कसल्या ह्या संवेदना? आज जे काही पोलीस दलामध्ये चालले आहे त्यासंबंधी आमच्या माननीय मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहेत. आमचा कशालाही आक्षेप नाही. आपण अनेक खाती सांभाळत आहात. आम्हाला काय आपण येथे नुसते येऊन बसावे. माननीय मुख्यमंत्री केंद्रातून एक चांगली गोष्ट शिकले आहेत. आता सगळ्यांना नरेंद्र मोदी व्हायचे आहे. मी जे बोलेन तसेच झाले पाहिजे, मी जे सांगेन तसेच झाले पाहिजे अशा पद्धतीचे कामकाज चालले आहे. ते चांगले आहे. आम्ही लोकशाही मध्ये नेहमी सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या गोष्टी करतो. येथे सगळ्या गोष्टी ह्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

केंद्रीकरणाच्या दिशेने सुरू आहेत. या सर्व पार्श्वभूमीमध्ये आपण एखादा चांगला मंत्री तरी द्यावा. वाटल्यास, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना मंत्री पद द्यावे. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्याकडे तो भार द्यावा. कोणाला तरी गृह खात्याचा पूर्ण भार द्यावा. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांना मंत्रीपद देणार नाहीत. हे मी खात्रीपूर्वक सांगतो. मंत्री पदाचे गाजर त्यांच्या पदरात पडेल असे मला वाटत नाही. ते पडले तर मला आनंद वाटेल. श्री.महादेव जानकर हा चळवळीतील माणूस आहे. पण तसे काही होणार नाही. राज्याच्या पोलीस प्रमुखाला महिन्यातून एकदाही वेळ देत नसाल तर मग ते संपूर्ण दल कसे काय काम करू शकेल ? आज माननीय मुख्यमंत्र्यांकडे अनेक कामे आहेत. त्यामुळे आपण गृह खात्याचा भार हा दुसऱ्याकडे द्यावा नाही तर स्वत: त्याकडे लक्ष द्यावे. आज काय परिस्थिती आहे? येथे सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी अनेक उदाहरणे दिली आहेत. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावता कामा नये. परवा मंगळवारी, धारावी येथे एक आठ वर्षाची मुलगी खेळण्यासाठी बाहेर आली असता एका नराधमाने चॉकलेटचे आमिष दाखवून बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. त्या मुलीने आरडा-ओरड केल्यामुळे तो पकडला गेला. असे धाडस मुंबई सारख्या ठिकाणी होत आहे. डिसेंबर मध्ये प्रतीक्षा नगर, सायन येथे एक घटना घडली. एका दुकानदाराची मुलगी थोडीशी दूर गेली असता तिला उचलून नेऊन तिच्यावर बलात्कार करण्यात आला. त्या मुलीला बघण्यासाठी मी स्वत: सायन हॉस्पिटलमध्ये गेलो होतो. त्यावेळी माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे देखील आल्या होत्या. त्या मुलीची आपण अवस्था पाहावी. अजूनही ते आरोपी पकडले गेले नाहीत अशी माझी माहिती आहे. ते पकडले गेले असतील तर मला त्याचा आनंदच होईल. त्यामुळे हा प्रश्न सन 2006, 2010 मध्ये किती गुन्ह घडले यासंबंधातील नाही. हा जो काळ सोकावत चालला आहे त्यावर कसे नियंत्रण आणणार आहात हा खरा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळी मी कुमार रिसॉर्टचा एक प्रश्न उचलून धरला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, आम्हाला कोण आरोपी आहेत हे समजले आहे. आम्ही सर्कल केलेले आहे. तो बिहारमध्ये आहे. आम्ही त्याला



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

पकडून आणतो आहे. त्यांचे हे म्हणणे मी खरे मानतो. हे उत्तर देऊन चार दिवस झाले आहेत. बिहार फार लांब आहे असे काही समजण्याचे कारण नाही. अजून तरी त्या आरोपीला पकडण्यात आलेले आहे असे माझ्या तरी वाचनात आलेले नाही. ज्यावेळी अशी वाईट घटना घडते त्यावेळी समाजाचा भयानक उद्रेक हा होतोच. कुमार रिसॉर्टमध्ये घडना घडल्यानंतर तेथील स्थानिक लोकांनी तोडफोड केल्यामुळे त्यांच्यावर दरोड्याचे आरोप लावण्यात आले आहेत. त्या मुलीचे शव गच्चीवर मिळाले होते.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप ........

या मुलीवर बलात्कार झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली असताना सुध्दा आपण इतके असंवेदनशील कसे आहात ? या विषयाच्या संदर्भात माझी आपल्याला विनंती आहे की, गुन्हेगार कोणत्या पक्षाचा आहे, कोणत्या धर्माचा आहे याचा विचार न करता त्याला कठोर शासन झाले पाहिजे. यासंदर्भात काळ सोकावता कामा नये एवढेच मला या निमित्ताने म्हणावयाचे आहे.

सभापती महोदय, एकेकाळी महाराष्ट्र पोलीस दलाचा गुन्हेगारांना धाक होता परंतु तो धाक आता राहिलेला नाही. आता गुन्हेगार बेधडक येतात, बेधडक खून करतात आणि बेधडक निघून जातात अशी परिस्थिती झालेली आहे. कॉ.पानसरे यांची हत्या सुध्दा अशीच झालेली आहे. यासंदर्भात कॉ. पानसरे यांच्या पत्नीचे स्टेटमेंट आपण वाचले असेल. कॉ. पानसरे यांच्या पत्नीने असे स्टेटमेंट केले आहे की, आम्ही सकाळी फिरायला बाहेर पडलो असतांना एक मोटार सायकलस्वार त्यांच्याजवळ थांबला, त्याने मोरे नावाच्या इसमाची माहिती विचारली, त्यावेळेस मागचा तरुण फिदी फिदी हसला आणि धाड धाड गोळया झाडून निघून गेला. हा गुंड खरे म्हणजे तुमच्या कायदा आणि सुरक्षेवर हसला. माझे कोणीही वाकडे करु शकत नाही याची माहिती या गुंडाना आहे. अजून सुध्दा कॉ. पानसरे यांची हत्या करणारे गुंड मोकाट आहे. दाभोळकरांची हत्या आमच्या शासनाच्या कार्यकाळात झाली होती तरी सुध्दा आम्ही यासंदर्भात या सरकारला वारंवार धारेवर धरले आहे. परंतु अद्याप सुध्दा दाभोळकरांच्या मारेकऱ्यांचा छडा लागू शकलेला नाही.

सभापती महोदय, सतीश शेट्टी यांची सुध्दा अशाच प्रकारे हत्त्या झाली होती. या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे आम्ही दिला होता. सदर गुन्हेगाराला ॲरेस्ट करण्याची जेव्हा वेळ आली त्यावेळेस केस विथ्ड्रॉ करण्याची प्रोसिजर केली. आपल्या महाराष्ट्रात हा काय प्रकार सुरु आहे ? अशा गोष्टींच्या मुळाशी जावे म्हणून सीबीआयकडे तपासाची सूत्रे दिली जातात असा आपल्या सर्वांचा समज आहे परंतु तशी वस्तुस्थिती नाही. आज गुन्हेगारांची जी मानसिकता वाढत आहे त्याला आपल्याला पायबंद घालावा लागणार आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या नागपूरमध्ये काय परिस्थिती आहे याची आपल्या सर्वांना माहिती आहे. मुख्यमंत्र्यांच्या घराच्या बाजूला फायरींग होते, त्यांच्या घराजवळ रोडवर

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप ........

दिवसा ढवळया व्यापाऱ्याला मारले जाते. एवढेच नव्हे तर सगळयात जास्त चिंतेची बाब अशी आहे की, सिताबर्डी परिसरातील श्री. भरत खटावणे या इलेक्ट्रॉनिक्स सामानाच्या व्यापाऱ्याची खुलेआम हत्या करण्यात आली. ज्यावेळेस अशा घटना घडतात त्यावेळेस साधारणत: 100 नंबरवर फोन केला जातो. परंतु या ठिकाणच्या व्यापाऱ्यांनी 700 काठयांचे वाटप करुन स्वत:ची सुरक्षा स्वत: करण्याचे ठरवले आहे. एका दुकानात असा प्रकार झाला तर तो दुसऱ्या दुकानदाराला कळवायचा आणि स्वत:चे संरक्षण स्वत:च करावयाचे असा निर्धार नागपूर येथील व्यापाऱ्यांनी केलेला आहे.

सभापती महोदय, मुख्यमंत्र्यांच्या घराजवळ गुन्हे करण्याचे धाडस गुन्हेगारांमध्ये वाढलेले असताना तुम्हाला आणि आम्हाला एक मेकांकडे बोटे दाखवून जमणार नाही तर आपल्याला कठोर पावलेच उचलावी लागतील. यासाठी पोलीस दलाचे शुध्दीकरण किंवा अजून काही करावयाचे असेल तर ते आपल्याला करावेच लागेल हे मला या ठिकाणी मुद्दाम सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नगर जिल्हयात एका मुलाची नग्न धिंड काढली गेली असा उल्लेख केलेला आहे. परंतु बोरगाव, ता. चाकूर, जि. लातूर या ठिकाणी एका महिलेची 14 कि.मी. पर्यंत मारत मारत निवस्त्र धिंड काढली. 14 कि.मी. पर्यंत धिंड काढली जात असताना त्या दोन तीन तासामध्ये त्या ठिकाणी एकही महिला कॉन्स्टेबल किंवा एकही पोलीस शिपाई पोहचू नये ? कोठे नेऊन ठेवला आहे माझा महाराष्ट्र ? तीन चार महिन्यांच्या कालावधीत तुम्ही जर महाराष्ट्राला येथे आणून ठेवले असेल तर उर्वरित काळात कोठे नेऊन ठेवणार आहात माझा महाराष्ट्र ? मी राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही परंतु यामागच्या भावना आपण सर्वांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आता खून करणाऱ्या गुन्हेगारांना पोलिसांची भीती राहिली नाही. वाळू माफिया इतके बिनधास्त झाले आहे की, येवला या ठिकाणी वाळूची अवैध वाहतूक होत आहे अशा प्रकारची तक्रार आली असता तहसीलदार श्री. सुदाम महाजन तेथे गेल्यावर वाळू माफियांनी तहसीलदाराच्या अंगावर गाडी घातली. तहसीलदारांनी रस्त्याच्या बाजूला उडी मारल्यामुळे त्याचा

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप ........

जीव सुरक्षित राहू शकला. परंतु आजपर्यंत या वाळू माफियांवर कोणती कारवाई केली याची माहिती सभागृहाला मिळणे आवश्यक आहे. या अगोदर मनमाडमध्ये तहसीलदारांना जाळून मारल्याची घटना सुध्दा घडलेली आहे याची आपल्याला कल्पना आहे.

सभापती महोदय, गेल्या दोन चार महिन्यातीलच घटना मी या ठिकाणी सांगत आहे. मी या ठिकाणी राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही. मला आपल्याला एवढेच सांगावयाचे आहे की, आज गुन्हेगारांची हिंमत का वाढली याचा आपण विचार करणार आहोत की, नाही ?

सभापती महोदय, दिनांक 18 जानेवारी, 2015 रोजी बीड जिल्हयातील गेवराई येथे ऊस तोडणी करणाऱ्या आदिवासी महिलेवर सामूहिक बलात्कार करण्यात आला परंतु पुढे काय झाले याची आम्हाला आतापर्यंत माहिती मिळालेली नाही.

सभापती महोदय, फुटपाथावर झोपणाऱ्या मुलींना उचलून त्यांना अनैतिक धंद्यामध्ये गुंतवणारी टोळी सक्रीय आहे असा शोध पोलिसांनी लावला आहे. परंतु त्यावर अद्यापपावेतो कोणती कारवाई झाली याची माहिती आम्हाला मिळालेली नाही. आज मुंबईत 5 लाख लोक फुटपाथवर झोपत असून त्यामध्ये महिलांचीही संख्या मोठया संख्येने आहे. या फुटपाथवरील महिलांना पकडून कुंटणखान्यात विकण्याचा धंदा काही नराधम करीत असून त्यातील 4 नराधमांना पोलिसांनी पकडले आहे परंतु या प्रकरणाचे पुढे काय झाले याचा शोध अद्यापपर्यंत तरी लागलेला नाही.

सभापती महोदय, डोंबिवली येथील पोलीस कॉन्स्टेबल महिलेची अश्लील फीत बनवून तिच्यावर वर्षभर बलात्कार करण्यात आला. ही घटना दि. 26 जानेवारी, 2015 रोजी उघडकीस आलेली आहे. या घटना कोणत्या पक्षाच्या काळात घडल्या, कोणत्या महिन्यात घडल्या यापेक्षा या घटना काय दर्शवत आहेत ? या घटना पोलीस दलात असलेली बेदिली, आयपीएस अधिकाऱ्यामध्ये असलेले गँगवॉर हेच दर्शवत आहे. एका महिलेचे शोषण केल्याबद्दल एक पोलीस आयपीएस अधिकारी ॲरेस्ट आहे. या ठिकाणी मी कोणाचेही नाव घेणार नाही. नाव घेऊन मी कोणालाही प्रसिध्दी देणार नाही. जर असे प्रकार आयपीएस अधिकारी करीत असतील, पोलीस विभागातील महिला पोलीस सुरक्षित नसतील तर हे गुन्हेगारांना कोणते बंधन घालणार आहात ? हा माझ्या समोर प्रश्न आहे.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप ........

सभापती महोदय, आपल्या पुरोगामी महाराष्ट्राचे अजून सुध्दा संपूर्ण देशात गोडवे गायले जातात. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपल्या राज्यात कायदा आणि सुव्यवस्था आहे काय असे प्रश्नचिन्ह सर्वसामान्यांच्या समोर आहे. ही स्थिती सुधारेल अशी मला खात्री आहे. परंतु ही स्थिती सुधारण्यासाठी आपल्याकडे काही कार्यक्रम असेल तर तो आम्हाला सांगावा.

यानंतर श्री. अजित........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

आपण या ठिकाणी तुमच्या काळात काय घडले आमच्या काळात काय घडले हे सांगून उपयोगाचे नाही. आपणास आता पोलिसांची झाडाझडती घ्यावी लागेल. आपण लोकप्रतिनिधी आहोत. आज आम्ही विरोधी बाकावर आहोत, उद्या तुम्ही विरोधी बाकावर याल, परंतु जी यंत्रणा आहे ज्याला आपण सिस्टीम म्हणतो, ती सिस्टीम आपोआप बदलणार नाही. त्यासाठी तुम्हा आम्हाला पुढाकार घ्यावा लागेल. माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि आपण सर्वांनी पुढाकार घ्यावा, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद !जय महाराष्ट्र !

---------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहात गेली कित्येक वर्षे कायदा आणि सुव्यवस्थेवर आपण चर्चा केलेली आहे. मी या ठिकाणी काही ठराविक मुद्यांवर बोलणार आहे. कायदा आणि सुव्यवस्था या विषयामध्ये पोलिसांचे मनोधैर्य टिकविणे महत्वाचे आहे. आज दिवसेंदिवस पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण होत आहे आणि त्याचा परिणाम कायदा आणि सुव्यवस्थेवर होत आहे. पोलिसांची भरती, बढती आणि बदली करण्याचे काम मंत्रालयातील बाबू लोक करतात. कोणता पोलीस अधिकारी कुठे पाहिजे, कोणत्या अधिकाऱ्याने कोठे काम करावे याचा निर्णय मंत्रालयातील अधिकारी घेतात. मुंबईच्या पोलीस आयुक्तांना त्यांची स्वत:ची टीम पाहिजे असेल तर त्यांना ते निवडण्याचे स्वातंत्र्य नाही. पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या सहकाऱ्याबद्दल माहिती असते. त्याची काम करण्याची क्षमता माहिती असते. तो कशा पद्धतीने काम करु शकतो याची माहिती असते. अशा क्षमतेची माणसे त्यांच्या जोडीला देणे हे अतिशय महत्वाचे आहे. आपण कायदा आणि सुव्यवस्था ढासळली आहे असे म्हणतो, परंतु ते पोलिसांचे मनोधैर्य ढासळलेले असते. आपण पोलिसांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी काय करणार आहोत हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मागील 15 वर्षे आम्ही विरोधात होतो तेव्हा कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नावर आवाज उठवत होतो. माझी या सरकारकडून अपेक्षा आहे की, या चर्चेच्या निमित्ताने आपण पोलिसांचे मनोधैर्य टिकविण्यासाठी वा वाढविण्यासाठी कोणत्या प्रकारच्या उपाययोजना करणार आहात हे येथे सांगितले पाहिजे. कोणाच्या सोयीचे आहे, कोणाला आवडतो, केवळ माझ्या लॉबीचा आहे म्हणून त्याची नियुक्ती करण्यात येऊ नये. पोलिसांमध्ये गॅंगवारटाईप गॅंगवार सुरु आहे. थोडक्यात पोलीस वॉर म्हणता येईल. या गटातील पोलीस अधिकारी घ्यायचा, त्या गटातील घ्यायचा, त्या रिजनचा घ्यायचा, या रिजनचा घ्यायचा असे करण्यापेक्षा तो पोलीस अधिकारी किती सक्षम आहे हे आपण जाणून घेतले पाहिजे.

सभापती महोदय, मी आता फक्त मुंबईपुरता बोलत आहे. मुंबईचे पोलीस आयुक्त श्री.राकेश मारिया यांना मुंबईची खडान्खडा माहिती आहे. आम्ही विरोधी बाकावर असताना सुद्धा

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब....

त्यांच्याबद्दल चांगले बोललो आहोत. मुंबई ही नेहमी जातीय दंगलीच्या तोंडावर बसलेली असते. काही दिवसांपूर्वी लालबाग येथे दंगल झाली, त्यावेळी मुंबईचे पोलीस आयुक्त रस्त्यावर उतरले होते. त्यांनी दोन्ही गटांच्या लोकांना शांत करण्याचे काम रात्रभर केले म्हणून त्यावेळी दंगल टळली होती. फक्त पोलीस आयुक्तांनी रस्त्यावर उतरुन चालणार नाही तर त्यांच्या सहकाऱ्यांनी देखील तेवढ्याच ताकदीने रस्त्यावर उतरले पाहिजे. पोलीस आयुक्तांना मुंबईची माहिती असणे फार गरजेचे आहे. आम्ही नेहमी सांगतो की, जे वरिष्ठ पोलीस अधिकारी आहेत, जे पोलिसांची ध्येयधोरणे ठरवितात, पोलिसांनी कसे काम केले पाहिजे हे ठरवितात, त्यांना मुंबईची खडान्‌खडा माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे. मुंबईमध्ये कोण मस्तीखोर आहे, कोण ट्रबल क्रियेटर आहे, कोण जातीय दंगली भडकवू शकतो, याची माहिती असेल तर तो मुंबईचे प्रश्न व्यवस्थितरित्या हाताळू शकतो. आम्ही पाहतो आहोत की, मुंबईत पुन्हा जातीय दंगली घडू शकतात. 26/11सारखा प्रसंग घडू शकतो. असे प्रसंग पुन्हा उदभवू नयेत यासाठी मुंबईची माहिती असलेला अधिकारी उच्च पदावर असणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी आज सकाळी दादरहून ट्रेनने आलो. स्टेशनवर सर्व गेटस उघडे होते. फक्त एका ठिकाणी मेटल डिटेक्टर लावलेला होता आणि त्यामधून कोणी जात होते तर कोणी बाजूने जात होते, ही कसली सुरक्षा आहे ? अशा सुरक्षेमुळे कोणीही ट्रेनमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणू शकतो. एअरपोर्टच्या बाजूला झोपडपट्टी आहे तेथून कोणीही रॉकेट लॉंचरने विमान उडवू शकतो. केवळ राम भरोसे मुंबईचा कारभार सुरु आहे काय ? मुंबईसारखे आंतरराष्ट्रीय शहर सुरक्षित नसेल तर कोणीही पर्यटक मुंबईत येणार नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्र बलात्काराच्या घटनेत आघाडीवर आहे अशी बातमी मी दोन-तीन दिवसांपूर्वी वाचली. पोलिसांची गुन्हेगारांवर दहशत असली पाहिजे, पोलिसांचा गुन्हेगारांवर वचक असला पहिजे. गुन्हेगारांना पोलिसांबद्दल आदरयुक्त भीती असणे आवश्यक आहे आणि पोलिसांनी ती निर्माण करण्याची आज गरज आहे. आज सर्वसामान्य माणूस पोलीस स्टेशनला जाण्यास घाबरतो.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब...

सभापती महोदय, मी नागपूरच्या अधिवेशनामध्ये एक विषय मांडला होता की, एमआयडीसीचे पोलीस अधिकारी श्री.नरेश कासले हे रात्री दारूच्या नशेत धुंद होते. ते दारूच्या नशेत वाकले होते. मी त्या संदर्भात त्यांच्या चौकशीची मागणी केली. त्यानंतर मला सांगण्यात आले की, चौकशी पूर्ण झाली. माझी तक्रार असताना आणि माझे स्टेटमेंट न घेता चौकशी कशी पूर्ण झाली ? माझे साधे स्टेटमेंट न घेता चौकशी पूर्ण करण्यात आली. मी हा विषय सभागृहात मांडला त्यावेळी माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी निर्देश दिले की, या प्रकरणाची संपूर्ण चौकशी अतिरिक्त पोलीस आयुक्त (प्रशासन) यांच्यामार्फत करण्यात यावी आणि पुढील अधिवेशनात त्याचा अहवाल ठेवण्यात यावा. परंतु आजतागायत मला चौकशीसाठी बोलाविण्यात आलेले नाही की, मला कोणी विचारले देखील नाही. हे सर्वोच्च सभागृह आहे. या सभागृहात दिलेल्या निर्देशाचे काही तरी पालन झाले पाहिजे. मी तर काहीतरी असे म्हणतो. कमीत कमी मला चौकशीसाठी तरी बोलवावे. तो अधिकारी निर्दोष असेल तर तसे मला सांगावे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य जे सांगतात ते सत्य असते असे आपण समजतो. मी त्या पोलीस अधिकाऱ्याचे शुटींग करून ते चॅनेलला पाठविले असते तर पोलिसांच्या इभ्रतीचे काय झाले असते ? आम्ही काळजी घेतली की, पोलिसांचे मनोधैर्य खचता कामा नये. पोलीस विभागात चांगले अधिकारी देखील आहेत. परंतु जे अधिकारी वाईट काम करीत आहेत त्यांच्यावर शासनाचा वचक असला पाहिजे. मी या संदर्भात माननीय गृह राज्यमंत्र्यांना भेटून त्यांना विनंती केली की, आपण या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावावा. तो पोलीस अधिकारी निर्दोष आहे, त्याने कोणताही गुन्हा केलेला नाही, त्याची पूर्ण चौकशी केलेली आहे, हे तरी मला सांगा. असा अनुभव कोणावरही येऊ शकतो. आपण रात्रीच्या वेळी पोलीस स्टेशनला गेल्यावर एखादा पोलीस अधिकारी दारूच्या नशेत धुंद असेल आणि तो आमदारांना उडवाउडवीची उत्तरे देत असेल तर आपण न्याय कोणाकडे मागायचा ? मी न्याय मागण्यासाठी सभागृहात विषय मांडला. त्याला आपण केराची टोपली दाखविणार असाल तर न्याय मिळण्यासाठी आम्ही मीडियासमोर जायचे काय, आम्ही प्रत्येक वेळेला न्यायालयात जायचे काय ? मी या प्रकरणी न्यायालयात गेलो होतो. न्यायालयाने स्पष्ट आदेश दिले की, हे प्रकरण सिव्हील आहे. कोणाला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब...

तरी असत्य केसेसमध्ये गुंतवून त्याच्याकडून पैसे उकळावयाचे अशा अधिकाऱ्यांविरुद्ध आवाज उठवावयाचा नाही काय ? एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने चांगले काम केले असेल तर त्याबाबत पोलीस आयुक्तांना पत्र लिहिणारा मी कार्यकर्ता आहे.. मागील अधिवेशनात माननीय गृह राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांनी सांगितले होते की, त्या पोलीस अधिकाऱ्याची चौकशी करून पुढच्या अधिवेशनात अहवाल ठेवण्यात येईल आणि गरज पडल्यास त्यास निलंबित देखील करण्यात येईल. परंतु त्या संदर्भात माझे अजूनपर्यंत साधे स्टेटमेंट देखील घेण्यात आलेले नाही. जर मी असत्य बोलत असेन तर आपण मला तसे सांगावे की, आम्ही चौकशी केली पण आपण असत्य बोलत आहात. हा प्रश्न कोणत्या पक्षाशी संबंधित नाही. मी विरोधी बाकावर होतो त्यावेळी देखील असाच बोलत होतो. मी हे सर्व बोलण्याचे कारण म्हणजे मी त्या ठिकाणी आमदार म्हणून बोलत होतो. आपण रात्रीच्या वेळी पोलीस स्टेशनला जाता किंवा कसे हे मला माहीत नाही. परंतु रात्रीच्या वेळी पोलीस स्टेशनला जाणाऱ्या आमदाराला असा अनुभव जास्त येतो. आम्ही चांगल्या पोलीस अधिकाऱ्यांबद्दल चांगले बोलतो. जसे पोलीस आयुक्त श्री.राकेश मारिया यांना मुंबईची खडान्‌खडा माहिती आहे. दंगल कशी आटोक्यात आणायची याची त्यांना चांगली माहिती आहे. एमआयडीसीमध्ये दंगल झाली होती तेव्हा त्यांनी मला रात्री अडीच वाजता शोधून आणले.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब....

त्यांनी मला सांगितले की, एका गटाला तुम्ही शांत करा आणि दुसऱ्या गटाला मी शांत करतो. त्यांनी सांगितले की, आम्ही आताही पोलीस या नात्याने लाठीमार करु शकतो. परंतु या क्षणाला आम्हाला लाठीमार करायचा नाही, आम्हाला सामाजिक सलोखा बिघडवायचा नाही. महोदय, अशाप्रकारे त्यांनी परिस्थिती हाताळून घडणारी दंगल शांत केली. परवाच्या दिवशी होणारी दंगल सुध्दा शांत केली. गुन्हेगार किंवा अन्य व्यक्तीच्या बाबतीत माहिती घ्यावयाची असेल तर त्यांच्याकडे चांगली यंत्रणा आहे. माझी मागणी आहे की, मुंबईमध्ये असे पोलीस अधिकारी नेमायला पाहिजे की, ज्यांना मुंबईची खडान्खडा माहिती आहे. परंतु आज मुंबईतील लोकसंख्येच्या तुलनेत पोलिसांची संख्या अपुरी आहे.

महोदय, मुंबईमध्ये महिलांच्या चेन स्नॅचिंगच्या घटना सर्रासपणे घडत आहेत. अशाच प्रकारे मंगळसूत्र चोरीला गेलेली एखादी विधवा महिला मला भेटायला येऊन सांगते की, माझे मंगळसूत्र हे माझ्या नवऱ्याचा शेवटचा दागिना होते. माझ्या नवऱ्याचे निधन झाल्यानंतर सुध्दा मी मंगळसूत्र काढले नव्हते. परंतु माझे मंगळसूत्र काही अज्ञात लोकांनी खेचून पळ काढला. महोदय, अशा वेळी आमदार म्हणून काम करताना मला लाज वाटते. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, गृह विभागाचे चेन स्नॅचिंगच्या घटनांवर कोणते नियंत्रण आहे ? महोदय, पोलीस स्टेशनमध्ये प्रत्येक गुन्ह्याच्या संदर्भातील डिटेक्शन रेट नमूद केलेला असतो. परंतु इतर गुन्ह्यातील डिटेक्शनच्या तुलनेत चेन स्नॅचिंग आणि दागिने चोरीच्या घटनांचा डिटेक्शन रेट कमी असतो. या गुन्ह्यांच्या बाबतीत म्हणावे तसे डिटेक्शन होत नाही. यामध्ये पोलिसांचे साटेलोटे आहे काय ?

महोदय, आम्ही अनेक आंदोलने करुन पोलिसांचा मार खाल्ला आहे. या सभागृहाशिवाय अजून दुसरे कोणते सभागृह आहे की, त्या ठिकाणी आम्ही न्याय मागायचा ? महोदय, आमदारांकडे अनेकजण भाबड्या आशेने येतात. त्यांना वाटते की, आमदारांकडे गेलो तर आपला चोरीला गेलेला दागिना मिळण्यास मदत होईल. त्यांना आम्ही पोलीस आमचे ऐकत नाही असे सांगायचे काय ? जे पोलीस चांगले काम करतात त्यांचे मनोधैर्य वाढविण्याची वेळ आली आहे. जे पोलीस अधिकारी/कर्मचारी चांगले काम करतात त्यांना शाबासकी देणारा कोणी नाही. मी चांगले



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब....

काम करणाऱ्या पोलिसांना शाबासकी देतो. परंतु जे चुकीचे काम करतील त्यांना मी कदापि शाबासकी देणार नाही किंवा त्यांचे समर्थन करणार नाही.

महोदय, मला एक पोलीस अधिकारी रात्रीच्या वेळी भेटला आणि त्याने सांगितले की, आज गल्ला बरोबर जमला नाही म्हणून आजचा दिवस चांगला गेला नाही. मी विचारु इच्छितो की, पोलीस अधिकारी गल्ला गोळा करण्यासाठी मॉलमध्ये बसले आहेत की दुकानामध्ये बसले आहेत ? जर पोलीस अधिकाऱ्यांची अशा प्रकारची भाषा असेल तर त्यांच्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. त्यांच्यावर माननीय गृहमंत्र्यांचा दरारा असला पाहिजे. माननीय गृह मंत्र्यांनी डोळे मोठे केले तर पोलीस आयुक्तांनी घाबरले पाहिजे आणि आयुक्तांनी डोळे मोठे केले तर खालचे अधिकारी/कर्मचारी घाबरले पाहिजेत. पण आज कोणी कोणाला घाबरत नाही, कोणी कोणाला विचारत नाही. एखादा मगरूर अधिकारी दारु पिऊन आमदाराला उलटे बोलून सुध्दा त्याच्यावर कारवाई केली जात नसेल तर कोण कोणाला घाबरेल ? किमान रात्री ड्युटीच्या वेळी पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांनी दारु पिऊ नये एवढी आपण अपेक्षा करु शकतो. ही अपेक्षा करणे चुकीचे आहे काय ? कै.गोपीनाथ मुंडे हे जेव्हा गृह मंत्री होते तेव्हा ते आपल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन रात्री पोलीस स्टेशनला अचानक भेटी द्यायचे. मी सुध्दा अनेकदा त्यांच्यासोबत गेलो होतो. माननीय मंत्री श्री.रामदास कदम हे गृह राज्यमंत्री असताना सुध्दा अशाच प्रकारे भेटी द्यायचे. माझी विनंती आहे की, आता सुध्दा माननीय मंत्र्यांनी पोलीस स्टेशनला सरप्राईज व्हिजिट दिली पाहिजे. आज सर्वसामान्य लोकांना पोलिसांबद्दल खूप भीती वाटते. तो रात्री आणि दिवसा पोलीस स्टेशनमध्ये जाताना घाबरतो. पोलिसांनी सर्वसामान्य नागरिकांना वेगळ्या प्रकारची वागणूक दिली तर अडचणीचे होईल. या सर्व गोष्टी करीत असतानाच पोलिसांचे मनोधैर्य वाढविणे आवश्यक आहे. आज पोलीस 180 चौरस फूट क्षेत्रफळाच्या घरात राहतात. याचा सुध्दा कोठे तरी विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, पूर्वीच्या कालखंडात मंत्री महोदयांकडून वारंवार सांगितले जायचे की, राज्यात डान्सबार आणि अवैध धंदे सुरु नाहीत. मी तत्कालीन गृह मंत्री कै.आर.आर.पाटील यांना सांगितले की, तुम्ही आमच्या बरोबर चला. हे धंदे कुठे सुरु आहेत ते मी तुम्हाला दाखवितो.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. त्यामुळे या प्रस्तावावरील चर्चेला वेळ वाढवून द्यावी अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती** : आज दुपारी 1.00 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक घेण्याचे ठरलेले आहे. त्यामुळे आपण केलेल्या विनंतीबाबत 1.00 वाजेनंतर निर्णय घेऊ.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मुंबईतील अवैध धंद्यांबाबत पोलिसांना माहिती नाही असे म्हटले तर त्यावर विश्वास ठेवणारा मी कार्यकर्ता नाही. पोलिसांच्या आशीर्वादाशिवाय आणि त्यांच्या मदतीशिवाय हे अवैध धंदे चालू शकत नाहीत. आजही डान्सबार सुरु आहेत आणि त्याला पोलिसांच्या गाड्यांचे संरक्षण आहे. पोलिसांची गाडी बाहेर उभी असेल तर त्या ठिकाणी डान्सबार सुरु आहे हे समजून घ्यावे. जर सरकारला या बाबतची माहिती हवी असेल तर कोठे काय काय सुरु आहे हे मी दाखवून देतो. महोदय, मागच्या सरकारने घोषणा केली होती की, ज्या क्षेत्रात डान्सबार सुरु असेल त्या क्षेत्रातील पोलीस निरीक्षकाला निलंबित करण्यात येईल. मला वाटते या संदर्भात कारवाई करावयाची झाल्यास मुंबईतील सर्वच पोलीस निरीक्षकांना निलंबित करावे लागेल. एका बाजूला चांगले काम करणारे पोलीस अधिकारी बढतीच्या आणि कौतुकाची थाप पाठीवर बसेल या प्रतिक्षेत आहेत. परंतु त्यांची कोणी दखल घेत नाहीत. कित्येक अधिकारी आज काम करण्यास घाबरत आहेत. आज काही अधिकारी 10-10 वर्षे त्याच त्याच शहरात काम करीत आहेत. जर बदली झाली तर पुन्हा त्याच ठिकाणी परत येतात. माझी विनंती आहे की, किमान गृह विभागाच्या बदली आणि बढती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येणे आवश्यक आहे. मी तर म्हणेन की, या प्रक्रियेमध्ये पोलीस क्षेत्राचे ज्ञान असलेली व्यक्ती असावयास पाहिजे. प्रशासनातील व्यक्तीने हा माझ्या जवळचा आहे, हा माझ्या गावातला आहे म्हणून त्याला अमुक ठिकाणी नेमावयास पाहिजे किंवा बढती द्यावयास पाहिजे, या दृष्टिकोनातून काम करता कामा नये.

महोदय, पोलीस विभागात बदली कशी होते याचे एक उदाहरण माझ्याकडे आहे. लोक निवृत्त होण्याची वेळ आलेली असताना सुध्दा त्यांना बढती मिळालेली नाही. सहायक पोलीस निरीक्षक ते पोलीस निरीक्षक पदोन्नतीबाबतचे हे प्रकरण आहे. त्या फाईलवर केवळ एक सही करावयाची आहे. ही फाईल ऑक्टोबर-2014 ची आहे. सहायक पोलीस निरीक्षक ते पोलीस

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब....

निरीक्षक पदावर पदोन्नतीकरिता शासन आदेशाचे बंधपत्र घेण्यात आले होते. सदर पदोन्नती प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण करुन डिसेंबर-2014 पर्यंत पदोन्नतीबाबतची आदेश प्रक्रिया पूर्ण व्हावयास पाहिजे होती. परंतु मार्च-2015 पर्यंत सदर पदोन्नतीची कोणतीही कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यामुळे नियमानुसार व सेवाज्येष्ठतेप्रमाणे ज्या सहायक पोलीस निरीक्षकांना पदोन्नती मिळणे क्रमप्राप्त आहे त्यांची अद्यापर्यंत पदोन्नती झालेली नाही. महोदय, जे लोक पदोन्नतीची वाट पाहत आहेत त्यातील अनेकजण निवृत्त होत आहेत. ते जर अगोदरच्याच पदावर निवृत्त झाले तर भविष्यात त्यांना जे काही दोन पैसे जास्त मिळणार आहेत ते सुध्दा मिळणार नाहीत. किंबहुना त्यापासून सरकार त्यांना वंचित ठेवणार आहे. असे असेल तर मग सरकारसाठी कोण मन लावून काम करेल ? शासनामध्ये काम करीत असताना शासन सुध्दा माझ्या पाठीमागे मजबूतपणे उभे आहे असे अधिकारी/कर्मचाऱ्यांना वाटले पाहिजे. जर शासन आपल्या मागे उभे राहिले नाही तर या शासनामध्ये कशाला काम करायचे, कशाला चांगला रिझल्ट द्यायचा, अशी भावना त्यांच्या मनामध्ये येईल. एका बाजूला काही पोलिसांनी 180 चौ.फू. क्षेत्रफळाच्या गळक्या घरात राहायचे आणि दुसऱ्या बाजूला एका-एका पोलीस अधिकाऱ्याचे मुंबईत 10-10 फ्लॅट आहेत. अशा अधिकाऱ्यांच्या नावाची यादी मी सरकारला दिली होती.

**तालिका सभापती** : सभागृहाची विशेष बैठक 1.00 वाजता संपणार आहे. मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, आपणांस अजून किती वेळ लागेल ?

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मी पाच मिनिटांत माझे भाषण संपवितो. महोदय, पोलिसांच्या मानसिकतेमध्ये जी दरी निर्माण झालेली आहे ती कमी करणे गरजेचे आहे. शासनाने या बाबतीत तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे. किंबहुना या संदर्भात पोलीस विभागाचे धोरण स्पष्ट असले पाहिजे. या शिवाय गृह विभागातील बदली आणि बढतीची प्रक्रिया स्पष्ट आणि पारदर्शक असली पहिजे.

महोदय, आज मुंबईतील गँगस्टर आणि अतिरेकी कारवाया नियंत्रणात आहेत याचे मुख्य कारण म्हणजे वरच्या पदांवर सक्षम अधिकारी बसलेले आहेत. परंतु तशाच प्रकारचा धाक आणि दरारा खालच्या स्तरापर्यंत आहे काय, याचा सुध्दा विचार केला पाहिजे. जे प्रमुख अधिकारी

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब....

आहेत त्यांना सर्व गोष्टींची माहिती आहे. माझी शासनाला विनंती आहे की, अशा सक्षम अधिकाऱ्यांच्या हाताखाली शासन जी टीम देणार आहे ती सक्षम अधिकारी/कर्मचाऱ्यांची दिली पाहिजे. हा पोलीस अधिकारी/कर्मचारी मला आवडतो, तो त्याला आवडतो किंवा सोयीनुसार त्यांची नेमणूक करु नका. कारण मुंबई ही धगधगती आहे. मी पोलिसांशी अगदी जवळून जोडलेला कार्यकर्ता आहे. मी पोलीस अधिकाऱ्यांचे काम अगदी जवळून पाहतो. क्राईम डिटेक्शनमध्ये लोक कशाप्रकारे काम करतात हे मी पाहिले आहे. या ठिकाणी पोलीस अधिकारी श्री.देवेन भारती बसलेले आहेत. मुंबईतील बॉम्बस्फोटातील त्यांचे काम मी बघितले आहे. महोदय, आम्ही कोणत्याही पोलिसांचे समर्थक नाही. परंतु चांगल्या अधिकाऱ्यांना चांगले म्हणण्याची हिंमत आमच्यामध्ये जशी आहे तशीच वाईटाला वाईट म्हणण्याची किंवा त्यांना विरोध करण्याची हिंमत सुध्दा आमच्यामध्ये आहे. आमची शासनाकडे विनंती आहे की, जे वाईट काम करतात, पोलीस दलाला धब्बा लावणारे काम करतात, खंडणी उकळण्याचे काम करतात किंवा जे लोकांच्या मनामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करतात अशा लोकांवर कारवाई केली पाहिजे.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ दुपारी 01.00 वाजेपर्यंतची होती. आता दुपारचे 01.00 वाजले आहेत. सन्माननीय सदस्यांचे भाषण संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, जे अधिकारी चांगले काम करतात त्यांच्या संदर्भात चांगले धोरण ठेवावे. केवळ सोयीचे राजकारण म्हणून पोलीस विभागातील अधिकारी भरती करू नयेत. दुसरीकडे पोस्टींग देऊ नये. अधिकाऱ्यांना निकषांवर आणावे. मुंबई सुरक्षित ठेवण्यासाठी राज्य शासन व माननीय गृहमंत्री मजबूत आहेत. चुकीच्या गोष्टी कदापि खपवून घेणार नाही, चांगल्या अधिकाऱ्यांच्या पाठीमागे सक्षमपणे उभे राहू असा मेसेज आजच्या चर्चेच्या माध्यमातून द्यावा, अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

**तालिका सभापती** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 01.15 वाजता पुन्हा सुरूहोईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 01.01 ते 01.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**सभागृहात चर्चेला येणाऱ्या तारांकित प्रश्नांबाबत पॉईंट ऑफ प्रोसिजर**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे.

सभापती महोदय, या अधिवेशनात सभागृहात चर्चा झालेल्या तारांकित प्रश्नांची सरासरी आपण काढली तर साधारणपणे तीन ते चार प्रश्नांवरच सभागृहात रोज चर्चा होत आहे. त्यापेक्षा जास्त प्रश्नांवर चर्चा झालेली नाही.

**उप सभापती :** यासाठी सन्माननीय सदस्यच जबाबदार आहेत.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, रोज किमान आठ ते नऊ प्रश्नांवर सभागृहात चर्चा झाली पाहिजे. एका प्रश्नावर केवळ दोन ते तीन उप प्रश्न विचारले जावेत. कारण, दोन महिन्यांअगोदर आम्ही प्रश्न देत असतो आणि जर केवळ रोज दोन-तीन प्रश्नांवरच सभागृहात चर्चा होणार असेल तर अन्य प्रश्नांवर अन्याय होतो. त्या अनुषंगाने आपण सर्वपक्षीय गटनेत्यांची एक बैठक आपल्या दालनात बोलवावी आणि यामधून मार्ग काढावा.

**उप सभापती :** आपण ही बाब माझ्या निदर्शनास आणून देण्याऐवजी सभागृहातील सर्वच सदस्यांनी आपल्यापुरती दक्षता घेतली तर सभागृहाचे कामकाज व्यवस्थित चालविता येईल. प्रश्नोत्तराच्या तासात जास्तीत जास्त प्रश्नांवर सभागृहात चर्चा व्हावी, यासाठी आम्ही भरपूर प्रयत्न करीत असतो. परंतु, सन्माननीय सदस्य उपप्रश्न विचारण्यापूर्वी तो विषय डेव्हलप करण्यासाठी 10-10 मिनिटे घेतात आणि त्यानंतर उत्तरासाठीही मग तेवढाच वेळ जातो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न अतिशय गंभीर आहे. पूर्वी, सन्माननीय श्री.शिवाजीराव देशमुख सभापती असताना या सदनामध्ये आठ ते दहा तारांकित प्रश्नांवर चर्चा होत असे, परंतु, आता आपण उप सभापती म्हणून हे कामकाज चालविण्यास सुरुवात केल्यानंतर तेवढ्या प्रश्नांवर चर्चा होत नाही, असे सन्माननीय सदस्यांना म्हणावयाचे असेल तर ते योग्य आहे का ?

**उप सभापती :** ठीक आहे. आता आपण प्रश्नोत्तराच्या कामकाजाला सुरुवात करु या.

-----------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयाच्या सेवेत आलेल्या बिगर नेट-सेट अधिव्याख्यात्यांच्या सेवा ग्राह्य धरुन इतर सर्व अनुषंगिक लाभ देणेबाबत**

(१) * **३७४९ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, डॉ.सुधीर तांबे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक १७१० ला दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात सन १९९१ ते मार्च, २००० या कालावधीत सेवेत आलेल्या बिगर नेट-सेट अधिव्याख्यात्यांच्या सेवा ग्राह्य धरुन त्यांना इतर सर्व अनुषंगिक लाभ देणेबाबत मा.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार शासन स्तरावरुन फक्त याचिकाकर्त्यांना सेवाविषयक बाबींचे सर्व लाभ देण्यात यावेत असा आदेश निर्गमित झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याचिकाकर्त्यां अधिव्याख्यातांना शासन आदेशानुसार वेतन निश्चितीचे लाभ व सेवा ग्राह्य धरण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे काय,
(३) सन १९९१ ते मार्च, २००० या कालावधीतील उर्वरित बिगर नेट-सेट अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत सेवा ग्राह्य धरुन अनुषंगिक लाभ देण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय. हे खरे आहे.
(२) कार्यवाही सुरु आहे.
(३) या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुमती याचिका क्र.३४११८/२०१३ दाखल करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाला उत्तर देण्यास मी तयार आहे. परंतु, एक बाब मी आपल्या आणि आपल्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, याच विषयाच्या संदर्भात आज सर्वोच्च न्यायालयामध्ये सुनावणी सुरु आहे. आज सभागृहात या विषयावर होणाऱ्या चर्चेतील मुद्दे सुनावणीवर प्रभाव टाकतील, असे मत विधी व न्याय विभागाने दिले आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे म्हणणे असे असेल तर हा प्रश्न राखून ठेवावा, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3749.......

**उप सभापती :** सदर बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे या प्रश्नावर सभागृहात चर्चा होणार नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्णयाबद्दल मी आपले आभार मानतो. तथापि, सन्माननीय सदस्यांचा या विषयासंदर्भातील कन्सर्न योग्य असल्यामुळे नंतर मी माझ्या दालनात सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांबरोबर बैठक आयोजित करतो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आपण हा प्रश्न राखून ठेवावा.

**उप सभापती :** मला हे कळत नाही की, सन्माननीय सदस्य दोन्ही प्रकारे बाजू मांडतात. मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्यांबरोबर बैठक आयोजित करण्याचे मान्य केले आहे. यापेक्षा आपल्याला आणखी काय हवे आहे ? मी निर्णय दिलेला आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शासन या प्रश्नापासून दूर जात आहे, या घटनेचा आम्ही निषेध करतो आणि सभागृहातून बहिर्गमन करतो.

(सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे व अन्य काही सन्माननीय सदस्य सभागृहातून बहिर्गमन करतात.)

-----------------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित**
**शाळेतील शिक्षकांच्या आर्थिक शोषणाबाबत**

(२) ***३२६३ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांना अनुदानित शाळांप्रमाणे वेतन देणे, नियुक्त्या करणे, प्रशिक्षित शिक्षक नेमणे, संच मान्यता व कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता घेणे संबंधित शाळांवर बंधनकारक आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बहुतेक शाळांमध्ये या अटीचे पालन होत नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षकांच्या नियुक्त्यांना मान्यता नसलेले शिक्षकही १० वी व १२ वीचे पेपर तपासण्याचे काम करतात हे खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ जुलै, २०१४ रोजी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) अंशतः खरे आहे.
(३) अंशतः खरे आहे.
(४) निवेदन आढळून आले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांसबंधीचा हा प्रश्न आहे. या राज्यातील इंग्रजी माध्यमातील शाळांना राज्य सरकारकडून अनुदान मिळत नाही. परंतु, राज्याचा सन 1977 चा कायदा आणि सन 1981 चे नियम इंग्रजी माध्यमातील शाळांनाही लागू आहेत. या तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून असा प्रश्न विचारण्यात आला होता की, "राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतरांना अनुदानित शाळांप्रमाणे वेतन देणे, नियुक्त्या करणे, प्रशिक्षित शिक्षक नेमणे, संच मान्यता व कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता घेणे संबंधित शाळांवर बंधनकारक आहे का ?" या प्रश्नाला शासनाने "होय," असे उत्तर दिलेले आहे. या संदर्भात मी शासनाला पत्र, निवेदन पाठविले होते. परंतु, त्याबाबतच्या प्रश्नाला शासनाने "निवेदन आढळून आलेले नाही," असे उत्तर दिले आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3263...

श्री.रामनाथ मोते...

या पत्राची पोच माझ्याकडे आहे, पत्रव्यवहार करुन देखील संबंधित अधिकाऱ्यांकडून असे पत्र आढळून आले नाही, असे उत्तर येत असेल तर ही अतिशय गंभीर बाब आहे, त्यामुळे याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे. माझा प्रश्न असा आहे की, इंग्रजी माध्यमांच्या शाळा शासनाचे नियम पाळत नसतील, संच मान्यता करीत नसतील, शिक्षकांच्या नियुक्त्यांना मान्यता घेत नसतील, क्वॉलिफाईड शिक्षक नियुक्त करीत नसतील, शिक्षकांना शासकीय नियमाप्रमाणे वेतन देणे बंधनकारक आहे ते वेतन देत नसतील तर अशा शाळांची मान्यता शासन काढून घेणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी त्यांचे निवेदन कोणत्या अधिकाऱ्याकडे दिले याची त्यांनी मला माहिती द्यावी, त्याबाबत मी चौकशी करतो. शेवटी लोकप्रतिनिधींचे पत्र अशा प्रकारे गहाळ होणे, हे अतिशय बेपर्वाई व बेदरकारपणाचे आहे, त्यामुळे त्याची दखल घेतली जाईल. आता शिक्षण मंत्री सर्वांचे ऐकत असल्यामुळे मोठ्या संख्येने पत्र येतात. एकेका आमदार महोदयांची 12-12 पत्रे येतात. त्यामुळे चुकून एखादी घटना झाली असेल तर ती मिस्टेक मलाफाईड आहे किंवा बोनाफाईड आहे हे तपासून घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. मी सर्वांची पत्रे वाचतो, सर्व पत्रांना उत्तरे देतो, यापुढे ऑनलाईन मेसेज सिस्टिम येणार आहे, त्यामध्ये तुमचे अमुक क्रमाकांचे पत्र अमुक अधिकाऱ्यांकडे गेले, असा मेसेज येईल. ही सिस्टीम शिक्षण विभाग विकसित करीत आहे.

सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला तो खरा आहे, इंग्रजी माध्यमांच्या विनाअनुदानित शाळांना शासन अनुदान देत नाही. अनुदान देत नसले तरी या शाळेतून राज्यात होणारे शिक्षण गुणवत्ता पूर्ण झाले पाहिजे. शिक्षकांसाठी जे क्वॉलिफिकेशन आवश्यक आहे ते असायला पाहिजे हे शासनाकडून पाहण्यात येते. शिक्षकांकडे क्वॉलिफिकेशन असेल तर गुणवत्ता पूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत जाईल असा अर्थ आपण ढोबळ मानाने काढत असतो. शिक्षकाच्या क्वॉलिफिकेशनची अट आपण टाकतो, त्याच वेळी त्या शिक्षकाला नियमाप्रमाणे वेतनश्रेणी मिळाली पाहिजे असा आग्रह आपण धरतो. ज्या कायम विनाअनुदानित शाळा आहेत, त्यांचे म्हणणे असे

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3263...

श्री.विनोद तावडे...

असते की, आमच्या ताकदीप्रमाणे आम्ही टप्प्याटप्प्याने वेतन देण्याचा प्रयत्न करतो. शाळा सुरु झाल्या झाल्या लगेच वेतनश्रेणी दिली असे होत नाही. सन्माननीय सदस्य असा आग्रह धरीत आहेत की, या शाळा बंद करा, त्यावेळी तेथील विद्यार्थ्यांचे काय करावे हा देखील प्रश्न निर्माण होतो. तरी देखील त्या शाळांना शासनाकडून सांगण्यात येते की, आपण तीन वर्षात या शिक्षकांना नियमित वेतन देण्याचे आश्वासित करा. काही शाळेतील शिक्षक पाच ते सात वर्षे अतिशय कमी पगारावर काम करतात. पुढील तीन ते चार वर्षात टप्प्याटप्प्याने शाळा या सर्व बाबी करु शकतील तर अशा शाळांबाबत शासनाला योग्य भूमिका घेण्यास मदत होते. सर्वात सोपी भूमिका अशी आहे की, एखादी शाळा शासनाचे नियम पाळत नसेल तर ती बंद करा, असा निर्णय घेणे देखील शिक्षक व तेथील विद्यार्थ्यांच्या किती हिताचा असेल, याचा देखील विचार शासनाला करावा लागतो. त्यानुसार शासन योग्य ती कार्यवाही करणार आहे.

श्री.नागो गाणार : सभापती महोदय, राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या कायम विना अनुदानित शाळांना शाळा नियमावली व शिक्षण कायदा 1977 लागू आहे, असे शासनाचे उत्तर आहे. शिक्षण कायदा व नियमावलीचे पालन राज्यातील इंग्रजी माध्यमांची विना अनुदानित एकही शाळा करीत नाही ही वास्तविकता आहे, अशा शाळांविरुध्द शासन कारवाई करणार काय ? याचे उत्तर मंत्री महोदय देतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सर्व शिक्षक आमदारांनी मला प्रस्ताव तयार करुन द्यावा की, शाळेतील मुलांच्या भवितव्याचे काय होईल ते होवो या शाळा बंद करा. अशा शाळा मी उद्याच बंद करतो. असा तोडगा यावर काढता येणार आहे काय ? मला असे वाटते की, शाळांकडून नियमांचे 100 टक्के पालन झाले पाहिजे. नियमांचे पालन करतांना पहिला नियम असा आहे की, शिक्षकांकडे शैक्षणिक गुणवत्ता असली पाहिजे. त्याबाबत कमतरता असेल तर ताबडतोब ती शाळा बंद करता येईल. त्याचप्रमाणे तेथील शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा देखील प्रश्न आहे. त्याबाबत लवचिक धोरण घ्यावे लागेल. सदर शाळेला शासन मनमानी करण्यास परवानगी देत नाही. सरकार अशा शाळांना अनुदान देऊ शकत नाही. अशा वेळी या शाळांबाबत थोडी लवचिक

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3263...

श्री.विनोद तावडे...

भूमिका घेऊन त्या शाळांनी नियमांचे पालन करावे, याकडे शासन लक्ष देणार आहे. हे सरकारचे व्यवहारिक काम आहे या भूमिकेला सर्व सन्माननीय सदस्य पाठिंबा देतील व त्यांनी दिला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री नेहमीच याबाबत सकारात्मक असतात, याबाबत दुमत नाही. परंतु मंत्री महोदय, तुमच्या सारखा माणूस हतबल होऊन असे बोलतो हे मनाला पटण्यासारखे नाही. सभापती महोदय, आपणाला देखील ही बाब ज्ञात आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षणाधिकारी गेले तर केंब्रीज सारख्या शाळा गेट देखील उघडत नाहीत, त्यांना प्रवेश दिला जात नाही. त्या अधिकाऱ्यांना अशा शाळा हाकलून लावतात, इतकी या शाळांची मुजोरी चालली आहे. या शाळा शिक्षकांना वाटेल तेव्हा काढून टाकतात, हे प्रकार थांबले पाहिजेत. या प्रश्नाचा हा मुख्य गाभा आहे, मंत्री महोदयांना माझा असा प्रश्न आहे की, जे शिक्षक कर्मचारी विना अनुदानित इंग्रजी शाळांमध्ये कार्यरत असतात, त्यांना संच मान्यता करुन वैयक्तिक मान्यता देण्याचे बंधनकारक करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्या शिक्षणाधिकाऱ्याला शाळेत प्रवेश दिला नाही, त्या शाळेचे नाव सन्माननीय सदस्यांनी मला द्यावे. दुसरे असे की, एसएससी व एचएसची बोर्डाची शाळा वेगळी आहे, सीबीएसई व आयसीएसई बोर्डाच्या शाळा वेगळ्या आहेत. सीबीएसई व आयसीएसई बोर्डाच्या शाळांबाबत राज्य शासनाला काय अधिकार आहेत, याबाबत सभागृहात चर्चा झालेली आहे. राज्य शासनाला जे अधिकार आहेत, त्या सर्व बाबी करण्यास शासन तयार आहे. अशा मुजोर शाळांना एनओसी देण्याच्या वेळी सरकार अडवणूक करते. मला माफ करा, त्यावेळी आपल्यातील दहा लोक येतात व त्या शाळेला एनओसी द्यावी असे म्हणतात, कारण विद्यार्थ्यांचा प्रश्न असतो. यासंदर्भात शासनाची नियमावली आहे, नियमावली किती तुटपुंजी आहे, याची आपणाला माहिती आहे. शिक्षण हक्क कायद्यामुळे शुल्क नियंत्रण राज्य शासनाच्या अखत्यारित आले आहे. त्यामुळे या शाळांवर काही तरी प्रमाणात शासनाला वचक ठेवता येतो. ज्या शाळा चांगले काम करतात, त्यांना प्रोत्साहन देण्यात येते. परंतु आयसीएसई व सीबीएसई शाळांना या

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3263...

श्री.विनोद तावडे...

राज्यात वाटेल ते करण्यास सरकार परवानगी देणार नाही. या सर्व विषयांमध्ये सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी संच मान्यतेचा विषय उपस्थित केला आहे, त्याबाबत मी पुन्हा असे सांगतो की, शैक्षणिक अर्हता व नियमाने वेतनश्रेणी देण्याचा आग्रह शासनाचा देखील आहे.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, मघाशी मंत्री महोदयांनी सांगितले की, सीबीएसई व आयसीएसई शाळांची मुजोरी व मनमानी चालू देणार नाही. त्याबाबत मी त्यांचा आभारी आहे. लॉयन इंटरनॅशनल या शाळेने शिक्षकांचे पगार अडवून ठेवले आहेत. एखाद्या राजकीय पक्षाचे सभासद व्हा, हा फार्म भरा, नाही तर तुमचे पगार दिले जाणार नाहीत, तुमच्या नोकरीवर गदा येईल. असे म्हणणाऱ्या संस्थांवर शासन दंडात्मक कारवाई करणार काय ?

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांना मी सांगू इच्छितो की, आपण जी संस्था सांगितली त्या संस्थेच्या संदर्भातील माहिती माझ्याकडे आली असून त्या संस्थेची चौकशी सुरु केलेली आहे, चौकशीचा अहवाल आल्यावर पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळांवर क्वॉलिफाईड शिक्षक पाहिजेत, असा प्रश्न उपस्थित केला आहे. टप्प्याटप्प्याने ही कार्यवाही होईल असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे, मंत्री महोदयांचे म्हणणे बरोबर आहे. आम्ही जेव्हा शाळेत व हायस्कूलमध्ये शिकत होतो तेव्हा पीटीचे शिक्षक शिकवित होते. पहिल्या वर्षी कॉलेजमध्ये गेलेल्या शिक्षकाने मला शिकविले आहे. अशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून इंग्रजी माध्यमांची डीएड आणि बीएड कॉलेजेस वाढविण्यात येतील काय ? ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील इंग्रजी माध्यमांच्या शाळेत शिक्षण घेतात. मराठी माध्यमांच्या शाळांचा दर्जा बरोबर नाही. मराठी माध्यमांचा दर्जा सुधारण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य शासन घेईल काय ?

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3263.......

श्री.जयंत प्र.पाटील...........

जेणे करुन मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये जाणार नाहीत यासाठी शिक्षकांची गुणवत्ता टिकविण्याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील स्वतः मराठी माध्यमाच्या शाळा चालवितात. खऱ्या अर्थाने ते शिक्षण महर्षी आहेत. त्यांच्या अनुभवाच्या आधारे त्यांनी काही सूचना केल्या असतील तर आम्ही त्याचा जरुर विचार करु.

----------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नगरपालिका क्षेत्रांतर्गत असलेल्या शाळांना वेतन वेळेवर मिळत नसल्याबाबत**

(३) * **२८७५ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगरपालिका क्षेत्रांतर्गत असलेल्या शाळांना वेतन वेळेवर मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील शाळा शासनाकडे वर्ग करण्याविषयी शासनाचे धोरण काय आहे,
(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, खरे म्हणजे मी हा प्रश्न नगर विकास विभागाला विचारला होता. माननीय शिक्षण मंत्री या तारांकित प्रश्नाला उत्तर देणार आहेत. त्यामुळे काही हरकत नाही. महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षण मंडळाच्या शाळांना शासन 50 टक्के अनुदान देते आणि उर्वरित 50 टक्के अनुदान महानगरपालिका देते. तसेच, नगरपालिका क्षेत्रातील शिक्षण मंडळाच्या शाळांना 90 टक्के अनुदान नगरपालिका देते आणि 10 टक्के अनुदान शासन देते. शासनाकडून वेळेवर अनुदान दिले जाते. परंतु, महानगरपालिका विशेषत: "ड" वर्ग महानगरपालिका हे अनुदान वेळेवर देऊ शकत नाहीत. त्यामुळे शिक्षकांचे वेतन वर्षानुवर्षे थकेलेले आहे. उदाहरणार्थ मालेगाव महानगरपालिकेचे 13 कोटी रुपये वेतन थकलेले आहे. ते लोक कोर्टात गेले आणि कोर्टाने आदेश दिले की, 15 दिवसात त्यांचे वेतन द्यावे. वेतनाअभावी शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर उपासमार होत आहे. माझी शासनाला विनंती आहे की, आपण ज्या प्रमाणे नगरपालिकेच्या सहायक अनुदानातून 10 टक्के अनुदान....

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण कृपया स्पेसिफिक प्रश्न विचारावा. कारण प्रश्न डेव्हलप करण्यामध्ये सभागृहाचा वेळ जातो आणि त्यामुळे इतर सन्माननीय सदस्यांवर अन्याय होतो.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2875.......

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, ज्या प्रमाणे आपण नगरपालिकेला सहायक वेतनातून 10 टक्के अनुदान देता त्याच प्रमाणे आपण 50 टक्के अनुदान थेट शिक्षण मंडळाकडे देणार आहात काय ? जेणे करुन महानगरपालिकेच्या शाळेतील शिक्षकांचे वेतन वेळेवर होईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी सांगितल्याप्रमाणे हा प्रश्न नगर विकास विभागाचा आहे. (...अडथळा...) हा प्रश्न आमच्या विभागाकडे आल्यानंतर आम्ही तो नगर विकास विभागाकडे पाठविला होता. त्यानंतर विधिमंडळाने हा प्रश्न पुन्हा आमच्या विभागाला मार्क केला होता. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे साहेब, शेवटी सर्व प्रश्न स्वीकारायला आम्ही तयारच असतो.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे.

**उप सभापती** : मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावेत. प्रश्न डेव्हलप करुन सभागृहाचा वेळ घेऊ नये. मी प्रश्न विचारतो आणि सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मंत्री महोदय उत्तर देत आहेत. परंतु, या संदर्भात कोणीही गंभीर दिसत नाही. त्यामुळे मी आता पुढील प्रश्न पुकारतो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवावा.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण स्पेसिफिक प्रश्न विचारावेत. प्रश्न डेव्हलप केला तर त्यामध्ये सभागृहाचा वेळ जातो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुधीर तांबे यांनी सांगितल्याप्रमाणे शिक्षण विभागातर्फे 90 टक्के अनुदान वेळेवर पाठविले जाते. महानगरपालिका, नगरपालिकांना हे अनुदान मिळाल्यानंतर त्यांनी 10 टक्के रक्कम त्यामध्ये जमा करुन ताबडतोब शिक्षकांना पगार दिले पाहिजेत. परंतु आलेला निधी रस्ते, पाणी, गटार दुरुस्ती इत्यादी कामांसाठी

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2875.......

श्री.विनोद तावडे........

वापरला जातो आणि त्यानंतर शिक्षकांचे पगार होतात. नगर विकास विभागाच्या मंत्री महोदयांबरोबर शिक्षक आमदारांची बैठक आयोजित करुन हा प्रश्न कायम स्वरुपी सोडविण्याचा आम्ही निर्णय घेतो.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, ज्या प्रमाणे खाजगी संस्थांना 100 टक्के अनुदान दिले जाते त्या प्रमाणे नगरपालिका क्षेत्रातील शिक्षण मंडळाच्या शाळांना 100 टक्के अनुदान देण्यात येणार आहे काय ? म्हणजे, हा प्रश्नच सुटेल. शासनाने 100 टक्के अनुदान दिले तर 10 टक्के आणि 90 टक्के अनुदानाचा प्रश्नच शिल्लक राहणार नाही. आपण खाजगी संस्थांना जसे 100 टक्के अनुदान देतो तसे नगरपालिकेच्या शाळांना आपण 100 टक्के अनुदान देणार आहात काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी साहेब, आपल्या डोक्यात जी कल्पना आहे ती माझ्या आणि इतर सर्वांच्याच डोक्यात आलेली आहे. आम्ही मंत्री पदाची शपथ घेताना घटनेचे पालन करु, अशी शपथ घेतलेली आहे आणि घटनेमध्ये शिक्षण हे स्थानिक स्वराज्य संस्थांकडेच असले पाहिजे, असे नमूद केलेले आहे. त्याची कारणे आहेत. मी त्यावर वेगळे भाषण देऊ शकतो. आपल्याला 90 रुपये, 100 रुपये देणे काहीच अडचणीचे नाही. परंतु, घटनेने या विषयाकडे पाहण्याचा जो दृष्टीकोन ठेवलेला आहे त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांवर तेथील विकासाची जबाबदारी सोपविलेली आहे. आपण पाहिजे तर या विषयावर वेगळी चर्चाही करु शकतो. मला हे करायला आवडेल. त्यामुळे आपोआप हा विषय संपेल. परंतु ते करता येत नाही.

---------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नागपूर येथील अतिविशेषोपचार रुग्णालयातील नादुरुस्त डायलिसीस मशीन दुरुस्त करण्याबाबत**

(४) * **४१२९ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील अतिविशेषोपचार रुग्णालयातील नऊ पैकी पाच मशिन बंद पडल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किडनी आजारात जीवनदायी असणाऱ्या केवळ चार डायलिसिस मशिनवर भार पडत असून रुग्णांना डायलिसिससाठी प्रतीक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही रुग्णांचे आठवड्यातून दोन ते तीन वेळा हिमोडायलिसिस करावे लागते व त्यात रुग्णांची संख्या वाढल्याने गरीब रुग्णालयांना खाजगी रुग्णालयात जावे लागत असून तेथील दर त्यांना परवडत नसल्याने डायलिसिस अभावी रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीनुसार सदर रुग्णालयातील नादुरुस्त डायलिसिस मशीन्स त्वरित दुरूस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
संस्थेमध्ये उर्वरित चार यंत्रावर रुग्णांना डायलिसिस देण्यात येते. त्यामुळे रुग्णांना डायलिसिससाठी प्रतीक्षा करावी लागत नाही.
(३) हे खरे नाही.
(४) नादुरुस्त यंत्राचे आयुष्यमान संपल्यामुळे संस्थेकडून केलेल्या मागणीनुसार शासनाने शा.नि.क्र. : खरेदी-२०१४/प्र.क्र.४०३/१४ प्रशा-१, दि.१.१०.२०१४ अन्वये ३ हिमोडायलिसीस यंत्रे खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे संचालनालय स्तरावर ३ नवीन यंत्राच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात 9 पैकी 5 मशिन्स बंद पडल्याचे मान्य केलेले आहे. मी दुसऱ्या क्रमांकाचा लेखी प्रश्न विचारला होता की, "किडनी आजारात जीवनदायी असणाऱ्या केवळ चार डायलिसिस मशिनवर भार पडत असून रूग्णांना डायलिसिससाठी प्रतीक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय ?" परंतु, या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. या प्रश्नाला जे उत्तर दिलेले आहे ते असत्य आहे. दिनांक



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4129......

प्रा.जोगेंद्र कवाडे........

01.10.2014 अन्वये 3 हिमोडायलिसीस यंत्रे खरेदी करण्यासाठी शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्या प्रमाणे संचालनालय स्तरावर 3 नवीन यंत्रांच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे. ही यंत्रे खरेदी करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर येथील अतिविशेषोपचार रुग्णालयातील 9 पैकी 5 मशिन्स बंद पडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय, असा लेखी प्रश्न विचारलेला आहे. मी सांगू इच्छितो की, या रुग्णालयात सन 2008 पासून 2015 पर्यंत 4 डायलिसीस मशिन्स व्यवस्थित सुरु आहेत. सन 2008 मध्ये तेथे 6 मशिन्स होत्या. त्यापैकी 2 मशिन्स बंद होत्या आणि 4 मशिन्स सुरु होत्या. सन 2009 मध्ये 4 मशिन्स होत्या. परंतु डायलिसीस मशीन ठरावीक वापरानंतर जुनी होते आणि नंतर ती मशीन काम करीत नाही. त्यामुळे त्या मशिन्स काढाव्या लागतात. त्या ठिकाणी मशिन्स आहेत काय, तर त्या ठिकाणी फिजिकली मशिन्स आहेत. परंतु, त्या मशिन्सचा वापर होऊ शकत नाही. तेथे 4 मशिन्स आहेत. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी दुसरा प्रश्न विचारला की, रुग्णांवर ताण पडत आहे काय ? मी सांगू इच्छितो की, राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या माध्यमातून डायलिसिससाठी अनुदान मिळते. नागपूर आणि परिसरामध्ये किती रुग्णांनी डायलिसिस करुन घेतले, याची मी माहिती घेतली. साधारणतः महिन्याला 100 रुग्ण अशी ती आकडेवारी आहे. तेथे प्रतीक्षा यादी आहे काय, याबाबत मी सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी रुग्ण आला आणि तातडी असेल तर त्या रुग्णाला घेतले जाते, अन्यथा त्याला दुसऱ्या ठिकाणी पाठवून राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या माध्यमातून ते केले जाते. खरे म्हणजे मेडिकल उपकरणाच्या खरेदी संदर्भात आपण महामंडळच स्थापन करण्याचे ठरविले पाहिजे. जिल्हापरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य विभाग या सर्वांतर्फे करण्यात येणारी औषध खरेदी एकत्र केली तर आताच्या पैशात 40

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

टक्के औषधे जास्त मिळतील आणि असे एखादे महामंडळ करण्याचा विचार मुख्यमंत्री महोदयांनी

..7...



ता.प्र.क्र.4129......

श्री.विनोद तावडे.........

देखील मान्य केलेला आहे. आम्ही तो येत्या काळात करू म्हणजे पैसेही वाचतील आणि वेळेत होईल. हिमोडायलिसीस यंत्रे खरेदी करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आणून ती पुढील दोन महिन्यात पूर्ण करुन आम्ही त्या ठिकाणी पुन्हा मशिन्स पुरवीत आहोत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, वास्तविक पाहता नागपूर विभागात याच ठिकाणी डायलिसिस होते. इतर जिल्ह्यात डायलिसिस सेंटर नाहीत. त्यामुळे रुग्णांची येथे सोय होत नसल्यामुळे ते खाजगी रुग्णालयात जातात आणि आर्थिक दृष्ट्या त्यांना ते परवडत नाही. रुग्ण कमी आहेत, जास्त आहेत, हा विषय नाही. तेथे 9 डायलिसिस मशिन्स होत्या. त्यापैकी 4 मशिन्स सुरुआहेत आणि 5 मशिन्स बंद आहेत. त्या मशिन्स ताबडतोब सुरु केल्या तर आजूबाजूच्या पाचही जिल्ह्यातील रुग्णांना त्या ठिकाणी त्याचा फायदा होऊ शकतो. म्हणून आपण लवकरात लवकर पाचही डायलिसिस मशिन्स बसविणार आहात काय ?

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4129.......

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, 9 मशिन्स कधीच कार्यरत नव्हत्या. कधी 4 मशिन्स किंवा एखाद्या महिन्यात 5 मशिन्स सुरु असायच्या. 2008 पासून फक्त 4 मशिन्सवर काम सुरु आहे. आता अधिक मशिन्स देत आहोत. त्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. काल अर्थसंकल्पामध्ये वित्तमंत्री महोदयांनी महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुरेसा निधी दिलेला आहे. तेथे 4 ऐवजी 8 मशिन्स देत आहोत, काळजी करु नका.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, 3 डायलिसीस यंत्रे खरेदी करण्याची प्रक्रिया संचालनालय स्तरावर सुरु आहे. प्रशासकीय मान्यता देऊन सहा महिने झाले आहेत. अजून या प्रक्रियेमध्ये काही प्रगती झाल्याचे दिसून येत नाही. ही खरेदी प्रक्रिया कधी पूर्ण होईल? दिनांक 1.10.2014 रोजी या खरेदीस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. या मशिन्स केव्हा खरेदी करणार आहात?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हिमोडायलिसीस मशीन खरेदीबाबत आधीच्या सरकारची सवय होती की अधिकाऱ्यांची सवय होती हे मला माहिती नाही. परंतु टेंडरमध्ये जे नॉर्म्स अंतर्भूत केले जात होते ते विशिष्ट प्रकारच्या कंपनीला फायदा व्हावा या दृष्टीने होते. कोणाच्या सांगण्यामुळे हे होत होते याची मला माहिती नाही. परंतु या मशीनच्या विषयामध्ये युएस एफडीए आणि सीईची मान्यता घ्यावी लागते. युरोपियन कंट्री आणि युएसए या दोघांची मान्यता घ्यायची म्हटले तर एका विशिष्ट कंपनीला काम मिळते. त्यात "ऑर" म्हटले तर आणखी काही स्पर्धक वाढतात. ऑर म्हटल्यानंतर विशिष्ट कंपनीकडून 4.5 लाख रुपये अधिक किंमतीचे मशीन खरेदी करावे लागते. मी याबाबत आरोग्यमंत्र्यांकडे विचारणा केली, सीई म्हणजे युरोपियन कंट्रीची मान्यता घेतल्यानंतर जे मशीन घेतले जाते त्यामुळे पेशंट मरतो का, परिणाम होतो का? ते म्हणाले, ते मशीन चांगले आहे. ब-याच ठिकाणी ते वापरले जाते. ते वापरल्यानंतर सुध्दा डायलेसीस होते. असे असताना 4.5 लाख रुपये अधिक मोजून आपण मशीन का खरेदी करतो, त्यामुळे दोन महिन्यात यामध्ये दुरुस्ती करुन गरज असेल तर स्वस्त किंमतीची डायलिसीस मशीन घ्यावी किंवा दुसऱ्या एखाद्या महाविद्यालयामध्ये वा महापालिकेच्या आरोग्य विभागामध्ये उपयुक्त मशीन असेल तर तसे मशीन खरेदी करण्याचा आम्हाला अधिकार असल्यामुळे स्वस्त असेल तर त्याच किंमतीमध्ये आम्ही मशीन घेण्याचा विचार करीत आहोत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

19-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Q.2

SGB/ AKN/ ST/ 13:40

ता.प्र.क्र.4129.....

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात यंत्राचे आयुष्यमान संपले असल्याचा उल्लेख केला आहे. एकूणच डायलिसीस किंवा इतर आजारासाठी उपकरणे खरेदी करावी लागतात, त्या यंत्रांबाबतचा स्टेटस रिपोर्ट घेतला आहे काय? जी यंत्रे उपलब्ध आहेत, त्यांची खरेदी कोणत्या वर्षी करण्यात आली, आयुष्यमान केव्हा संपणार आहे? डायलिसीसची वाढती गरज लक्षात घेता 4 यंत्रे उपलब्ध असताना वेटिंग लिस्ट नाही असे म्हटले जाते. परंतु या यंत्रांचे आयुष्यमान संपल्यानंतर फरक पडणार आहे. त्या दृष्टीने ही यंत्रे खरेदी करताना भविष्यात ज्याप्रमाणे गरज लागणार आहे त्या गरजेप्रमाणे खरेदीचे नियोजन विभागामार्फत केलेले आहे काय?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जो मुद्दा मांडला त्याच संदर्भात माननीय आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत, नगरविकास राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील आणि मी अशी तिघांची समन्वय समिती केली आहे. आमच्यामध्ये चांगला समन्वय आहे. ते दोघे डॉक्टर आहेत आणि मी इंजिनिअर आहे. मेडिकल टेक्नॉलॉजीचा जनतेच्या हितासाठी योग्य वापर कशा प्रकारे करता येईल याचा विचार करीत आहोत. माननीय सदस्यांचा प्रश्न हा सजेशन फॉर ॲक्शन.

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**कला, क्रीडा, संगीत शिक्षकांच्या नेमणुका अर्धवेळ केल्यामुळे निर्माण झालेला असंतोष**

**(५) * ३३६८ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कला, क्रीडा, संगीत शिक्षकांच्या नेमणुका अर्धवेळ केल्यामुळे विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे एकाच वेळी नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शिक्षणाच्या कायद्यात सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी चारही प्रश्नांना "प्रश्न उद्‌भवत नाही" असे उत्तर दिले आहे. पु.ल.देशपांडे म्हणायचे की, कला, क्रीडा व संगीत शिक्षण जगायचे कशासाठी यासाठी महत्वाचे आहे. त्याकरिता शिक्षण हक्क कायद्यात दुरुस्तीची गरज आहे. असे असताना प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर दिले आहे. त्यामध्ये सुधारणा करणार आहात काय? शिक्षण हक्क कायद्यांतर्गत पहिली ते आठवी अर्धवेळ आणि नववी ते दहावी पूर्णवेळ कला शिक्षक देता येतो. या तीनही विषयाचे शिक्षण पूर्णवेळ मिळावे, कला, क्रीडा क्षेत्रात महाराष्ट्राचे नाव पुढे यावे यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्यात येईल काय?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कला, क्रीडा व संगीत हे विषय अतिशय महत्वाचे आहेत. लॉर्ड मेकॉले पध्दतीच्या आयक्यूला इक्यूची जोड द्यायची असेल तर कला, क्रीडा व संगीत शिक्षणाची आवश्यकता आहे, याची जाण असणारे सरकार सत्तेवर आलेले आहे. या विषयांना प्राधान्य देणे हे सरकारच्या विचारात नक्की आहे. अर्थात हा विषय कोर्टात गेल्यानंतर या पदांना मान्यता द्यावी हे कोर्टाने स्पष्ट केले आहे. आम्हाला त्याच्या पलीकडे जायचे आहे. सध्या केंद्रातील मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या माध्यमातून एक कल्पना पुढे आली आहे. त्याची व्यावहारिकता तपासून बघत आहोत. नीट नियमावली तयार करून संगीत, कला व क्रीडा शिक्षकांचा पूल तयार करावा, तो सेंट्रल पूल तयार केला तर शिक्षकांना योग्य वेतन मिळेल आणि

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

19-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Q.4

SGB/ AKN/ ST/ 13:40

ता.प्र.क्र.3368.....

श्री.विनोद तावडे....

विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळेल. हे शिक्षक सन्मानाचे काम करतात. पूल केला तर ते खऱ्या अर्थाने पूर्ण होऊ शकते आणि अधिक विद्यार्थ्यांना लाभ होऊ शकतो. याचा विचार आम्ही करीत आहोत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी थोडे चुकीचे उत्तर दिले आहे. कला, क्रीडा व संगीत या विषयाचे ज्ञान असलेला पूर्णवेळ शिक्षक जर शाळेला दिला तर फार मोठे काम होणार आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार या तीन विषयाचे शिक्षक अर्धवेळ द्यावे लागणार आहेत. कला, क्रीडा व संगीत शिकविणारे शिक्षक पूर्णवेळ देण्याबाबत सरकार विचार करणार आहे का?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एकाच व्यक्तीमध्ये कला, क्रीडा व संगीत असे सर्व गुण असतील तर ते शिकविण्यास उपयुक्त आहेत.

श्री.विक्रम काळे : असे बेरोजगार तरुण महाराष्ट्रामध्ये आहेत.

नंतर आर.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3368...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने सेंट्रल पूल करण्यासंबंधी योजना सुचविली आहे. ही अतिशय चांगली योजना असल्यामुळे मानधन देण्यासंबंधीचा विचार नक्की करण्यात येईल.

......

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**बीड जिल्ह्यातील प्राथमिक शाळांच्या इमारतींच्या थकीत भाडयाची रक्कम मिळण्याबाबत**

**(6) * ३६५८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बीड जिल्हा परिषद संचलित प्राथमिक शाळांचे भाडे सन २००८ पासून थकलेले आहे, थकीत रक्कम रु.९१ लक्षची मागणी शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडे दिनांक १९ मार्च, २०१४ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, वर्षानुवर्षे इमारत भाडे न मिळाल्यामुळे इमारत मालकांनी शाळेला कुलूप लावण्याचा इशाराही दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी शिक्षण संचालक, पुणे यांना दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) असल्यास, जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे इमारत भाडे अदा करण्यासाठी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय
(2) होय
(3) मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या निवेदनाबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मा.लोकप्रतिनिधींनी दि.२०/०१/२०१५ अन्वये उत्तर दिले आहे.
(4) जिल्हा परिषद बीड कार्यालयाकडे असलेली अखर्चित रक्कम शासनाकडे भरणा झालेली नाही. त्यामुळे इमारत भाड्याची रक्कम मंजूर करता येत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, बीड जिल्ह्यात प्राथमिक शाळांना इमारती नसल्यामुळे इमारती भाड्याने घेण्यात आलेल्या आहेत. 19 अशा शाळा आहेत की त्या शाळांच्या इमारतीचे भाडे 2010 पासून थकित आहे. त्या घर मालकांनी त्या शाळेत काम करीत असलेल्या शिक्षकांना, मुख्याध्यापकांना ..... (अडथळा).... सभापती महोदय, अशा प्रकारे अडथळा आणणे महत्त्वाचे आहे काय ? असे असेल तर मला देखील चांगल्या प्रकारे अडथळा आणता येतो.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3658

**उप सभापती :** आपणाला जे काही करायचे असेल ते करा. पण आता आपण प्रश्न विचारावा.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, शासनाकडून इमारतीचे भाडे न मिळाल्यामुळे घर मालक विद्यार्थ्यांसमोर त्या शाळांमधील महिला मुख्याध्यापक व शिक्षकांशी अरेरावीने वागतात. शाळेत विद्यार्थी आल्यानंतर त्यांच्या समोरच शाळेला कुलूप लावण्यात येत आहे. तेव्हा थकित भाडे देण्यासंबंधी शासन तातडीने पावले उचलणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी एक महत्त्वाचा प्रश्न विचारलेला आहे. आम्ही जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये पैसे पाठविले होते. त्या बँकेतच भानगड झाली. ती का झाली, कुठे झाली हा आपला विषय नाही.

श्री.गिरीश बापट (बसून) : ती कोणी केली ?

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी सन्माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांना आव्हान देतो की, त्यांनी यासंबंधातील सीआयडी मार्फत चौकशी करावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना एवढे चिडायला काय झाले आहे ?

**उप सभापती :** आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी. प्रश्न काय आणि चालले आहे काय ?

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. बँक पैसे देणारच नसेल तर मग सरकार पैसे देणारच नाही का ? बँकेत काय झाले, कसे झाले हे माननीय मंत्री महोदयांनी सांगण्यापेक्षा ते पैसे बँक देऊ शकत नसेल तर सरकार भाड्या पोटी थकित असलेले पैसे देणार आहे की नाही यासंबंधीचे उत्तर द्यावे. त्या घर मालकांना भाडे मिळाले पाहिजे असे आमचे म्हणणे आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य धीर का धरत नाहीत हेच मला कळत नाही. मी फक्त बँकेत भानगडी झाल्यामुळे घर मालकांना पैसे मिळाले नाहीत एवढेच सांगितले आहे. ते पैसे का गेले नाहीत असे आपण पुन्हा विचाराल म्हणून आधीच स्पष्ट उत्तर दिले. बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये झालेल्या भानगडीत कोर्टाने 12 कोटी रुपयांपैकी फक्त 1

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3658

श्री.विनोद तावडे....

कोटी रूपयेच द्यावेत असे सांगितले आहे. त्याच्या तपशीलात मी गेलोच नाही. त्यासाठी हवे तर वेगळे जाता येईल. आम्ही भाड्याच्या पोटी असलेला पैसा दिलेला आहे. तो पैसा बँकेत गेला. परंतु, ती बँक बुडाली. त्यामुळे तो पैसा घर मालकांपर्यंत गेला नाही. एकदा पैसा वित्त विभागाकडून वितरित झाल्यानंतर पुन्हा त्याच कारणांसाठी वितरित करण्याबाबत पाठपुरावा करावा लागतो. आपण सहकारी साखर कारखान्यांसाठी सहकार आयुक्तांच्या मार्फत लोन देण्यासंबंधातील वेगळी योजना केली आहे. तसेच, वर्धा, धुळे या बँका बुडित निघाल्या असताना त्यात मार्ग काढला होता. त्याच पद्धतीने आपल्याला यात मार्ग काढावा लागेल. शासनाचा पैसा एकीकडून काढून दुसरीकडे टाकता येत नाही हे सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना देखील माहीत आहे. या इमारतीत भरणाऱ्या शाळा बंद पडता कामा नये अशी चिंता सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे सहकार विभाग आणि वित्त विभाग यांच्याशी चर्चा करून इमारत भाड्याच्या पोटी थकित असलेली रक्कम देण्यापुरते सहकार्य करावे अशी विनंती करण्यात येईल. सहकार विभाग आणि वित्त विभाग यांच्याशी चर्चा केल्यानंतर थकित भाड्यांची रक्कम दिली जाईल व तेथील अडचणी दूर केल्या जातील.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन 2014-15 मधील देखील भाडे देण्यात आलेले नाही. आपण जुनी गोष्ट सांगितली आहे. त्यात तथ्य असू शकेल. सन 2014-15 मधील भाडे न दिल्यामुळे आज तेथील परिस्थिती विदारक झालेली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, युटिलिटी सर्टीफिकेट सादर केल्यानंतर मग शासनाकडून अनुदान दिले जाते. सभापती महोदय, मी यातून मार्ग काढणार आहे. शेवटी शाळा चालविणे ही माझी जबाबदारी आहे. त्या शाळा चालविल्या जातील. त्यासाठी वित्त व सहकार विभागाकडून सहकार्य घेण्यात येईल.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3658

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मागच्या काळात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी भाडे मिळत नसल्यामुळे 7 स्मरणपत्रे माननीय शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना पाठविलेली आहेत. येथे बँकेचा संदर्भ देण्यात आलेला आहे. त्या बँकेमध्ये जिल्हा परिषदेची खाती देखील असू शकतात. त्या बँकेची त्या जिल्ह्यामध्ये अडचण आलेली नाही. समजा येथे अडचण आली असेल तर ती तात्काळ दूर करून भाडे लवकर देण्यात यावे. असे होत नसेल तर जिल्हा परिषदेने दुसऱ्या बँकेत खाते उघडून त्याद्वारे पैसे द्यावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, समोर बसल्यानंतर सर्व सूचना या सोप्या वाटतात. पण सगळ्या बाबी जी.आर.मध्ये बसवाव्या लागतात. सरकारचा पैसा कुठल्या बँकेच्या माध्यमातून देण्यात यावा यासाठी देखील नियम आहेत. बुडित जाणाऱ्या किंवा गेलेल्या बँकेतील पैसा काढावयाचा असेल तर नियम करावे लागतील. यापूर्वी देखील माननीय लोकप्रतिनिधींनी पत्रे दिलेली आहेत. हे सरकार आल्यानंतर एखाद दुसरे पत्र आले आहे. तत्पूर्वी 4-5 पत्रे आली आहेत. त्यावेळी शिक्षण आयुक्तांनी ती पत्रे माननीय तत्कालीन शिक्षण मंत्र्यांकडे पाठविली होती. पण त्यासंबंधी निर्णय का झाला नाही हे मला माहीत नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सूचना केल्याप्रमाणे यात मार्ग काढून शाळेवर अन्याय होऊन होऊ देणार नाही. यात मी स्वतः लक्ष घालीन.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, जून महिना आला की, घर मालक शाळांना कुलूप लावतात. लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला कुलूप काढावे लागते. त्यामुळे माननीय मंत्र्यांनी बाणेदार उत्तर द्यावे की, अशा शाळांसाठी इमारती बांधण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत ठोस कार्यक्रम राबविण्यात येईल. तेव्हा या शाळांच्या इमारती बांधण्यासाठी आपण कोणती पावले उचलणार आहात ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, जिल्हा परिषदांच्या शाळांच्या इमारतीचे काम जिल्हा परिषदच बघते हे सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना माहीत असेल. त्यामुळे त्या शाळांसाठी आम्ही इमारती बांधणार नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांची सूचना मी माननीय ग्रामविकास मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्याकडे पोहोचवितो.

.....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पूर्णवेळ निदेशकांना पूर्णवेळ शिक्षकांप्रमाणे वेतन श्रेणीतील ग्रेड-पे मिळणेबाबत**

**(7) * 3548 ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सन १९८८ पासून राज्यातील १३२९ संस्थामधून +२ स्तरावरील किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमम(former mcvc) शिकविण्यासाठी निदेशकांची पदे निर्माण करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, पूर्णवेळ शिक्षक व पूर्णवेळ निदेशक यांचे शैक्षणिक कार्य एकाच स्वरुपाचे असताना पूर्णवेळ निदेशकांना पूर्णवेळ शिक्षकांपेक्षा वेतनश्रेणीत कमी पे ग्रेड देण्यात येत असल्याच्या तक्रारी-निवेदने संबंधित पूर्णवेळ निदेशक व त्यांच्या संघटनांनी माहे जून, २०१४ मध्ये संचालक, व्यवसायिक शिक्षण व प्रशिक्षण तसेच प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय व तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना दिनांक १२ जुलै, २०१४ रोजी व माहे डिसेंबर, २०१४ मध्ये सादर केली आहेत, हेही खरे आहे काय,
(3) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(4) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, त्याचे कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(3) व (४) शासन स्तरावर स्वतंत्र समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला, तथापि, संचालनालय स्तरावरुन शाळा संहिता तयार करण्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्याने स्वतंत्र समिती अद्याप नेमण्यात आली नाही.

ॲड.निरंजर डावखरे : सभापती महोदय, माध्यमिक शाळांमध्ये तांत्रिक पदावर कार्यरत असलेले अधिव्याख्याते हे पदनाम दिनांक 5 फेब्रुवारी 2015 रोजीच्या शासन आदेशान्वये पूर्ण वेळ शिक्षक करण्यात आले आहे. त्यासाठी शासनाने कोणतीही समिती नेमलेली नाही. मात्र पूर्ण वेळ निदेशकांसाठी समिती नेमण्याचे कारण काय आहे ? त्यांना आपण याच धर्तीवर पूर्ण वेळ निदेशक का करू शकत नाही ? दिनांक 28.10.1988 च्या व सन 2010 च्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे की, संबंधित संस्थेवर माध्यमिक शाळा संहितेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणे हे बंधनकारक राहील.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.: 3548.....

ॲड.निरंजन डावखरे .........

मंजूर अभ्यासक्रमांकरिता आवश्यक कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या, त्यांची किमान शैक्षणिक अर्हता, अनुभव याबाबत संस्थेने महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी सेवेच्या शर्ती/नियमावली 1981 मधील तरतुदीनुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कारवाई केली जाईल काय ? शासनाने निदेशकांना पूर्ण वेळ करण्याचा निर्णय क्लिअरकट दिलेला असून शासन या निदेशकांना पूर्णवेळ का करीत नाही व ज्युनियर कॉलेजच्या पूर्णवेळ निदेशकांवर हा अन्याय कशासाठी ? सन 2010 च्या जीआर नुसार त्यांना संरक्षण लागू असल्यामुळे या निदेशकांना पूर्णवेळ निदेशक म्हणून न्याय दिला जाणार आहे काय ? या निदेशकांना पूर्णवेळ शिक्षकांसारखा पगार दिला जाणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, पूर्ण वेळ शिक्षक आणि पूर्ण वेळ निदेशक यामध्ये फरक असून त्यांच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये सुध्दा फरक आहे. पदवी, पदवीधर, पदविका फक्त अभियांत्रिकी गटाकरिता. पदवी किंवा पदविका एचएसव्ही किंवा व्होकेश्नल आयटीआय उत्तीर्ण होणे हे निदेशकांना आवश्यक आहे. शिक्षक आणि निदेशकाच्या अर्हतेमध्ये फरक आहे. त्यामुळे शिक्षक आणि निदेशकांना समान करता येत नाही. ॲड. निरंजन डावखरे सारख्या लोकप्रतिनिधींनी उपस्थित केला तेव्हा शासनाने संचालक व्यवसाय प्रशिक्षण यांच्या स्तरावर शाळा संहिता तयार करण्याची प्रक्रिया सुरु केली. आता ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात आलेली आहे. यासंदर्भातील बैठक येत्या 25 मार्च रोजी होणार आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शाळा संहिता पूर्ण करण्याबाबतची कार्यवाही आम्ही लागलीच करणार आहोत. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या विषयाच्या संदर्भात ॲड. निरंजन डावखरे यांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे मिळतील अशी अपेक्षा आहे.

श्री. रामनाथ मोते : सन्माननीय सभापती महोदय, अधिक स्तरावर काम करणारे निदेशक आणि पूर्ण वेळ शिक्षकांच्या संदर्भात व्यवसाय शिक्षण संचालकांबरोबर अनेक वेळा बैठका झालेल्या आहेत. व्यवसाय शिक्षण संचालकांनी हे तत्वत: मान्य केले होते व त्या प्रमाणे त्यांनी शासनाला शिफारस देखील केली होती. या शिफारशीमध्ये त्यांनी पूर्ण वेळ निदेशकाच्या ऐवजी त्यांना पूर्णवेळ

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.: 3548.....

श्री. रामनाथ मोते.....

शिक्षक म्हणण्याच्या संदर्भात शासनाला प्रस्ताव दिला होता. त्यामुळे पूर्णवेळ निदेशक आणि पूर्णवेळ शिक्षक यांच्या पदनामामध्ये काही फरक पडत नाही. यामध्ये फक्त पदनाम बदलण्याचा प्रश्न आहे. त्यामुळे पदनाम बदलण्याच्या संदर्भात शासन निर्णय घेणार आहे काय ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, निदेशक आणि पूर्णवेळ शिक्षकाच्या पदनामाच्या संदर्भात माझ्याकडे भरपूर माहिती आहे. परंतु सभागृहाचा वेळ वाचावा म्हणून मी सर्व माहिती वाचून दाखवली नाही. निदेशक आणि पूर्णवेळ शिक्षक यांचे कामाचे तास, अटी, शर्ती ही सर्व माहिती मी येथे वाचून दाखवतो. समान पदनाम केल्यास प्रशासकीय कोणत्या अडचणी येऊ शकतील, त्या सर्व मी या ठिकाणी वाचून दाखवतो.

**उप सभापती :** मंत्री महोदयांनी सदर माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री. विनोद तावडे : ठीक आहे.

-----

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

(8) ***३५८१ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.शरद रणपिसे, श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.माणिकराव ठाकरे:सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात चिपळूणकर समितीच्या शिफारशींप्रमाणे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे मंजूर करावीत, शिक्षकांना अतिरिक्त ठरविण्याची प्रक्रिया कायमस्वरुपी बंद करावी, माध्यमिक शाळांना २००४ पासून वेतनेतर अनुदान देणे, केंद्र सरकारच्या राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व सर्व शिक्षा अभियानाचा निधी खासगी माध्यमिक शाळांनाही द्यावा, १ ली ते ५ वी आणि ६ वी ते ८ वी वर्गाला स्वतंत्र मुख्याध्यापक द्यावा, या सारख्या अनेक मागण्यांसाठी राज्यभरातील शिक्षक संघटनांनी येत्या १३ जानेवारी, २०१५ रोजी एक दिवसीय शाळा बंद आंदोलनाचा इशारा दिल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त मागण्यांवर शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(2) महाराष्ट्र राज्य शिक्षण क्षेत्र संघटना समन्वय समिती यांच्या दि.१३.१.२०१५ च्या निवेदनातील मागण्यांच्या अनुषंगाने काही बाबी धोरणात्मक स्वरुपाच्या आहेत. याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांच्या उत्तरामध्ये वारंवार चिपळूणकर समितीच्या शिफारशीच्या संदर्भात उल्लेख होत असतो. चिपळूणकर समिती किती वर्षापासून अस्तित्वात आहे ? चिपळूणकर समितीच्या नंतर जे जे बदल झालेले आहेत त्या नवीन बदलाप्रमाणे आपण चिपळूणकर समितीच्या प्रश्नाच्या अभ्यासासाठी नवीन समिती नेमणार आहात काय ? चिपळूणकर समिती ही फार जुनी समिती असून मंत्री महोदय नवीन दमाचे असल्यामुळे आम्हाला आपल्याकडून काही नवीन बदल अपेक्षित आहेत. यामध्ये धोरणात्मक बाबी कोणत्या असणार आहेत, धोरणात्मक बाबीच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी किती कालावधी लागणार आहे व धोरणात्मक नसलेल्या बाबींबद्दल आपण लवकरात लवकर निर्णय घेणार आहात काय ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आदरणीय श्री. हेमंत टकले साहेबांना मी सांगू इच्छितो की, चिपळूणकर समिती आणि 23/10 याबाबत शिक्षक कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सध्या मोठा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.: 3581......

श्री.विनोद तावडे.....

संवाद सुरु आहे. चिपळूणकर समिती स्वीकारली तर शिपायाची पदे जास्त प्रमाणात भरली जातात व प्रयोगशाळा तंत्रज्ञांची पदे कमी भरली जातात. शिक्षण सम्राटांना चिपळूकर समिती हवी असून आपले ड्रायव्हर किंवा कर्मचारी सरकारच्या पैशावर पोसता येतात. यांना चाप लावण्यासाठी 23/10 आहे. 23/10 मुळे शिपायांची संख्या कमी झाली, परंतु प्रयोग शाळा तंत्रज्ञ ज्या प्रमाणात पाहिजे त्या प्रमाणात भरले गेले नाही. शेवटी 23/10 ची अंमलबजावणी करीत असताना आपल्याला वर्क कल्चरकडे सुध्दा लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मुख्याध्यापक, चेअरमन यांच्याकडे बेल वाजणारा, पाणी आणून देणारा, वर्गात जाऊन सामान पोहचवणारा हे सर्व करीत बसणे यासंदर्भात मला वाटते की, कोणत्याही शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पॅटर्न ठरविताना आपल्या राज्यातील वर्क कल्चर कसे बदलले जाईल यासंदर्भात विचार करणे गरजेचे आहे. सरकारच्या पैशावर कारखान्यातील ड्रायव्हर पोसणे ही कल्पना आपल्या कोणाचीही नाही. परंतु त्याला चाप लावताना शिक्षणाचे नुकसान होत तर नाही ना, हे पाहण्याचे काम मी शिक्षण मंत्री झाल्यापासून करीत असून यासंदर्भात एक समिती नियुक्त करण्यात आली आहे. संस्थेतील शिक्षण चांगले चालले पाहिजे यासाठी आवश्यक जो नॉन टिचींग स्टाफ पाहिजे तो नक्की देण्यात येईल व यासंदर्भातील निर्णय येत्या काळात नक्की घेतले जाणार आहेत.

----------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सिटी इंटरनॅशनल स्कूल वानवाडी (जि.पुणे) शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत**

(9) * **३७०५ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुण्यातील वानवाडी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी नेमलेल्या समितीने शाळेला जबाबदार धरुन सदर शाळेची मान्यता रद्द करण्याची शिफारस माहे डिसेंबर, २०१४ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच सदर समिती वारजे व एरंडवणे या भागातील नामांकित शाळांमध्ये झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी सखोल चौकशी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रकरणी शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(2) होय, हे खरे आहे.

(3) व (४) उपरोक्त प्रकरणांमध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुणे यांच्या कार्यालयाकडे RTE २००९ मधील कलम १२ (ख) नुसार नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झालेला असून त्यानुषंगाने दोषीवर कार्यवाही सुरु आहे.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

अॅड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, पुण्यातील वानवाडी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार करण्यात आले. यासंदर्भात नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने या शाळेची मान्यता रद्द करण्यात यावी अशा प्रकारची शिफारस केलेली आहे. याच दरम्यान पुणे येथील वारजे व एरंडवणे या भागातील नामांकित शाळेतील विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचाराच्या घटना घडलेल्या आहेत. यासंदर्भातील समितीने चौकशी केली असून या समितीला यामध्ये तथ्य आढळून आले. या संस्थेवर नेमकी कोणती कारवाई करण्यात आली असा मी प्रश्न विचारला होता परंतु या प्रश्नाचे उत्तर देण्यात आले नाही. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, या संस्थांवर फौजदारी स्वरुपाची कोणती कारवाई करण्यात आलेली आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा प्रश्न चर्चेला आला तो बरा झाला. अशा घटनांच्या संदर्भात या कायदेमंडळात स्पष्टता येण्याची आवश्यकता आहे. पुण्यातील वानवाडी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील घटना अतिशय भयाणक आहे. शाळा चालविणारी संस्था व मुख्याध्यापक

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.:3705......

श्री.विनोद तावडे .......

हे शाळेत विद्यार्थी नेण्या-आणण्यासाठी जी स्कूल बस लावतात त्याची जबाबदारी शाळेची असते की, स्कूल बस चालविणाऱ्या ठेकेदाराची असते, जो परिवहन विभागाच्या नियमाखाली बांधील असतो. स्कूल बस मधील विद्यार्थी घरी पोहचेपर्यंतची जबाबदारी ही मुख्याध्यापकाची कशी काय असू शकते ? या विषयाच्या संदर्भात केव्हा तरी जीआर निघाला म्हणून तसे करणे योग्य नाही. आता ही शाळा बंद केली तर या ठिकाणच्या 923 विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळेत प्रवेश कोण देणार ?

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 3705..

श्री.विनोद तावडे...

इतर वर्गांमध्ये तेवढ्या जागा आहेत काय ? सदरहू घटना समजल्यानंतर शाळेच्या संस्थाचालकांनी, मुख्याध्यापकांनी ती गोष्ट लपवून ठेवली नाही. त्यांना ही घटना समजल्यानंतर त्यांनी कायदेशीर प्रक्रिया केलेली आहे.त्यापुढील काम गृह विभागाचे आहे. मुलींनी तक्रार केल्या नंतरसुद्धा मुख्याध्यापकांनी ती घटना लपविण्याचा प्रयत्न केला असेल तर आपण त्यांच्यावर कायद्याने कारवाई करु शकतो. पण शाळा बंद करणे हा उपाय होऊ शकतो का याबाबत आपणास मत बनवावे लागेल. शाळा बंद करणे खूप सोपे आहे. आपण गृहीत धरु की, एका शिक्षकाचा दोष आहे, पण त्या शिक्षकाच्या दोषाकरिता 950 मुलांच्या प्रवेशाचा प्रश्न तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नोकरीवर येणारी गदा, याचा विचार करता शाळा बंद करणे हा उपाय आहे काय, यावर आपणास मत बनवावे लागेल. घरापासून शाळेपर्यंत मुलांचा प्रवास सुखरुप व्हावा. विद्यार्थी बसमध्ये चढला, बसमधून शाळेत उतरला याची माहिती पालकांना स्वॉईप कार्डच्या माध्यमातून मिळेल अशा प्रकारचा एक मॉडयुल्स केला आहे त्यासाठी आम्हाला पैसे नको, फक्त जाहिरातीचे अधिकार द्यावेत असे त्या कंपनीचे म्हणणे आहे. मुलांच्या मनावर परिणाम न करणाऱ्या जाहिराती लावण्यात येतील जसे स्कूल बॅग वा शाळेशी संबंधित जाहिराती करण्यात येतील. अशा तऱ्हेची नियमावली परिवहन विभागामार्फत केली तर मुला-मुलींचा प्रवास सुखरुप होईल. एखाद्या व्यक्तीच्या दोषामुळे इतर सर्वांवर कारवाई करण्याची भूमिका योग्य नाही, असे मला वाटते. या प्रकरणामध्ये गृह विभागाने करावयाच्या कारवाईबाबतचा पाठपुरावा शिक्षण विभाग करीत आहे आणि त्याबाबत कडक अंमलबजावणी होईल हे पाहण्यात येईल.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, मुलींच्या शाळेतील स्कूल बसमध्ये महिला कर्मचारी नेमणे अनिवार्य करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण तसे अनिवार्य केलेले आहे. ज्या शाळा नियमांचे पालन करीत नाहीत, त्या शाळांवर कडक कारवाई करण्यात येते. एका प्रकरणामध्ये मुलीवर अत्याचार करण्यास बसमधील महिला कर्मचाऱ्याने क्लिनरला मदत केली होती. हा जेंडर

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 3705..

श्री.विनोद तावडे...

सेन्सेटायझेशनचा मुद्दा आहे. त्या मुलीच्या वर्गातील वागणुकीवरुन तिला काहीतरी त्रास आहे हे जाणवले. मी उदाहरण म्हणून सांगतो की, मध्यमवर्गीय कुटुंबातील एखाद्या मुलीने माझ्या मागे एक मुलगा लागतो अशी तक्रार केली तर आईवडिलांची पहिली प्रतिक्रिया असते की, तू रस्ता बदल, तू त्याच्याकडे लक्ष कशाला देतेस, आपल्या पोटच्या मुलीबद्दल त्यांची अशी प्रतिक्रिया असते. मग शिक्षकांना जेंडर सेन्सेटायझेशन करण्याची किती गरज आहे, असा हा सामाजिक विषय आहे. मुलींच्या स्कूल बसमध्ये महिला अटेन्डन्ट नसेल तर ती स्कूल बस म्हणून गणली जाणार नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, असे पुष्कळ किस्से घडलेले आहेत. मुख्याध्यापकांवर आरोप ठेवायचा, शिक्षकांवर आरोप ठेवायचा की बस कॉन्ट्रक्टरवर आरोप ठेवायचा असा प्रश्न आहे. या संदर्भात जी नियमावली तयार केलेली आहे त्या नियमावलीचे पालन होते किंवा कसे हे आपण पाहिले पाहिजे. काही वाहनचालक आणि क्लिनर स्कूल बसमध्ये स्टोव्ह ठेवून जेवण करीत असतात, त्यातून काही घटना घडल्या आहेत. माझे असे म्हणणे आहे की, मुख्याध्यापक, बस कॉन्ट्रॅक्टर या सर्वांची जबाबदारी आहे आणि त्यासाठी ठोस कारवाई करण्यात येईल काय ? आपण कित्येकवेळा पाहतो की, स्कूल बसमध्ये प्रमाणापेक्षा जास्त विद्यार्थी असल्याचे दिसून येते. पार्लेसारख्या ठिकाणी 15 सीटची कॅपॅसिटी असलेल्या बसमध्ये 30 विद्यार्थी कोंबलेले असल्याचे दिसून येते. यासाठी जबाबदार कोण, मुख्याध्यापक, बस कॉन्ट्रॅक्टर की नियमावली ? तेव्हा आपण कोणती ठोस कारवाई करणार आहात ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या विषयातील प्रत्येक कायद्याचे पालन होते किंवा कसे हे पाहण्याचे काम त्या त्या एजन्सीचे आहे. बसमध्ये किती विद्यार्थी असले पाहिजेत हे परिवहन विभाग पाहतो. स्कूल बसमध्ये स्टोव्हवर जेवण करण्यात येते किंवा कसे हे गृह विभाग पाहते. स्कूल बसमध्ये ड्रायव्हर, क्लिनर, महिला अटेन्डन्ट आहे किंवा कसे हे पाहण्याची जबाबदारी शाळेची आहे. प्रत्येक एजन्सीने या गोष्टी पाहिल्या पहिजेत. जर त्याची अंमलबजावणी होत नसेल तर त्याप्रमाणे कारवाई केली पाहिजे. ही कारवाई संबंधित व्यक्तीवर होणार की

..3.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 3705..

श्री.विनोद तावडे...

संस्थेवर होणार असा प्रश्न आहे. ज्या व्यक्तीने केलेल्या गुन्ह्याची शिक्षा त्या व्यक्तीला नक्की मिळाली पाहिजे. जर दहा जण असे कृत्य करीत असतील तर ती संस्था बंद केली पाहिजे.

**उप सभापती** :प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी आपणास धन्यवाद देतो. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये फक्त 3-4 प्रश्नांवर चर्चा होते. आपण प्रश्नोत्तराचा तास व्यवस्थित हाताळल्यामुळे आज नऊ प्रश्नांवर चर्चा झाली. सन्माननीय सदस्यांनी वेळेचे महत्व लक्षात घेऊन स्पेसिफीक प्रश्न विचारले तर आणखी दहा-बारा प्रश्नांवर ही संख्या जाऊ शकेल आणि उर्वरित प्रश्नांना न्याय मिळेल. आपण अशीच प्रथा पुढे सुरु ठेवावी अशी विनंती आहे.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.विजयकुमार देशमुख (कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्रीमती विद्या ठाकूर ( अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण राज्यमंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवते.

**उप सभापती** :खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

..5.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री.रामनाथ मोते (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 20 मार्च, 2015 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 19 मार्च, 2015 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. 3 अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थ दर्शविण्यात येणार असून बॅलटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार 4 अशासकीय विधेयकांना खालीलप्रमाणे वेळ नेमून देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

**<u>पुर:स्थापनार्थ</u>**

<table>
<tr><td>1.</td><td>सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 1 -महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक, 2015 श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचे.</td><td rowspan="3">10 मिनीटांपेक्षा जास्त नाही.</td></tr>
<tr><td>2.</td><td>सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 2 -महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, 2015 श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचे.</td></tr>
<tr><td>3.</td><td>सन 2015 चे वि.प.वि. 3 - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, 2015 श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांचे</td></tr>
</table>

**<u>बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय विधेयके</u>**

| | | |
|---|---|---|
| 1. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 20 - भ्रष्टाचार प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2014 - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | - 35 मिनीटांपेक्षा जास्त नाही. |
| 2. | सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 3 - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, 2014 - श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचे | - 35 मिनीटांपेक्षा जास्त नाही. |
| 3. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 11 - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2014 - श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | - 35 मिनीटांपेक्षा जास्त नाही. |
| 4. | सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 6 - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, 2013 - श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांचे. | - 35 मिनीटांपेक्षा जास्त नाही. |

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री.रामनाथ मोते (समिती सदस्य) : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--------

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**स्वातंत्र्यवीर राजगुरु यांच्या बलिदानानिमित्त 23 मार्च हा दिवस 'शहीद दिन' म्हणून साजरा करण्याबाबत औचित्याचा मुद्दा**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने पुढीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा मांडतो.

महोदय, हुतात्मा भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान सर्वज्ञात आहे. स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात स्वतःच्या जिवाची आहुती देऊन या तीन राष्ट्रवीरांनी त्या काळात लाखो तरुणांच्या मनात स्वातंत्र्यांचे स्फुलिंग पेटविले. पंजाब सरकार 23 मार्च हा दिवस या थोर स्वातंत्र्यसेनानींचा बलिदान दिन म्हणून पाळतो. या महान राष्ट्रवीरांपैकी राजगुरु हे महाराष्ट्रातील होते. महाराष्ट्रातील तरुणांना त्यांच्यापासून चिरप्रेरणा मिळावी या हेतूने शासनाने 23 मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून जाहीर करावा, अशी मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

श्री.सुनील तटकरे : महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा मांडला आहे त्यानुसार 23 मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून जाहीर करण्याबाबत राज्य सरकारची काय भूमिका आहे ?

श्री.गिरीष बापट : महोदय, अशाप्रकारे एखादा दिवस जाहीर करायचा झाल्यास त्याची एक प्रक्रिया असते. विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहातून अशा प्रकारचा प्रस्ताव आल्यानंतर त्यावर कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा होईल. परंतु आता पुढील कामकाज सल्लागार समितीची बैठक 26 मार्च रोजी आहे. या विषयी सर्वांशी चर्चा करुन निर्णय घ्यावा लागतो. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेल्या मुद्याच्या बाबतीत कोणाचेही दुमत नाही. परंतु ही बाब व्यवहारात कशी आणायची एवढाच मुद्दा आहे. लवकरात लवकर संबंधितांशी चर्चा करुन कार्यवाही करण्यात येईल.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**सभागृहातील कामकाजाच्या प्रक्षेपणाबाबत पॉईंट ऑफ प्रोसीजर**</u>

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय संसदीय कामकाज मंत्री उपस्थित आहेत. त्यांनी सांगितले होते की, सभागृहातील केवळ प्रश्नोत्तराच्या तासाचे आऊटपुट बाहेर दिले जाईल. परंतु काल काही बाबी आमच्या निदर्शनास आल्या, त्या सभागृहाच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे. ज्यावेळी माननीय मंत्र्यांना असे वाटते की, आपण केलेली निवेदने खाली जावीत त्याच पध्दतीने त्यांचे आऊटपुट जाते. या बाबत माननीय मंत्र्यांना जसे स्वातंत्र्य दिले जाते तशाच प्रकारचे स्वातंत्र्य दोन्ही सभागृहातील माननीय विरोधी पक्ष नेते असतील, गट नेते असतील, त्यांनी सभागृहात जे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले असतील त्यांचे आऊटपूट सुध्दा खाली पाठविले पाहिजे.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, एक चांगल्या प्रकारची पध्दत सुरु केल्याबद्दल आम्ही शासनाचे अभिनंदन केले होते. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा मांडला तो योग्य आहे. केवळ प्रश्नोत्तराच्या तासाचे आऊटपुट देण्याबाबत सभागृहात सांगण्यात आले होते. परंतु केवळ माननीय मंत्र्यांनी नियम 46 अन्वये केलेली निवेदने पाठविण्याचाच प्रयत्न केला तर केवळ एकाच बाजूचे कामकाज दाखविल्यासारखे होईल असे वाटते. विधानसभा किंवा विधानपरिषद सभागृहात विरोधी पक्षाच्या वतीने महत्त्वाचा प्रस्ताव मांडत असताना त्या त्या वेळचे आऊटपुट देण्याची व्यवस्था करावी, अशी माझी विनंती वजा सूचना आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी अगोदर सांगितलेले आहे आणि आताही सांगतो की, सध्या कामकाजाचे लाईव्ह प्रक्षेपण सुरु आहे. हे कामकाज माननीय सभापतींच्या परवानगीने बाहेर पाठविले जाते.

श्री.धनंजय मुंडे : परंतु ज्या ठिकाणी हे आऊटपुट जाते त्या मंडळींकडे मी विचारणा केली आहे. त्यांनी सांगितले की, त्या ठिकाणी येथून जेवढे आऊटपुट पाठविले जाते तेवढेच त्यांना मिळते. सरसकट आऊटपुट पाठविले जात नाही. काल अर्थसंकल्प सादर करतानाचे आऊटपुट

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

पाठविले, ते ठीक आहे. आमची विनंती आहे की, काही सन्माननीय सदस्यांची अर्थसंकल्पावरील भाषणे सुध्दा चॅनेल्सवर दाखवावयास पाहिजेत.

श्री.गिरीष बापट : महोदय, सध्या सुध्दा सभागृहामध्ये चित्रीकरण सुरु आहे. माननीय सभापतीच्या आसनाजवळ एक बेल आहे. तेथून आपण हे चित्रीकरण पाठविण्याची व्यवस्था करतो. मी आपल्याला यातील व्यावहारिक अडचण सांगतो. विधिमंडळाकडे संसदेसारखे स्वत:चे चॅनेल्स नाही. त्यामुळे सभागृहाचे कामकाज 24 तास चॅनेलवर दाखविता येत नाही. सध्या आपण चॅनेल्सकडे आऊटपुट पाठवितो. चॅनेल्स ते आऊटपुट रेकॉर्ड करतात आणि त्यातील काही भाग दाखवितात. त्यांना त्यातील जे दाखवायचे असते तेच ते दाखवितात. त्यांनी नेमके काय दाखवावे हे त्यांच्यावर बंधनकारक नाही. परंतु आपल्यावर त्यांना आऊटपुट पाठविण्याचे बंधन आहे. विधिमंडळाचे स्वत:चे चॅनेल नजीकच्या काळात करणार आहोत. सध्या आपण केवळ सभागृहातील आऊटपुट बाहेर देण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे सध्या चॅनेल्स सभागृहाचे कामकाज बातम्या किंवा अन्य वेळी दाखवितात, परंतु त्यांना जे वाटेल तेच ते दाखवितात. त्यांनी सभागृहातील कामकाज किती वेळा दाखवावे हे त्यांना सांगू शकत नाही. त्यांना जे दाखवायचे आहे हा त्यांचा चॉईस आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेतील माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय सभापती, माननीय अध्यक्ष यांची भाषणे आणि काही महत्त्वाच्या विषयावरील चर्चा जास्तीत जास्त कव्हर करावी अशी विनंती चॅनेल्सला केली आहे. चॅनेल्स त्यांच्या दिवसभराच्या कार्यक्रमातून जेवढे दाखवायचे तेवढेच ते दाखवितात. सध्या ज्या चॅनेलवरुन चित्रीकरण दाखविले जाते त्यांच्यावर आपली मालकी नाही. त्यांना केवळ आऊटपुट देण्याचे काम आपण करीत आहोत. येत्या काही महिन्यांत विधिमंडळाच्या मालकीचे चॅनेल सुरु होईल तेव्हा सर्व कामकाज माननीय सभापतींच्या परवानगीने दाखविले जाईल.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**म.वि.प. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चा अपूर्ण राहिलेली आहे. या प्रस्तावावरील उत्तर कधी होणार आहे ?

**उप सभापती** : या बाबतीत मी आजच सभागृहाला माहिती देईन. परंतु या प्रस्तावावर आज उत्तर होणार नाही.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : माझ्याकडे दिनांक 19 मार्च, 2015 रोजी म.वि.प. नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.दीपकराव साळुंखे यांनी "सोलापूर महानगरपालिकेमार्फत गोरगरीब व गरजू रुग्णांसाठी मदर तेरेसा पॉलीक्लिनिक रुग्णालय चालविण्यात येणे, या रुग्णालयात मागील तीन वर्षांपासून नेत्र शल्यचिकित्सक विभाग बंद असल्यामुळे नेत्र रुग्णांची होत असलेली गैरसोय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी "महाराष्ट्रात पोलिसांच्या गृह प्रकल्पांसाठी प्रत्येक वर्षी 400 कोटी रुपये अंदाजपत्रकाद्वारे उपलब्ध करुन देखील पोलिसांना घराविना नातेवाईकांकडे व भाड्याच्या घरात राहावे लागत असणे. तसेच माननीय मुख्यमंत्री यांनी पोलिसांना घरे देण्याविषयी केलेल्या घोषणेला अनुसरुन निधी उपलब्ध करुन देण्याविषयी शासनाकडून होत असलेला विलंब" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "आरे कॉलनीच्या विकासाच्या नावाखाली तबेलेवाल्यांना विस्थापित करीत असणे, गोसंवर्धन करणारा हा गवळी समाज प्रामुख्याने मुस्लीम असल्यामुळे त्यांची छळवणूक होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "मेट्रो-3 प्रकल्पामुळे गिरगाव, चिराबाजार, ग्रॅण्ट रोड येथील 28 इमारती आणि 777 कुटुंबे विस्थापित होणार असून मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (एमएमआरसी) यांनी गिरगावकरांना घर खाली करण्याच्या नोटीसा पाठविणे" या

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव....

विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "मुंबई, ठाणे व अकोला विभागातील रुग्णालयांचे वरिष्ठ, पुरवठादारांशी आर्थिक हातमिळवणी करीत असल्याने त्यांची या प्रकरणी अद्यापी चौकशी न केल्यामुळे निर्माण होणारा संशय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "नाशिक जिल्ह्यामध्ये वाळू माफियांनी अधिकाऱ्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न करून निर्माण केलेली दहशत, त्यामुळे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी "पुणे शहरातील दहावी व बारावी परीक्षेत 80 टक्के व मागासवर्गीयांनी 70 टक्के गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांना महापालिकेतून अनुक्रमे 15 व 25 हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येणे, परंतु अद्याप विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्ती जमा करण्यास महापालिका प्रशासनाला आलेले अपयश" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी "ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ शहरात महालक्ष्मी नगर परिसरातील कु.निहारिका साळुंखे या 22 वर्षीय तरुणीची गळा कापून केलेली हत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

---------

..7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**म.वि.प. नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदनाबाबत**

**उप सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, म.वि.प. नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदनावर ज्यांनी सूचना दिली असेल त्यांना केवळ एकच प्रश्न विचारता येईल. त्यांना दुसरा प्रश्न विचारता येणार नाही.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : पालघर जिल्ह्यातील जव्हार व डहाणू तालुक्यांमध्ये शिधापत्रिका वितरणात गैरव्यवहार होत असणे याबाबत श्री. आनंद ठाकूर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. गिरीष बापट (अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. आनंद ठाकूर : सभापती महोदय, पालघर जिल्ह्यातील जव्हार व डहाणू तालुक्यांमध्ये बोगस शिधापत्रिका व शिधापत्रिका वितरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असणे या संदर्भातील निवेदनावर मी प्रश्न विचारू इच्छितो. निवेदनात उत्तर दिले आहे की, कडक कारवाई करण्याबाबत व फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत सूचना दिल्या गेल्या आहेत. सभापती महोदय, आकडेवारी देऊन, कुठे कसा गैरव्यवहार आहे हे सांगितले गेले आहे. पण वस्तुस्थिती तशी नाही असे मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो. जव्हार तालुक्यामध्ये 90 टक्के लोकसंख्या आदिवासी आहे. आदिवासी लोक शिधापत्रिकेच्या संदर्भातील अडचण घेऊन जातात त्यावेळी त्यांना त्रास होतो. आदिवासी माणसाला नवीन रेशन कार्ड घेण्यासाठी, कार्ड विभक्त करण्यासाठी, कार्डमध्ये नावे समाविष्ट करण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी, अर्ज गहाळ झाल्यास नवीन अर्ज मिळविण्यासाठी हेलपाटे मारावे लागतात. अधिकारी दलालाच्या माध्यमातून हवे असते ते मिळाल्यानंतर काम करतात. शासनाकडून याबाबतीत विशेष लक्ष देऊन संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे का ? मी जव्हार तालुका केंद्रित करतो. कारण तेथे बऱ्याच तक्रारी आल्या आहेत. पालघरमध्ये 8 फेब्रुवारीला या बाबतीत आदिवासी महिलांचा मोर्चा आला होता. माननीय मंत्र्यांनी या संदर्भात देखील माहिती घ्यावी.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न बरोबर आहे. सर्व यंत्रणांच्या माध्यमातून तपासणी केली असता एका ठिकाणी 750 कार्ड बोगस असल्याचे आढळून आले. डहाणू, पालघर विभागात निवृत्त पोलीस कर्मचारी दलालीच्या माध्यमातून लोकांकडून पैसे घेऊन हे काम करीत होता. परंतु, त्यावर अजूनही गुन्हा दाखल झालेला नाही. कारण तो फरार आहे. आम्ही त्याची माहिती घेत आहोत. सदर कामाच्या संदर्भात कुचराई केलेल्या कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यास खात्याला सांगितले आहे. आपण 3-4 महिन्यांत बायोमेट्रिक पध्दत आणत आहोत. संगणकीकरणाचे काम 90 टक्के पूर्ण होत आले आहे. त्यामुळे आता बोगस रेशन कार्ड ही संकल्पना राबविणे फार अवघड जाईल. कारण संगणकीकरणामुळे सर्व काही उघड होईल. डहाणू व पालघर तालुक्यात विशेष लक्ष दिले जाईल. शोध मोहीम सुरू आहे. काही ठिकाणी बोगस शिधापत्रिका सापडल्या आहेत. कुटुंब विभक्त करून नवीन रेशन कार्डाची मागणी होते, त्यावेळी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष बापट ....

अडचणी येतात. जागेचा पुरावा देणे, फॉर्म नीट भरणे यात अडचणी येतात. कर्मचाऱ्यांच्या मदतीने त्या अडचणी सोडविण्यात येतील. आपल्या विभागात कोणाला रेशन कार्ड किंवा रेशन मिळाले नाही असे होणार नाही याची दक्षता खाते नक्की घेईल.

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : बाटली बंद पाण्याच्या कंपन्यांवर कारवाई करणे याबाबत श्री. किरण पावसकर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. गिरीष बापट (अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, वसई, विरार परिसरात 200 बोगस बाटली बंद पाण्याच्या कंपन्या कार्यरत आहेत. उत्तरात सांगण्यात आले आहे की, "बाटली बंद पाण्यातील होत असलेली भेसळ याबाबत अन्न व औषध प्रशासन गंभीर असून त्याकडे दुर्लक्ष केले जात नाही. किंबहुना या बाबीकडे जातीने लक्ष देऊन कारवाई केली जात आहे."

सभापती महोदय, बोगस बाटली बंद पाणी शहरात येत आहे. स्वाईन फ्लू तसेच इतर साथीच्या रोगाने असंख्य रूग्ण आजारी आहेत, बळी पडत आहेत. अन्न सुरक्षा किंवा आयएसआय मार्क हे सर्व नोंदणी झालेल्या, ट्रेडखाली उत्पादन होत असलेल्या कंपन्यांसाठी आहे. परंतु आपण नोंदणी नसलेल्या, गुप्त उत्पादन होत असलेल्या कंपन्या शोधून काढल्या का, त्यासाठी पोलिसांची मदत घेतली का ? काही कंपन्या बाटली बंद पाणी विकतात, बाटल्यांमध्ये पाणी बंद केले जाते, पाणी मोठ्या जारमध्ये भरले जाते. बऱ्याच कंपन्यांनी त्या संदर्भात कोणत्याही परवानग्या घेतलेल्या नाहीत राजरोसपणे काम सुरूआहे. प्रसारमाध्यमे, वृत्तपत्रे या विषयी माहिती पुरवित आहेत. पोलीस विभागाला त्यांच्या खबऱ्यांकडून, अन्न व औषध विभागाला त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून कोणतीही माहिती मिळत नाही हे गंभीर आहे. नोंदणी केलेल्या कंपन्यांवर आपण कारवाई करीत आहात. परंतु, नोंदणी न केलेल्या कंपन्यांचे काय ? उत्तरात म्हटले आहे की, 40 प्रकरणांमध्ये 8 लाख रूपये दंड ठोठावण्यात आला आहे. 40 प्रकरणे मान्य करीत आहात याचा अर्थ 200 ठिकाणी उत्पादन सुरू आहे. त्यामुळे अशा कंपन्यांवर पोलिसांची मदत घेऊन कठोर कारवाई करणार आहात का किंवा यासाठी कायद्यामध्ये बदल करण्याची वेळ आल्यास तसा बदल केला जाणार आहे का ?

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, औषध व प्रशासन विभागाकडे जेव्हा अशा तक्रारी आल्या, वृत्तपत्रांतून बातम्या आल्या तेव्हा पासून या संदर्भातील सत्र सुरू करण्यात आले आहे. 65 जणांवर त्या संदर्भात कारवाई केली आहे. 35 उत्पादकांच्या विरूध्द खटले दाखल करण्यात आले आहेत. संख्या जास्त आहे. 1, 2 लिटरच्या पाण्याच्या बाटल्या असतात, त्या बाटल्या प्लॅस्टिकचे आवरण लावून बंद केल्या पाहिजेत. काही ठिकाणी 20, 30, 40 लिटरचे मोठे प्लॅस्टिकचे डबे घेतात. हल्ली व्यावसायिक मोठी बाटली दुकानात आणून आलेल्या गिऱ्हाईकांना पाणी देतात, त्याची

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष बापट ....

देखील तपासणी केली असता 9 ठिकाणी दोष आढळले आहेत. संबंधितांवर कारवाई केली आहे. काहींनी परवानग्या घेतल्या होत्या तर काहींनी परवानग्या घेतल्या नव्हत्या. या संदर्भात मोहीम सुरू केली आहे. आता 65 जणांवर कारवाई केली आहे. भरारी पथकाला आदेश देण्यात आले आहेत. दूषित पाणी दिले जात असेल किंवा लायसन्सशिवाय पाणी विकण्यात येत असेल तर अशांवर भरारी पथकांमार्फत कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, कायद्यात बदल केला पाहिजे. मी सांगू इच्छितो की, बेकायदेशीर काम करणारा दंड किती आहे हे पाहून बेकायदेशीर काम करीत आहे. देवापुढे नैवद्य ठेवतात तशी दंडाची रक्कम बाजूला ठेवण्यात येते. मी परवा माननीय केंद्रीय मंत्र्यांना दिल्लीला भेटून आलो आणि सांगितले की, नुसता दंड नाही तर कारावासाची शिक्षा ॲड केली तर या कायद्याची अधिक चांगल्याप्रकारे अंमलबजावणी करता येईल. त्याबाबत सध्या चर्चा सुरूआहे. राज्यामध्ये कडक कायदा करण्याच्या संदर्भातील कार्यवाही नक्की करीत आहोत. मोठ्या प्रमाणात बाटलीबंद पाणी बाहेरील राज्यातून कर चुकवून आणले जात आहे. तत्संदर्भात देखील संबंधितांवर योग्य कारवाई करण्याच्या संदर्भात भरारी पथकाला सांगण्यात आले आहे.

**उप सभापती** : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. दुपारी 3.10 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

(दुपारी 2.36 ते दुपारी 3.10 वाजेपर्यंत मध्यंतर)

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**सभागृहात देण्यात येणाऱ्या घोषणांबाबत**

**उप सभापती :** सभागृहाची बैठक सुरु झाल्यानंतर अनेक सन्माननीय सदस्य "जय मराठवाडा", "जय विदर्भ" किंवा "जय कोकण", अशा प्रकारच्या घोषणा देत असतात. या संदर्भात माझी चर्चा झाली आहे. वास्तविक पाहता, सर्व सदस्यांनी "जय महाराष्ट्र", ही घोषणा दिली पाहिजे. विभागनिहाय घोषणा देणे चुकीचे आहे. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांचे नेहमीच असे सांगणे आहे की, हा महाराष्ट्र एकत्रितच राहिला पाहिजे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी याची नोंद घ्यावी.

------------

...2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## जैतापूर येथील अणुऊर्जा प्रकल्पाच्या विरोधात काढण्यात आलेला मोर्चा

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प हा या राज्यासाठीच नाही तर संपूर्ण देशासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असा प्रकल्प आहे. हा प्रकल्प झाला पाहिजे, अशीच केंद्र आणि राज्य सरकारची भूमिका आहे. परंतु, या युती शासनातील एका पक्षाने या प्रकल्पाविरोधात जैतापूर येथे आज मोठा मोर्चा काढला आहे. हा मोर्चा एवढा मोठा आहे की, त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. आता आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की, जैतापूर येथील अणुऊर्जा प्रकल्पाचे मुख्य कार्यालय जाळून टाकण्याचा, उद्ध्वस्त करण्याचा पवित्रा शिवसेनेने घेतला आहे व त्यामुळे हा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. सध्या अधिवेशन सुरु आहे. त्यामुळे या संदर्भातील शासनाची स्पष्ट भूमिका सभागृहाला आणि सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील तमाम जनतेला कळली पाहिजे, अशी आमची अपेक्षा आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सत्तांतर झाल्यानंतर जे पक्ष मिळून हे सरकार तयार झाले त्यांनी किमान समान कार्यक्रम ठरविला पाहिजे. राज्याची एकूण ऊर्जेची गरज लक्षात घेऊन या प्रकल्पाचे काम सुरु झाले होते. तेथील जमिनीचा मोबदलाही जमीन मालकांना योग्य वाटेल त्या पेक्षाही अधिक दराने दिला गेला आहे. हा प्रकल्प उभारण्याचे काम सुरु झाल्यानंतर सुध्दा सत्तेत सहभागी होताना या प्रकल्पाला आमचा विरोधी राहील, असे सत्तारुढ पक्षातील एका पक्षाने सांगितले होते. अशा पध्दतीने वेगवेगळ्या भूमिकेमुळे या शासनाचा हा रथ दोन दिशांना नेण्याचा प्रयत्न झाला तर भविष्यात राज्यापुढे अनेक प्रश्न निर्माण होतील आणि एक प्रकारची निर्नायकी अवस्था निर्माण होईल. 'प्रकल्प उभारणारच', असे एका पक्षाने सांगितल्यानंतर 'कोणताही प्रकल्प होऊ देणार नाही', असे दुसऱ्या पक्षाने सांगून प्रकल्प हाणून पाडायचा, अशी परिस्थिती राज्यात निर्माण झाली असल्यामुळे हे सरकार चालविण्यास सत्तारुढ पक्ष गंभीर आहे का, असा प्रश्न आमच्या मनामध्ये निर्माण झाला आहे. या प्रकल्पाच्या बाबतीत राज्याच्या गरजेप्रमाणे होणारे काम पूर्ण करण्यासाठी शासन नेमकी कोणती भूमिका घेणार आहे ? हा विषय राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आणि अतिशय गंभीर आहे. म्हणूनच या प्रकल्पासंदर्भात शासनाचे

...3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले........

निश्चित धोरण काय आहे, याबाबत शासनाने निवेदन करावे, अशी जी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी विनंती केली आहे, ती योग्य असून त्याप्रमाणे शासनाने निवेदन करावे, अशी आमची आग्रही मागणी आहे.

**उप सभापती :** जैतापूर येथे नक्की काय परिस्थिती आहे, याबाबतचे थोडक्यात निवेदन शासनाने आजच करावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, निवेदन करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आजचे सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी शासनाने निवेदन करावे, अशी आमची अपेक्षा आहे.

**उप सभापती :** मी शासनाला या प्रकल्पासंबंधीच्या धोरणाच्या बाबतीत नाही तर जैतापूर येथे सध्या काय परिस्थिती आहे, याबाबतचे थोडक्यात निवेदन आजच करण्यास सांगितले आहे.

--------------

...4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : पुणे शहरातील रस्ते विकासासाठी डेव्हलपमेंट टीडीआरच्या तरतुदीचा वापर करणे

**मु.शी.** : पुणे शहरातील रस्ते विकासासाठी डेव्हलपमेंट टीडीआरच्या तरतुदीचा वापर करणे यासंबंधी श्रीमती दिप्ती चवधरी वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुणे शहराच्या विकास कामावर मोठ्या प्रमाणात परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, 2015 रोजी वा त्यासुमारास आढळून येणे, पुणे शहरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी रस्त्यांचे रुंदीकरण करण्याची व चांगल्या तंत्रज्ञानाने विकसित करण्याची आवश्यकता असल्यामुळे त्यासाठी एमआरटीपी कायदा व डीसी रुल्समध्ये डेव्हलपमेंट टीडीआरची तरतूद असल्यामुळे राज्य सरकारने या तरतुदीचा वापर करण्यास महानगरपालिकेस परवानगी दिल्यास पुणे शहरातील रस्ते मोठ्या प्रमाणात विकसित होऊन शहरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यास मदत होऊ शकते, सबब सदरहू तरतुदींचा वापर करण्यासाठी पुणे महानगरपालिकेस आदेश देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, एका अतिशय महत्त्वाच्या प्रश्नावर ही लक्षवेधी सूचना मांडण्यात आली आहे. शासनाने या संदर्भातील निवेदन दिलेले आहे. परंतु, त्याने आमचे पूर्ण समाधान झालेले नाही.

सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेच्या विकास आराखड्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होताना दिसत नाही. या विकास आराखड्याची 30 टक्के सुध्दा अंमलबजावणी झालेली नाही. याचे प्रमुख कारण हे आहे की, भूसंपादनासाठी लागणारा प्रचंड निधी महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही. पुणे महानगरपालिकेला विकास आराखड्यातून साधारणपणे 300 ॲमेनिटी स्पेस मिळाल्या असल्या तरी या जागा ताब्यात घेण्यासाठी लागणारा निधी महानगरपालिकेकडे नाही.

सभापती महोदय, कालच या राज्याच्या अर्थ मंत्री महोदयांनी राज्याचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी अशी घोषणा केली आहे की, दिनाक 1 ऑगस्ट, 2015 पासून एलबीटी रद्द करण्यात येईल. या माध्यमातून महानगरपालिकांच्या आर्थिक नाड्या कापल्या जाणार असून त्यांच्याकडे निधी उपलब्ध होणार नाही.

सभापती महोदय, आपल्या सर्वांचा दृष्टीकोन हा आहे की, लोकसंख्येच्या प्रमाणात शहरांमध्ये शाळा, रुग्णालये, बगिचे, क्रीडांगणे व अन्य सार्वजनिक उपयोगाच्या सुविधा निर्माण झाल्या पाहिजेत. परंतु, महानगरपालिका निधीअभावी या सुविधा उपलब्ध करुन देऊ शकत नसल्यामुळे सन 1997 मध्ये टीडीआरची संकल्पना पुणे शहराच्या बाबतीत स्वीकारली गेली व त्याची अंमलबजावणीही सुरु झाली. यापुढील प्रक्रिया डेव्हलपमेंट टीडीआरची असून तशा प्रकारची तरतूद नवीन विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आहे. या संकल्पनेतून पुणे शहरामध्ये काही रस्त्यांची बांधकामे झालेली आहेत. परंतु, कायमस्वरुपी असा टीडीआर दिला गेला तर त्यामुळे काही जागा महानगरपालिकेच्या ताब्यात तर येतीलच परंतु त्यामुळे त्या त्या नागरी सुविधा देखील निधी खर्च न करता प्राप्त होतील. उदाहरणार्थ, शाळेसाठी आरक्षण असेल तर ती जागा त्या प्रयोजनासाठी महानगरपालिकेच्या ताब्यातही मिळेल आणि त्या ठिकाणी शाळा बांधून देखील मिळेल. फक्त त्या बदल्यात संबंधितास डेव्हलपमेंट टीडीआर द्यावा लागणार आहे.

...6.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिप्ती चवधरी...........

सभापती महोदय, पुणे शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अशा प्रकारचा डेव्हलपमेंट टीडीआर देणे गरजेचे आहे. विकास आराखड्यामध्ये याबाबतची तरतूद असली तरी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करुन डेव्हलपमेंट टीडीआरची परिगणना कशा प्रकारे करावी, याची माहिती नसल्यामुळे अंमलबजावणी होत नव्हती. परिगणनेबाबतची माहिती नवीन विकास आराखड्यामध्ये दिलेली आहे. महानगरपालिका सुध्दा याबाबतीत सकारात्मक आहे.

सभापती महोदय, या सर्व पार्श्वभूमीवर माझा मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, पुणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी डेव्हलपमेंट टीडीआरची संकल्पना तेथे प्रभावीपणे राबविण्यात येईल का आणि किती दिवसात ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, महानगरपालिकांना किंवा स्थानिक प्राधिकारी संस्थांना अनेक वेळा भूसंपादनासाठी निधी उपलब्ध होत नाही व त्यामुळे पाहिजे तसा विकास घडवून आणता येत नाही. म्हणूनच शासनाने टीडीआरची संकल्पना अधिक आकर्षक करण्यासाठी एक अभ्यासगट नेमला होता. या अभ्यासगटाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. टीडीआर संबंधीची नियमावली सुधारित करुन राज्यातील पुणे महानगरपालिकाच नव्हे तर राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या विकास नियंत्रण निमयावलीत ॲमेनिटी टीडीआरचा समावेश करुन त्याचा फायदा होईल, असे धोरण शासनाने स्वीकारले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पुणे शहरातील रस्त्यांच्या संदर्भातील टीडीआरचा मुद्दा देखील उपस्थित केला आहे. रस्त्याच्या विकासासाठी कन्स्ट्रक्शन ॲमेनिटी टीडीआर देण्याची तरतूद सध्या पुणे महानगरपलिकेच्या विकास नियंत्रण निमयावलीमध्ये नाही. परंतु, पुणे महानगरपालिकेने सुधारित विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अशा प्रकारची तरतूद केलेली आहे. ही तरतूद मंजूर झाल्यानंतर महापालिकेस कन्स्ट्रक्शन ॲमेनिटी टीडीआरच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करुन घेणे सोयीचे होईल.

यानंतर श्री.वि.खर्चे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील..

यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे, त्यांना तसे आदेश देण्यात येतील. आपला प्रस्ताव आल्यानंतर त्यावर सकारात्मक विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी रस्त्यांचे रुंदीकरण करणे व त्यासाठी डेव्हलपमेंट टीडीआर देण्याची तरतूद शासनाला करावी लागणार आहे. मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, अशा प्रकारे डेव्हलपर्स यांना टीडीआर देण्यासाठी कायद्यात दुरूस्ती करण्यात येणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, होय, या कामासाठी समिती गठीत करण्यात आली आहे, त्या समितीचा अहवाल आल्यानंतर शासनाचे धोरण ठरविण्यात येईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, टीडीआर संदर्भात नगरपालिकांना अधिकार शासनाने दिले आहेत. फक्त महानगर सोडली तर एकाही नगरपालिकेमध्ये टीडीआर संदर्भातील निर्णय झालेला नाही. नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना याबाबत सुस्पष्ट आदेश दिलेले नाहीत. टीडीआर कसा दिला पाहिजे किंवा टीडीआर असा घेतला पाहिजे याबाबत काहीही माहिती नाही. मंत्री महोदयांना विनंती आहे की, मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांची एक कार्यशाळा राज्य स्तरावर आयोजित करण्यात येईल काय ? प्रत्येक शहरात अत्यंत छोटे रस्ते आहेत, त्यामुळे रस्त्यांचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. संबंधित लोकांना टीडीआर दिला तर रस्ते मोठे होऊ शकतील, शासनाचा हा निर्णय चांगला आहे. या निर्णयाची अंमलबजाणी यशस्वीपणे होण्यासाठी मख्याधिकारी व नगराध्यक्ष यांची कार्यशाळा राज्य पातळीवर घेऊन तसे आदेश त्यांना देण्यात येतील काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, यामध्ये दोन प्रश्न आहेत, एक साधा टीडीआर देणे व दुसरा कन्स्ट्रक्शन ॲमिनिटीसाठी टीडीआर देणे. सन्मानीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी सांगितल्याप्रमाणे एखाद्या प्ले ग्राऊंडचे आरक्षण असेल तर त्याचा टीडीआर घेऊन त्याचा विकास करणे, भूसंपादनासाठी पैसे नसल्यामुळे असे प्ले ग्राऊंड किंवा अशा आरक्षित जागेतील काही जागेवर विकासकाला शाळा बांधायला सांगायची व त्यापोटी त्याला टीडीआर द्यायचा. हे दुसरे तिसरे काही नसून एक प्रकारची करन्सीच आहे. त्यामुळे तो टीडीआर हस्तांतरित करता येईल. याला आपण कन्स्ट्रक्शन ॲमिनिटी टीडीआर म्हणतो. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील..

होता की, आपणाला रस्ता करायचा असेल व तेथून डीपी रोड जात असेल तर त्यापोटी टीडीआर मिळेल काय ? या सर्व बाबींची तपासणी करण्यासाठी शासनाने समिती नियुक्त केली आहे. त्या समितीचा अहवाल लवकर येणार आहे. आता फक्त मुंबईत कन्स्ट्रक्शन ॲमिनिटीचा टीडीआर थेट स्वरुपात दिला जातो. इतर गोंष्टीबाबत राज्याचे धोरण ठरविण्यात येणार आहे.

ॲड. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नाशिक विकास आराखड्याचा जेव्हा प्रश्न उपस्थित झाला, तेव्हा देखील मी मुद्दा उपस्थित केला होता. महानगरपालिका व नगरपालिका स्वत: निर्णय घेतात त्यावर देखरेख ठेवण्यासाठी मंत्री महोदयांनी एका कमिटीचा उल्लेख केला आहे. या समितीचा अहवाल शासनाने स्वीकारला आहे काय ? या समितीच्या शिफारशी केव्हापासून प्रत्यक्षात लागू होतील. दुसरा प्रश्न असा आहे की, यासंदर्भात जी नियमावली आहे त्या नियमावलीचे अधिकृत मराठीत भाषांतर झाले नाही. मंत्री महोदय आपण तिसरे नगर विकास राज्यमंत्री आहात. यापूर्वी तत्कालीन नगर विकास राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव, त्यानंतर तत्कालीन नगरविकास राज्यमंत्री श्री.उदय सामंत व आता आपण नगर विकास राज्यमंत्री आहात. हा प्रश्न आम्ही गेल्या तीन वर्षापासून मांडत आहोत. मुंबई महानगरपालिका व सर्व महानगरपालिकांना इंग्रजी नियम वापरावे लागतात. या नियमांचे अधिकृत मराठी भाषांतर अद्यापही झाले नाही. मराठी भाषांतर करणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. असे भाषांतर कधीपर्यत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या समितीचा अहवाल केव्हापासून प्रत्यक्षात लागू होईल, यासंदर्भातील महिती वेबसाईटवर आहे काय, ती माहिती लोकांपर्यंत कशा पध्दतीने शासनाने पोहचविली आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी समितीबाबत प्रश्न उपस्थित केला होता. अशी समिती शासनाने गठीत केलेली आहे, समिती मध्ये संचालक आणि सह संचालक आहेत, या समितीने अहवाल दिलेला आहे. हा अहवाल मुख्यमंत्री कार्यालयात मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे. याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येणार आहे. टीडीआर संदर्भातील अधिकृत मराठी नियमावली भाषांतरीत करायची आहे, त्याबाबत माहिती घेऊन लवकरात लवकर ती नियमावली मराठी भाषेत केली जाईल.

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मुंबईतील मेट्रो प्रवाशांना तिकीट दरवाढीचा बसलेला फटका

**मु.शी.** :मुंबईतील मेट्रो प्रवाशांना तिकीट दरवाढीचा बसलेला फटका यासंबंधी सर्वश्री,सुनिल तटकरे, किरण पावसकर, हेमंत टकले, ख्वाजा बेग, आनंद ठाकूर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुनील तटकरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य सरकारने एमएमआरडीएमार्फत रिलायन्स इन्फ्रा कंपनीशी करार करुन मेट्रो उभारणीचे काम रिलायन्सच्या एमएमओपीएल या कंपनीला देणे, तथापि करारात नमूद केल्यानुसार प्रकल्पाचे काम निर्धारित कालावधीपेक्षा तब्बल दोन वर्षे उशीराने पूर्ण होणे, परिणामी प्रकल्प खर्चात सुमारे 2 हजार कोटी रुपयांची झालेली वाढ, सदरच्या वाढीव खर्चाची शासनाकडे म्हणजे एमएमआरडीएकडे केलेली मागणी, सदर मागणी शासनाने नाकारणे, मेट्रो उभारण्यास रिलायन्सकडून उशीर झाल्याने एमएमआरडीए आणि रिलायन्समधील करारानुसार प्रवाशांना स्वस्त दरातील तिकीट उपलब्ध करुन देणे बंधनकारक असताना स्वस्त दरातील तिकिट उपलब्ध करुन देणे परवडत नसल्याने रिलायन्सने त्यास नकार देणे, मेट्रोचे तिकिट दर ठरविण्यासाठी ऑक्टोबर 2014 पर्यंत शुल्क निर्धारण समिती गठीत करण्याचे मा.उच्च न्यायालयाने दिलेले निदेश, समितीची नियुक्ती करावी याकरीता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे वारंवार पाठपुरावा केल्यानंतरही केंद्र शासनाने शुल्क निर्धारण समिती गठीत न करणे, परिणामी मा.उच्च न्यायालयाने रिलायन्सच्या मनमानी तिकिट दरवाढीला दिलेली मान्यता, त्यामुळे मुंबईतील सर्वसामान्य प्रवाशांवर तिकिट दरवाढीचा बसलेला फटका, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रकल्पाचे कॅगमार्फत ऑडिट करण्यास राज्य सरकारने परवानगी मागून देखील केंद्र शासनाकडून यासंदर्भातील परवानगी मिळालेली नाही. भाडे निश्चितीचा वाद झाल्यानंतर उच्च न्यायालयात हे प्रकरण दाखल झाले. भाडे निश्चितीचे सूत्र ठरविण्यासाठी उच्च न्यायालयाने ऑगस्ट 2014 मध्ये समिती गठीत करण्याची सूचना राज्य सरकारला केली होती, राज्य सरकारने ती सूचना मान्य केली होती. श्री.सुबोध कुमार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली जावी असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला असून अद्यापही केंद्र शासनाने त्या प्रस्तावास मान्यता दिली नाही. त्यामुळे उच्च न्यायालयाने यासंदर्भात तीव्र नाराजी व्यक्त करीत रिलायन्स कंपनीने जी दरवाढ मागितली होती ती दरवाढ मान्य केली असून सुधारित दरवाढीप्रमाणे लोकांकडून भाडे घेण्यात येत आहे. समिती नियुक्त करण्याबाबत उच्च न्यायालयाने ज्या सूचना दिल्या आहेत, त्याबाबत कार्यवाही केव्हा केली जाणार आहे ? याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी न्यायाधीश ई पद्मनाभन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत झाल्याचे घोषित केले होते. अद्यापही ती समिती गठीत झाल्याचे अधिकृत आदेश राज्य शासनाकडून निर्गमित करण्यात आले नाहीत. त्यामुळे ही समिती गठीत केली जाणार आहे काय ? प्रत्येक स्टेशनवर 100 चौरस फूट जागेचा व्यावसायिक वापर करण्याची परवानगी सदर कंपनीला आहे. त्या जागेपेक्षा जास्त जागेचा वापर सदर कंपनी करीत आहे, त्यामुळे या कंपनीवर रिलायन्स किंवा एमएमआरडीएकडून कारवाई करणार येणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी विचारलेल्या पहिला प्रश्नाबाबत मी असे सांगू इच्छितो की, कॅगकडे राज्य शासन स्वत: गेले होते. यामध्ये खर्च किती वाढला आहे, याबाबत थोडी संदिग्धता होती. याबाबत दोन सल्लागार राज्य शासनाने नियुक्त केले होते. सल्लागार यांनी सदर कंपनीकडे पुन्हा पुन्हा माहिती मागीतली तरी ती कंपनी माहिती देत नव्हती म्हणून राज्य सरकार स्वत: कॅगकडे गेले. कॅगने यासंदर्भातील ऑडिटचे काम सुरु केले आहे. दुसरा प्रश्न केंद्रीय समिती कधी स्थापन होणार असा होता. केंद्रीय समिती स्थापन करण्यासाठी शासनाकडून सातत्याने पत्रव्यवहार करण्यात येत आहे. केंद्रीय समितीच्या काही टेक्निकल बाबी राहिल्या आहेत, त्यासंदर्भातील नावे निश्चित झाली आहेत. अंतिम

डॉ.रणजित पाटील...

परवानगी केंद्र शासनाकडून आली नसल्यामुळे समिती गठीत होऊ शकली नाही. 6 मे रोजी कोर्टाची तारीख आहे, त्या तारखेला आपली समिती फेअर फिक्सेशन करुन प्रस्ताव सादर करील असे मी सभागृहाला अवगत करतो.

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेला जे लेखी निवेदन दिले आहे, त्यामध्ये असे नमूद केले आहे की, 31 जानेवारी 2015 पर्यंत हे प्रकरण कॅगकडे पाठविण्याच्या सूचना होत्या. त्यानंतर दोन ते अडीच महिन्यापूर्वी वर्सोवा ते घाटकोपर पर्यंत 20 रुपये भाडे होते ते हायकोर्टाच्या आदेशानुसार 40 रुपये करण्यात आले आहे व परतीचे भाडे 80 रुपये करण्यात आले आहे. याबाबत मुंबईतील लोकांच्या तक्रारी आल्यानंतर भाडे ठरविण्यासाठी केंद्र सरकारने समिती गठीत करावयास पाहिजे होती. ती समिती गठीत करण्यास विलंब झाला आहे. सुप्रीम कोर्टात दिनांक 16 मार्च 2015 रोजी सुनावणी झाली आहे. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार परतीच्या प्रवासाचे मेट्रोचे भाडे 80 रुपये आहे, त्यातील 50 टक्के भाडे म्हणजे 40 रुपये सुप्रीम कोर्टाच्या रजिस्ट्रीमध्ये भरण्याचे आदेश दिले आहेत. पुढील सुनावणी 6 मे 2015 रोजी होणार आहे. दरम्यानच्या काळातील प्रत्येक प्रवाशाचे 50 टक्के वाढीव भाडे सुप्रीम कोर्टाच्या रजिस्ट्रीमध्ये जमा होणार आहे. असा आदेश जेव्हा सुप्रीम कोर्टाने दिला, त्याचा असा अर्थ होतो की, ते भाडे त्या कंपनीला मिळणार नाही.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जनार्दन चांदूरकर........

समजा सुप्रीम कोर्टाने आदेश दिला की, त्या कंपनीला पैसे देऊ नका तर तुम्ही मुंबईकरांना ते पैसे परत देण्याबाबत कार्यवाही करणार आहात काय ? मागील दोन-तीन महिन्यापासून घाटकोपर पासून वर्सोवा पर्यंत जाणाऱ्या ज्या ट्रेन्स आहेत त्या संदर्भात सरकारच्या चुकीमुळे एका खाजगी कंपनीने मुंबईकरांवर डबल भाडे आकारलेले आहे. मग सरकारच्या चुकीसाठी तुम्ही मुंबईकरांना वेठीस धरणार आहात काय आणि याची नुकसान भरपाई म्हणून सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतरही चार महिने मुंबईकरांना पूर्वीच्या दराने समजा भाडे वाढले तरी चार महिने किंवा कायम कमी दर देणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, जे फेअर्स वाढले त्याचे मूळ कारण कंपनीचा खर्च वाढला, हे आहे. त्यामुळे ते कोर्टात गेले. जून ते जानेवारी मध्ये प्रमोशन रेटच होते. हायकोर्टाने 8 जानेवारीला वाढीव दर लागू केले. म्हणजे आपण जे सांगितले त्यावर त्यांनी स्टे दिला. 31 जानेवारी पर्यंत फेअर फिक्सेशन कमिटी गठीत करावी, असे त्यांनी त्यावेळी सांगितले होते. या संदर्भात वारंवार पत्रव्यवहार झाला, प्रयत्न झाले. यामध्ये बरेच हर्डल्स् होते ते पार करत आपण ते केले. आपला जो मूळ करार झाला होता तो ट्राम वे ॲक्ट प्रमाणे झाला होता. त्यावेळी तो प्रचलित कायदा होता. त्यामुळे आपण त्या ॲक्ट प्रमाणे करारनामा केला. परंतु कालांतराने सन 2009 मध्ये मेट्रोचा सुधारित ॲक्ट आला. आपण ट्राम वे ॲक्ट जसाच्या तसा करारनाम्यात घेतला होता. त्या ॲक्टच्या वेळी कोठेही अशी संकल्पना नव्हती की, पब्लिक प्रायव्हेट पार्टिसिपेशनवर आपण असे प्रोजेक्ट आणू शकू आणि म्हणून हे फेअर डिसाईड करण्याचे पूर्ण अधिकार शासनाकडे होते. कालांतराने सन 2009 मध्ये मेट्रो ॲक्ट आला आणि त्यामध्ये अमेंडमेंट करण्यात आली. सन 2009 मध्ये या अमेंडमेंटमुळे दोन बदल झाले. एक म्हणजे, फेअर फिक्सेशन कमिटीकडे जाऊन फेअर फिक्स करणे आणि दुसरे म्हणजे, त्यांनी एमआरए ठरविले. म्हणजे विजेचे दर वाढवायचे असतील तर त्यासाठी एमईआरसी आहे आणि मेट्रोच्या फेअर फिक्सेशनसाठी एमआरए आहे. Lessee आणि Owner रिलायन्स कंपनी असल्यामुळे ते एमआरए झाले. अन्यथा ट्राम वे ॲक्ट प्रमाणे आपण राहिलो असतो. परंतु एमआरए हे रिलायन्स कंपनी झाल्यामुळे त्यांच्याकडे हे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.......

अधिकार गेले आणि म्हणून ही साशंकता आली. आपण यासाठी हायकोर्टात गेलो. आपण हायकोर्टात स्टे मागितला. परंतु आपल्याला स्टे मिळाला नाही. त्यानंतर आपण सुप्रीम कोर्टात देखील गेलो. सुप्रीम कोर्टामध्ये 16 मार्च रोजी सुनावणी झाली त्यामध्ये असे ठरविले आहे की, एप्रिल 2015 पर्यंत भाडे निश्चिती करावी. आपली जी केंद्रीय समिती होणार आहे त्यांनी ही भाडे निश्चिती करावी आणि दुसरे म्हणजे समितीचे निर्णय येईपर्यंत फरकाच्या रक्कमेतून 50 टक्के रक्कम सुप्रीम कोर्टाच्या रजिस्ट्रीमध्ये जमा करावी. सध्या हे प्रकरण सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे. त्यामुळे फेअर फिक्सेशन समितीने जे फेअर दिलेले असतील त्या संदर्भात आणि जो डिफरन्स आहे त्या अमाऊंट बद्दल निर्णय होईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तरात एक बाब मान्य केली की, जे दर ठरवायचे होते ते खर्चाशी निगडित होते आणि या प्रकल्पाचा खर्च वाढला.....

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ते कोर्टात गेले. आपण त्यांचे म्हणणे मान्य केले नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण उत्तरात तसे म्हणाला. आपण काय म्हणालात ते सोडून द्यावे. माझा प्रश्न असा आहे की, हे दर नक्की करताना या प्रकल्पाचा मूळ खर्च किती झाला होता आणि आता दरवाढ देताना त्या कंपनीने या प्रकल्पाचा जो खर्च दाखविलेला आहे तो किती आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मूळ खर्च 2356 कोटी रुपये होता आणि त्यांनी वाढीव खर्चासह जो खर्च सांगितलेला आहे तो 4321 कोटी रुपये आहे. हे त्यांचे म्हणणे आहे. आम्ही तो मान्य केला नाही....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, तुम्ही तो मान्य केला नाही. तरी न्यायालयात युक्तीवाद करण्यात तुम्ही कमी पडलात. एक बाब अशी आहे की, ज्यावेळी 4321 कोटी रुपयांचा खर्च कंपनीने न्यायालयात मांडला त्यावेळी आपण स्पष्ट शब्दात हरकत घ्यावयास पाहिजे होती की,

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

हा वाढीव खर्च आम्हाला मान्य नाही. राज्य शासनाच्या वतीने न्यायालयात ही भूमिका योग्य पद्धतीने मांडली असती तर आज मुंबईकरांवर जी भाडेवाढ झाली ती झाली नसती. त्यामुळे आपण याबाबत नेमकी काय भूमिका घेणार आहात ? तसेच, एमएमआरडीएचे जे जे प्रकल्प झाले त्या प्रकल्पांच्या मूळ किंमती आणि आता वाढलेल्या किंमती याबद्दलची श्वेतपत्रिका राज्य शासन लवकरात लवकर काढणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, वाढलेला खर्च हा बऱ्याच अंशी आपल्या हातचाही नव्हता. कारण, त्याची जी कारणे दिलेली आहेत त्या कारणांमध्ये असे म्हटले आहे की, आपण ट्राम वे ॲक्ट प्रमाणे करार केला. नंतर आपल्याला मेट्रो ॲक्ट प्रमाणे प्रकल्प करावा लागला. त्यामुळे काही गोष्टींची तपासणी करावी लागली. यामुळे प्रकल्प पूर्ण करण्यास लेट झाला असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांचा युक्तीवाद असा होता की, आमचा इनशिअल करार ट्राम वे ॲक्ट प्रमाणे होता आणि त्यासाठी आपल्याला काही गोष्टींची तपासणी करावी लागली, ती तपासणी करण्याची आवश्यकता नव्हती. इतरही काही गोष्टी होत्या. म्हणजे डेपोसाठी लागणारी जागा, आरओडब्ल्यू मध्ये येणाऱ्या इमारती, बांधकामे व धार्मिक स्थळे, जमिनीखाली असलेल्या उपयोगिता साधनांचे म्हणजे युटिलिटीचे स्थलांतर, वाहतूक विभागाकडून मिळणारी परवानगी, पश्चिम रेल्वेकडून अंधेरी येथे बांधण्यात येणाऱ्या पुलाची परवानगी मिळविणे. या सर्व गोष्टींसाठी डिले झाला. आपला प्रश्न असा आहे की, या सर्व गोष्टी खोडून काढण्यासाठी शासन कमी पडले. परंतु असे नाही. आम्ही या संदर्भात भांडतच होतो आणि आज सुद्धा या संदर्भात आम्ही कोर्टात लढत आहोत. आम्ही प्रथम हायकोर्टात स्टे मागण्याकरिता गेलो. हायकोर्टाने त्यांच्या बाजूने निकाल दिल्यानंतर आम्ही त्यांच्या विरुद्ध केस लढण्यासाठी सुप्रीम कोर्टात गेलो. आम्हाला विश्वास आहे की, रिलायन्स कंपनी जेवढ्या भाडयाची मागणी करीत आहे तेवढे भाडे आम्ही निश्चितच देणार नाही. आम्ही त्यासाठी लढू आणि हे भाडे कमी करुन घेऊ.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. यामध्ये दोन बाबी आहेत. राज्यमंत्री महोदयांनी या प्रकल्पाची किंमत वाढल्याचे सांगत असताना वेगवेगळ्या कारणांमुळे विलंब झाला. त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढली.....

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, असे ते म्हणतात. आपण कोर्टात लढत आहोत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महादेय, आपण कोर्टात अयशस्वी झालो. माझा सांगण्याचा मतितार्थ असा आहे की, अनेक वेळा प्रकल्पांच्या किंमती वाढण्यासाठी वेगवेगळी कारणे कारणीभूत ठरतात, हे आपण मान्य करीत आहात. मग हे सूत्र आपल्याला इतर ठिकाणी देखील मान्य करावे लागेल. आपण हे इतर ठिकाणी देखील मान्य करणार आहात काय ? आम्ही या संदर्भात त्या त्या वेळी चर्चा करू. एमएमआरडीएने जे जे प्रकल्प हाती घेतले त्या प्रकल्पांची किंमत नंतरच्या कालावधीत मोठ्या प्रमाणावर वाढत गेली. म्हणून एमएमआरडीएच्या मागील 10-15 वर्षातील कारभाराच्या संदर्भातील एकंदरीत श्वेतपत्रिका आपण काढणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना एका लिमिटेड स्वरुपाची आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी असा प्रश्न विचारला की, एमएमआरडीएच्या मागील 15 वर्षातील सर्व प्रकल्पांची श्वेतपत्रिका काढणार काय ? एमएमआरडीएच्या बाकीच्या प्रकल्पांमध्ये असे झालेले असेल तर ते तपासून पाहण्यात येईल आणि तसे निदर्शनास आले तर निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, अत्यंत साधा विषय कसा क्लिष्ट करावयाचा याचे हे अत्यंत चांगले उदाहरण आहे. दर निगडित कसे करणार, ट्राम वे ॲक्ट काय आहे, फेअर रेग्युलेशन काय करणार याच्याशी सर्वसामान्य मुंबईकरांना काहीही देणे घेणे नाही. हे पब्लिक ट्रान्सपोर्ट आहे. घाटकोपर पासून वर्सोवा पर्यंत लोकल ट्रेन जात नाही. म्हणून तुम्ही मेट्रो रेल्वे आणली आणि आता तुम्ही असे सांगत असाल की, रिलायन्स तयार नाही. आम्ही कोर्टात गेलेलो आहोत. हे प्रकरण वर्षानुवर्षे चालणार आणि त्यानंतर तुम्ही रेट ठरविणार ? मी सांगू इच्छिते की, तुम्ही रेल्वेचे देखील खाजगीकरण करायला निघाला आहात. मग उद्या तुम्ही रेल्वेलाही हेच उत्तर

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.........

देणार काय ? मेट्रो रेल्वेने प्रवास करणे ही आज लोकांची गरज आहे. लोकांना मेट्रो रेल्वेचे 80 रुपये तिकीट परवडणारे नाही. मेट्रो रेल्वेमध्ये पास सिस्टीम नाही. तुम्ही प्रवाशांना पास देणार आहात काय ? तुम्ही रेल्वेचे खाजगीकरण करणार आणि उद्या सांगाल की, रेल्वेचे खाजगीकरण झालेले आहे. आमच्या हातात काही नाही. आम्ही कोर्टात गेलेलो आहोत. लोकांना मेट्रो रेल्वेचा पास कमी पैशात उपलब्ध करुन दिला तर लोकांना रोज प्रवास करणे शक्य होईल. लोकांना रोज 80 रुपयांचे तिकीट काढणे शक्य नाही.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : मी यापूर्वी सांगितले आहे की, या कंपनीच्या फेअर फिक्सेशनसाठी रेग्युलेशन्स आहेत. या रेग्युलेशन्समध्ये एमआरएचा समावेश आहे. ही कंपनी ओनर आणि लेसी आहे. हा मेट्रो प्रकल्प शासनाने बांधलेला नसून कंपनीने बांधलेला आहे. बूट तत्वावर बांधलेला आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : हा प्रकल्प बिल्ट ऑपरेट अँड ओनर तत्वावरील असून त्यामध्ये ट्रान्सफरचा अंतर्भाव नाही.

डॉ.रणजित पाटील : सन्माननीय सदस्य जी माहिती देत आहेत ती सत्य मानून आपण त्याची तपासणी करु.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार भाडे निश्चितीसाठी समिती नेमण्याबाबत आघाडी शासनाने ऑगस्ट, 2014 मध्ये केंद्र शासनास प्रस्ताव दिला होता. या प्रस्तावानुसार 11 मार्च, 2015 पावेतो केंद्र शासनाने समिती नेमली नाही. याचा परिणाम असा झाला की, मुंबईकरांना भाडेवाढ सोसावी लागणार आहे. केंद्र शासनाने समिती नेमण्याबाबत राज्य सरकारकडून काही प्रयत्न झाले का, उच्च न्यायालयाने राज्य शासनावर ताशेरे ओढले आहेत हेही खरे आहे काय? अनेक विषयांबाबत श्वेतपत्रिका काढण्याची भूमिका राज्य शासन घेत असताना एमएमआरडीएच्या वाढीव किंमतीच्या प्रकल्पांबाबत श्वेतपत्रिका काढण्यात येईल काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, तत्कालीन सरकारकडून सुध्दा वेळोवेळी प्रयत्न झालेले आहेत. अतिशय फ्रिक्वेन्टली पाठपुरावा झालेला आहे. जुलै, 2014 पासून 11.3.2015 पर्यंत जो पत्रव्यवहार झाला त्याच्या प्रती मी पटलावर ठेवतो. वेळोवेळी पाठपुरावा केला गेला आहे. माझ्याकडे पत्रव्यवहाराच्या प्रती उपलब्ध आहेत. मी माननीय सदस्यांना पत्रव्यवहाराच्या प्रती देतो. अतिशय प्रामाणिकपणे राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला गेला आहे.

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : तळेगाव दाभाडे येथील माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या खुनाचा तपास संशयाच्या भोवऱ्यात असणे

**मु.शी.** : तळेगाव दाभाडे येथील माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या खुनाचा तपास संशयाच्या भोवऱ्यात असणे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

***"पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे येथील माहिती अधिकार कार्यकर्ते सतीश शेट्टी यांची दिनांक १३ जानेवारी, २०१० रोजी रस्त्यावर निर्घृण हत्या होऊन पाच वर्षाचा कालावधी उलटूनही अद्यापि गुन्हेगाराचा शोध न लागणे, स्थानिक पोलिसांचा तपास, केंद्रीय गुन्हे अन्वेषण (सीबीआय) विभागाचा तपासाचा मार्ग संशयाच्या भोवऱ्यात असणे, मयत सतीश शेट्टी यांनी मावळ तालुक्यातील अनेक जमिनींचे व्यवहार, भ्रष्ट प्रकरणे, माहितीच्या अधिकारातून बाहेर काढणे, शेट्टी यांनी पोलीस संरक्षण मागूनही पोलिसांनी त्यांना वेळीच संरक्षण देण्यासाठी दाखविलेली उदासीनता, सदर प्रकरणाचा तपास अद्यापि अंधारात असल्यामुळे मारेकरी मोकाट असणे, आरटीआयच्या माध्यमातून अनेक प्रकरणे बाहेर काढणाऱ्या मयत सतीश शेट्टीच्या मारेकऱ्यांना अटक करण्यास पोलिसांकडून जाणीवपूर्वक होत असलेली टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."***

प्रा.राम शिंदे (गृह राज्यमंत्री {ग्रामीण}) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुण्यातील तळेगाव दाभाडे येथील माहिती अधिकार कार्यकर्ते सतीश शेट्टी यांचा 11 जानेवारी, 2010 रोजी खून झाला. माननीय सभागृह नेते श्री.एकनाथराव खडसे हे विधानसभेचे विरोधी पक्षनेते असताना त्यांनी या प्रश्नाबाबत खूप आवाज उठविला होता. आज पाच वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. ज्या जमिनींच्या व्यवहाराबाबत सतीश शेट्टी यांना शंका होती त्या जमीन व्यवहारामध्ये आयआरबी कंपनीची सहाय्यक कंपनी आयआरबी इन्फ्रा या कंपनीशी संबंधित अधिकाऱ्यांकडे काही कागदपत्रे सापडली. सीबीआय या प्रकरणी तपास करीत आहे असे निवेदनामध्ये म्हटले आहे. मुळामध्ये आयआरबी कंपनीने जमिनीच्या व्यवहारामध्ये गैरव्यवहार करुन जमिनी बळकावल्या, त्या प्रकरणामुळेच सतीश शेट्टी यांचा खून झाला. त्याचा तपास सीबीआयकडे दिलेला नव्हता. सतीश शेट्टी यांचा खून होण्यामागचे कारण म्हणजे मूळ केसवरुन लक्ष वळविणे हे होते. मूळच्या जमीन गैरव्यवहाराच्या केसचे काय झाले, त्यामध्ये सरकारने कोणती पावले उचलली आहेत?

सभापती महोदय, सीबीआयने सांगितले की, आम्ही आरोपींपर्यंत पोहोचत आहोत. तीन दिवसानंतर क्लोजर अहवाल दिला आणि पुन्हा तपास सुरु केला. राज्य सरकार आणि सीबीआयवर सुध्दा ताशेरे ओढले आहेत. संदीप शेट्टीबाबत काय दक्षता घेतली आहे? आरोपी जामिनावर सुटले आहेत. त्यांच्या जामीन अर्जाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात अपील केले नाही का? उच्च न्यायालयात सरकारचे अपील फेटाळले गेल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासाठी सरकार का पावले उचलत नाही याचे स्पष्टीकरण देण्यात येईल काय? माननीय महसूल मंत्री यांना हा विषय पूर्णपणे माहिती आहे. या विषयाकडे महाराष्ट्राचे अधिक लक्ष लागलेले आहे. त्या दृष्टीने शासन योग्य ती पावले उचलणार आहे का?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मावळ तालुक्यातील माहिती अधिकार कार्यकर्ते सतीश शेट्टी यांच्या खुनाचा प्रकरणाचा विषय उपस्थित केला आहे. मावळ तालुक्यातील भोगवटा जमीन खरेदी विक्री प्रकरणाच्या संदर्भात सतीश शेट्टी यांचा खून झाला. त्यापूर्वी दिनांक 15.10.2009 रोजी एक केस दाखल झाली होती. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्याकडे त्यांनी अर्ज केला होता. त्याद्वारे 13 आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर दोन आरोपींना अटक करण्यात आली. परंतु 'क' वर्ग समरी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे....

अहवाल सादर केल्यानंतर तो गुन्हा संपुष्टात आला. त्यानंतर 2013 मध्ये त्या गुन्हयाच्या संदर्भात हायकोर्टामध्ये रिट पिटिशन दाखल झाली. त्यानुसार दिनांक 8.8.2014 रोजी सदरची केस पुन्हा रिओपन करुन त्याची चौकशी सीबीआय करीत आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : ज्या आरोपींना कोर्टाने जामीन मंजूर केला तो जामीन रद्द व्हावा म्हणून सरकार सर्वोच्च न्यायालयात अपील का करीत नाही? सीबीआय मार्फत तपास पुरेसा होत नाही. आरोपी मोकाट सुटले आहेत त्याबद्दल तुम्ही सीबीआयकडे पाठपुरावा करणार आहात काय?

प्रा.राम शिंदे : 2009 मध्ये गुन्हा दाखल झाला होता. त्यासंबंधी क वर्ग समरी अहवाल कोर्टात गेल्यानंतर केस रिजेक्ट झाली. त्यानंतर हायकोर्टात रिट पिटिशन दाखल झाली. त्यानुसार केस रिओपन झाली असून आता सीबीआय चौकशी करीत आहे. जे काही असेल ते चौकशीमध्ये निष्पन्न होईल. सीबीआय चोकशी करीत असताना राज्य शासनाने चौकशी सुरु केली तर ती वेगळी भूमिका घेतल्यासारखे होईल. सीबीआय चौकशी करीत असल्यामुळे राज्य शासनाकडून वेगळ्या चौकशीची गरज नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, बोगस जमीन गैरव्यवहारासंबंधी सतीश शेट्टी यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार गुन्हा क्रमांक 152/09 मध्ये 13 आरोपींचा समावेश होता. त्या गुन्हयाबाबत क समरी अहवाल सादर करण्याचे कारण काय? त्यानंतर पुढे अनेक गोष्टी घडल्या आहेत. त्याबाबत उत्तर मिळाल्यानंतर इतर गोष्टींचा खुलासा होऊ शकतो.

डॉ.रणजित पाटील : हा गुन्हा 2009 चा असून त्या अनुषंगाने एक निवेदन एसपी, पुणे यांच्याकडे प्राप्त झाले. त्यांनी त्याची दखल घेऊन कलम 420, 467, 468, 469, 471 व 34 अन्वये गुन्हा दाखल करुन घेतला. त्यांनी गुन्ह्याबाबत सर्वतोपरी चौकशी केली. परंतु चौकशीअंती काही निष्पन्न झाले नाही. म्हणून क वर्ग समरी अहवाल न्यायालयात दाखल झाला. गुन्हा दप्तरी बंद झाल्यानंतर रिट पिटिशन दाखल झाली. या संपूर्ण प्रकरणाकडे महाराष्ट्राचे आणि संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले असल्यामुळे पुन्हा केस ओपन करण्याचे सीबीआयला आदेश दिले. माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सीबीआयला अधिकची विनंती करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर 2ए.1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : तापमानातील बदल व अवकाळी पाऊस यामुळे कोकणातील काजू व आंबा बागायतदारांचे झालेले नुकसान

**मु.शी.** : तापमानातील बदल व अवकाळी पाऊस यामुळे कोकणातील काजू व आंबा बागायतदारांचे झालेले नुकसान यासंबंधी ॲड.हुस्नबानू खलिफे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

*"तापमानातील बदल व अवकाळी पाऊस, बदललेली ऋतुचक्रे, सापेक्ष आर्द्रता, इत्यादीमुळे आंबा कलमांवरील फलधारणा प्रक्रिया वारंवार खुंटत असून गेल्या दोन माहिन्यात आंबा कलमांना तीन वेळा आलेला मोहर, वातावरणातील बदलामुळे आंबा व्यवसाय धोक्यात येणे, यंदाच्या आंबा हंगामात आंबा परदेशी पाठविण्यासाठी कृषी विभागाकडून सुरु असलेले जोरदार प्रयत्न, वातावरणातील बदल, त्याचप्रमाणे फवारणीची महागडी औषधे आणि आंबा कलमांना आलेली फलधारणा यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या व्यावसायिकाला आंब्याला दर मिळत नसल्याने आंबा व्यावसायिक मेटाकुटीस येणे, याकरिता शासनाने पाहणी करुन आंबा व्यावसायिकांना व बागायतदारांना नुकसान भरपाई द्यावी अशी सतत मागणी होत असणे, कोकणातील आंबा व काजूच्या पिकांचे अवकाळी पावसाने नुकसान झाल्यास त्या पिकांनाही पीक विमा योजनेत नुकसान भरपाई देण्याचा महत्वपूर्ण निर्णय नुकताच माहे जानेवारी २०१५ मध्ये मंत्री मंडळात घेण्यात येणे, पीक विमा योजनेतंर्गत आंबा व काजूला संरक्षण मिळत आहे परंतु सापेक्ष आर्द्रता तापमानातील बदल व अवकाळी पाऊस, बदललेली ऋतुचक्रे व दरवर्षी होणारे आंबा बागायतीचे नुकसान लक्षात घेता नुकसानीची दोन हेक्टरची मर्यादा वाढवून ती दहा हेक्टरपर्यंत करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."*

..2

प्रा.राम शिंदे (फलोत्पादन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, या वर्षी अवकाळी पावसामुळे कोकणातील जवळ जवळ 48729 हेक्टर क्षेत्रामध्ये आंबा पिकाचे नुकसान झालेले आहे. जवळ जवळ 70 टक्के आंबा पिकांचे नुकसान झालेले आहे. यासाठी आपण हेक्टरी रूपये 25000/- इतकी मदत देण्याचे निश्चित केले आहे. एका हेक्टरमध्ये 100 झाडे धरली तर एका झाडा मागे फक्त 250 रूपये मिळतात. आंब्याचे एक झाड लावल्यानंतर त्यावर 15 वर्षे मेहनत करावी लागते. त्यानंतर मग आंबा पीक येण्यास सुरूवात होते. आपण जर तुटपुंजी मदत दिली तर शेतकऱ्यांचे फारच नुकसान होईल. या वर्षी कृषी विभागाने आंबा निर्यात करण्यासाठी जवळ जवळ 3 हजार बागांची नोंदणी केली होती. अवकाळी पाऊस पडल्यामुळे आता डागी फळ येणार आहे. त्यामुळे आंब्याची निर्यात फार कमी होणार आहे. त्याने देख्रील शेतकऱ्यांची फार मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार आहे. त्यामुळे आपण कमीतकमी 10 हेक्टर क्षेत्रासाठी नुकसान भरपाई द्यावी अशी मी विनंती करते. तसेच, प्रत्येक कलमी झाडामागे नुकसान भरपाई देण्यात येईल काय असा माझा पहिला प्रश्न आहे.

रत्नागिरी जिल्हा हा फलोत्पादन जिल्हा आहे. परंतु, शासनाचे फळ संशोधन प्रक्रिया केंद्र नागपूर येथे आहे. रत्नागिरी जिल्हा फलोत्पादन जिल्हा असल्यामुळे नागपूर येथे असेलेले केंद्र रत्नागिरी येथे हलविण्यात येणार आहे काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, तापमानाच्या बदलामुळे फेब्रुवारी महिन्यामध्ये अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे आंबा आणि काजू पिकांचे नुकसान झाले आहे. जास्त नुकसान होऊन देखील कमी दाखविण्यात आले आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. सन्माननीय सदस्यांनी 48 हजार हेक्टर आंबा क्षेत्राचे नुकसान झाले आहे असे म्हटले असले तरी जवळ जवळ 54885 हेक्टर आंबा पिकाचे नुकसान झालेले आहे. तसेच काजू पिकाचे देखील 55224 हेक्टर नुकसान झाल्याचे अंदाजित करण्यात आलेले आहे. या दोन्ही पिकांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले असून त्यांचे पंचनामे करण्याच्या सूचना शासन स्तरावरून देण्यात आलेल्या आहेत. येत्या आठ दिवसांमध्ये ते पंचनामे होतील. त्यानंतर शासन स्तरावरून अनुदान किंवा सानुग्रह अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात येईल. रत्नागिरी हा फलोत्पादन जिल्हा आहे, तर रिसर्च सेंटर हे नागपूरला

..4

प्रा.राम शिंदे...

आहे यासंबंधी प्रश्न विचारण्यात आला आहे. यासंबंधी मी सांगू इच्छितो की, रिसर्च कुठेही झाले तरी त्याची सुविधा आपल्याला घेता येऊ शकते. आंबा व काजू बागायतदारांना मदत करण्याबातची शासनाची भूमिका आधीच व्यक्त करण्यात आलेली आहे. नुकसानीचे पंचनामे प्राप्त होताच शासन स्तरावरून उचित कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतील.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, रत्नागिरी हा फलोत्पादन जिल्हा आहे. या जिल्ह्याला लागूनच सिंधुदुर्ग जिल्हा आहे. नागपूर येथे फळ संशोधन केंद्र आहे ते आपण तेथेच ठेवावे. मात्र, दापोली कृषी विद्यापीठाअंतर्गत आपण एक उपकेंद्र स्थापन करावे. जेणे करून फलोत्पादन जिल्हा असलेल्या रत्नागिरीला याचा फायदा होईल. यासंबंधातील शासनाने आपली भूमिका व्यक्त केली तर कोकणातील जनतेला आनंदच होईल.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत फळ संशोधन केंद्र स्थापन करण्यात यावे अशी येथे मागणी करण्यात आली आहे. आंब्यावर प्रक्रिया व संशोधन करण्यासाठी इस्त्रायलच्या माध्यमातून इस्त्रो-इंडिया धोरणानुसार बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दोपोली येथे संशोधन केंद्र उभारण्याचा राज्य शासनाचा विचार आहे. त्यातील त्रुटी पूर्ण केल्यानंतर हे संशोधन केंद्र विद्यापीठाच्या अंतर्गत सुरू करण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आंबा व काजूचे नुकसान हे फक्त अवकाळी पावसामुळे झाले असे नाही. आंबा व काजू पिकांवर जानेवारी व डिसेंबर महिन्यांमध्ये फवारणी करण्यात आली होती. माझ्या स्वतःच्या बागा आहेत म्हणून मी हे आपल्याला सांगतो आहे. आंब्याच्या झाडावर फवारण्यात येणाऱ्या औषधांच्या किंमती वाढलेल्या आहेत. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांनी औषधांवर केलेला खर्च देखील वाया गेलेला आहे. पीक आले की, त्या पिकाची चोरी देखील होते. त्यामुळे देखील शेतकऱ्यांचे नुकसान होते. चांगल्या क्वालिटीचा आंबा बाहेर जाईल अशी शक्यता होती. पण ते आता शक्य नाही. आपण पीक विमा योजने अंतर्गत दोन हेक्टरची मदत शेतकऱ्यांना देत आहात. या मदतीने शेतकरी पुढच्या वेळी झाडांना खत आणि पाणी देखील देऊ शकणार नाही. आंबा-काजूचे झाड एक दोन वर्षात तयार होऊन पीक देते असे कधीच होत



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

नाही. आंब्याच्या व काजूच्या झाडाची निगा 10 ते 15 वर्षे करावी लागते. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसानीची तुलना इतर पिकांशी करून चालणार नाही. तेव्हा या दोन पिकांसाठी शासन वेगळी काही भूमिका घेणार आहेत काय ? केळी, द्राक्षांचे नुकसान होते. पण ते पीक घेण्याची पद्धत वेगळी आहे. आंब्याचे झाड हे 15 ते 20 वर्षे असते. त्यामुळे अभ्यास करण्याची गरज आहे. त्यासाठी सरकारची तयार आहे काय तसेच दोन हेक्टर क्षेत्रा पुरत मदत मर्यादित न ठेवता दहा हेक्टर क्षेत्रापर्यंत शासन मदत करणार आहात काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, आंबा व काजू पिकांचे नुकसान अवकाळी पाऊस, गारपीट व हवामानाच्या बदला मुळे नव्हे तर औषध फवारणीमुळे देखील नुकसान झालेले आहे असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी उपस्थित केला आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, औषध फवारणीसाठी लाखो रूपये खर्च करण्यात आले आहेत. औषधांच्या किंमती खूप आहेत. तो खर्च देखील वाया गेला आहे.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सभापती महोदय, आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांचे जे काही आर्थिक नुकसान झाले आहेत त्यासाठीच आपण सानुग्रह अनुदान देत आहोत. सदर मदत ही फक्त दोन हेक्टर क्षेत्रा पर्यंत देण्यात येते असा देखील सन्माननीय सदस्यांचा मुद्दा होता. दोन हेक्टर क्षेत्रा पर्यंतच मदत देण्यासंबंधातील सध्या नियम आहे. दोन हेक्टर क्षेत्राच्या ऐवजी 10 हेक्टर क्षेत्र करण्यासंबंधीचा प्रस्ताव सन 2013 मध्ये केंद्र शासनाला पाठविला होता. पुन्हा एकदा 2 हेक्टर क्षेत्रा ऐवजी 10 हेक्टर क्षेत्राला मदत करण्याची परवानगी द्यावी अशी राज्य शासनातर्फे केंद्र शासनाला विनंती करण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभाती महोदय, ही महत्त्वाची लक्षवेधी सूचना आहे. ती आपण थोडक्यात संपविणे बरोबर नाही. कोकणातील शेतकऱ्यांकडे कायमचेच दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. यावर्षी आंबा बागायतदारांचे 70 ते 80 टक्के नुकसान झालेले आहे. शासन आता मदत करणार आहे. कोकणामध्ये गरीब शेतकरी आहेत, त्यांच्या अंगणात 10 ते 15 झाडे असतात. त्या झाडांचा देखील सगळा मोहर गळून गेलेला आहे. त्यामुळे आपण छोट्या व मोठ्या शेतकऱ्यांना

...6

श्रीमती विद्या चव्हाण....

मदत करावी. या झाडांवर फवारणी करण्यात येणारी औषधे महाग आहेत. आज कोकणात गडी सुद्धा मिळेनासे झाले आहेत. तेव्हा शासनातर्फे देण्यात येणारी मदत ही अत्यंत तुटपंजी आहे. दरवर्षी आंबा बागायतदारांना नवी मुंबईतील एपीएमसी मार्केटमध्ये यावे लागते. तेव्हा एपीएमसीने रत्नागिरी आणि देवगड येथे सेंटर्स उघडावित. जेणे करून शेतकऱ्यांचा वाहतुकीचा व पेट्यांसह इतर खर्च वाचू शकेल. आज हा सर्व खर्च शेतकऱ्याला उचलावा लागतो. त्यात शेतकऱ्याला दिलासा मिळू शकेल.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी चांगला प्रश्न उपस्थित केला आहे. आंबा उत्पादकांना तुटपुंजी मदत दिली जाते असे त्यांचे म्हणणे आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, यापूर्वीच्या कालखंडात आंबा उत्पादकांना जी मदत दिली जात होती त्या मदतीपेक्षा या शासनाने दुपटीपेक्षा जास्त वाढ केलेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेते राज्याचे कृषी मंत्री झाल्याबरोबर त्यांनी 4 फेब्रुवारी, 2015 रोजी नवीन परिपत्रक काढले असून आंबा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी 25 हजार रुपये देण्याचे मान्य केले आहे. ही मदत एक महिन्यापूर्वीच वाढविण्यात आलेली आहे. या अगोदर आंबा उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी 10 हजार रुपये मदत दिली जात होती ती आता हेक्टरी 25 हजार रुपये करण्यात आलेली आहे. आपल्याला ही मदत कमी वाटत असेल तर पुन्हा एकदा नव्याने सरकार आल्यानंतर त्यामध्ये पुन्हा मदत वाढवून दिली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

ॲड. हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, मागच्या वर्षापेक्षा या वर्षी आंबा आणि काजू पिकाचे नुकसान मोठया प्रमाणात झालेले असल्यामुळे आम्ही आंबा व काजू उत्पादकांसाठी जास्त मदतीची मागणी करीत आहोत. यावर्षी कोकणामध्ये आंब्याचे 80 टक्के पिकाचे नुकसान झालेले आहे. परंतु शासन यासंदर्भात जी काही नुकसान भरपाई देत आहे ती केवळ 5 टक्के सुध्दा नाही. आंबा, काजू बागायतदारांसाठी आंबा काजू बोर्ड तयार करण्यात आलेले आहे. त्यामुळे आंबा-काजू बोर्ड केव्हापासून कार्यान्वित होणार आहे, हे बोर्ड आमच्या समस्या केव्हा सोडवणार आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आंबा उत्पादकांचा हा अतिशय जिव्हाळयाचा प्रश्न आहे. यावर्षी कोकणातील आंबा व काजू पिकाचे वादळामुळे व गारपिटीमुळे मोठया प्रमाणात नुकसान झालेले असून यासंदर्भात राज्य शासनाने काही निर्णय घेतलेले आहेत. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिली जात नसून सानुग्रह अनुदान दिले जात आहे. मागच्या कालखंडात हेक्टरी 10 हजार रुपये अनुदान दिले जात होते ते आता हेक्टरी 25 हजार रुपये दिले जात आहे. आंब्याच्या पिकासाठी हेक्टरी 1 लाख रुपयांपर्यंतचे विम्याचे संरक्षण दिलेले असून काजू पिकाला हेक्टरी 75 हजार रुपयापर्यंतचे विम्याचे संरक्षण दिलेले आहे. हे जे विम्याचे संरक्षण आहे ते

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे.........

अतिशय अल्प आहे. त्यामुळे किमान विमा संरक्षण 2 लाख रुपये मिळावे यासाठी शासन विमा कंपनीशी चर्चा करुन विम्याचे संरक्षण वाढवण्याबाबत राज्यसरकारचा प्रयत्न असून यासंदर्भात विमा कंपनीशी प्राथमिक स्वरुपाची बैठक देखील झालेली आहे.

सभापती महोदय, काजू आणि आंबा परदेशात विकण्यासाठी किंवा विक्रीची व्यवस्था करण्यासाठी "महा मँगो" नावाचे बोर्ड आहे. गेल्या 7/8 वर्षापासून "महा मँगो" बोर्ड बंद पडलेले आहे. हे बोर्ड सहकारी संस्था कायद्याअंतर्गत रजिस्टर झालेले बोर्ड होते. हे बोर्ड सरकारचे नाही. जवळपास 15 वर्षापूर्वी माननीय श्री. शरद पवार साहेबांनी केळीच्या संदर्भात "महा बनाना" तसेच आंब्याच्या संदर्भात "महा मँगो" या फळांची विक्री करण्यासाठी सहकारी संस्था रजिस्टर्ड करुन हे बोर्ड तयार केले होते. परंतु पुढे हे काम जाऊ शकले नाही. त्यामुळे या संस्थेचे पुन्हा पुनरुज्जीवन करता येईल काय, या बोर्डाच्या माध्यमातून परदेशात विक्रीसाठी माल पाठविता येईल काय तसेच नवी मुंबईच्या ऐवजी रत्नागिरी व तत्सम कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी यासंदर्भात पुढाकार घेतला तर उप केंद्र किंवा तशा प्रकारची परवानगी देण्याचा सरकार निश्चितपणे विचार करेल. खरे म्हणजे यासाठी तेथील स्थानिक लोकांनी तसेच तेथील मार्केट कमिटीने पुढे येण्याची आवश्यकता आहे. तेथील मार्केट कमिटीने किंवा लोकांनी येऊन पुढाकार घेतला तर राज्य सरकार त्याला निश्चितपणे मान्यता देईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

-------------

....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : चंद्रपूरच्या धर्तीवर बुलढाणा जिल्हयात संपूर्ण दारुबंदी करणे

**मु.शी.** :चंद्रपूरच्या धर्तीवर बुलढाणा जिल्हयात संपूर्ण दारुबंदी करण्या यासंबंधी सर्वश्री ***विनायक मेटे, धनंजय मुंडे, विजय ऊर्फ भाई गिरकर, महादेव जानकर, मितेश भांगडिया,*** वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनायक मेटे (राज्य उत्पादन शुल्क राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"चंद्रपूरच्या धर्तीवर बुलढाणा जिल्ह्यात संपूर्ण दारुबंदी व्हावी या मागणीसाठी अस्तित्व महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा तथा दारुबंदी लढा उभारलेल्या श्रीमती प्रेमलता सोनोने यांनी व इतर बहुसंख्य महिलांनी दिनांक ८ मार्च, २०१५ या महिला दिनापासून बुलढाणा येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर "विना छत्र दारु बॉटल बैठो आंदोलन" सुरु केलेले असणे, रिक्त दारुच्या बाटल्यांच्या ढिगामध्ये स्वत:ला गुरफटून घेणे व त्याच अवस्थेत एका ठिकाणी सतरा तास बसणे, दारु विरुध्द उभारलेल्या या यलगारामध्ये अनेक सामाजिक संघटना सहभागी होणे व विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तसेच जिजाऊंचे माहेरघर असलेल्या व जागतिक किर्तीच्या लोणार सरोवर व संतांची भूमी असलेल्या संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात चंद्रपूरच्या धर्तीवर दारुबंदी व्हावी अशी मागणी करण्यात येणे, याला अनेक सामाजिक संघटना, महिला संघटना, शेतकरी संघटना, संत साहित्य परिषद व अनेक महिलांनी पाठिंबा दर्शविणे, जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी या आंदोलनाची कोणतीही दखल न घेता दुर्लक्ष करणे, बुलढाणा जिल्ह्यात संपूर्ण दारुबंदी करण्यासाठी शासनाने करावयाची कृती आणि या सामाजिक अतिमहत्वाच्या विषयाकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."***

श्री. दिलीप कांबळे ( विशेष सहाय्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयात दारुबंदी केल्यामुळे मी सुरुवातीला युती शासनाचे अनिनंदन करतो. या निर्णयामुळे चंद्रपूर जिल्हयातील गुन्हेगारी, व्यसनाधिनतेची संख्या जशी कमी होत चालली आहे तसे महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण सुध्दा कमी होऊ लागले आहे.

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयाप्रमाणेच बुलढाणा जिल्हयातील महिला वर्गाने बुलढाणा जिल्हा दारुमुक्त व्हावा म्हणून आंदोलन केले आहे. जिल्हयातील प्रत्येक तालुक्यामध्ये महिलांनी आंदोलन केलेले आहे. दारुमुळे मोठया प्रमाणात व्यसनाधिनता वाढत चालली आहे. प्रत्येक वर्षी कमीतकमी 15 ते 20 टक्क्याची वाढ दारुच्या व्यसनाधिनतेमध्ये होत असून यामध्ये तरुणांचा मोठया प्रमाणात सहभाग आहे. दारुच्या व्यसनामुळे गुन्हेगारीत वाढ होते, महिलांवरील अत्याचारांमध्ये वाढ होते. हे गुन्हे जर रोखावयाचे असतील तर बुलढाणा जिल्हयात पूर्णपणे दारु बंदी होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, चंद्रपूर जिल्हयामध्ये दारुबंदी होण्याच्या अगोदर चंद्रपूर जिल्हयाच्या पालक मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली एक समिती तयार करण्यात आली व या समितीने चंद्रपूर येथे दारुबंदीचा निर्णय घेतला त्याप्रमाणेच माननीय राज्य उत्पादन शुल्क मंत्री श्री. खडसे साहेब हे बुलढाणा जिल्हयाचे पालक मंत्री आहेत. त्यामुळे माननीय श्री. खडसे साहेब बुलढाणा जिल्हा दारुबंदीसाठी आपल्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करतील काय ? बुलढाणा जिल्हा ज्या प्रमाणे गजानन महाराजांचा जिल्हा आहे त्याच प्रमाणे तो राजमाता जिजाऊ यांचाही जिल्हा आहे. दुर्दैव असे आहे की,महिलावर अत्याचार होत असल्यामुळे महिला रस्त्यावर येत असतांना बुलढाणा जिल्हयात 45 बिअर बार महिलांच्या नावाने असून 2 परवाने खुद्द शेगाव येथील आहे व एक परवाना सिंदखेडराजा येथील आहे. माझा महत्वाचा प्रश्न असा आहे की, किमान महिलांच्या नावावर असणारे परवाने ताबडतोब रद्द केले जातील काय ?

श्री दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मेटे साहेबांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, संपूर्ण बुलढाणा जिल्हयात दारुबंदीसाठी आंदोलन सुरु आहे हे अंशतः खरे आहे.

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे.......

दि.9 मार्च जागतिक महिला दिनाच्या दुसऱ्या दिवशी अस्तित्व महिला बहुउद्देशीय संस्थेच्या प्रेमलता सोनवणे यांनी एक दिवसाचे आंदोलन केले होते. शासनाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना विनंती केल्यानंतर त्यांनी आंदोलन थांबवलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दुसरा असा प्रश्न उपस्थित केला आहे की, या बुलढाणा जिल्हयामध्ये महिलांच्या नावाने असणारे परवाने शासन रद्द करणार आहे काय ?

माननीय सभापती महोदय, या राज्यामध्ये पुरुषांना व महिलांना समान अधिकार आहेत. त्यामुळे लायसन्ससाठी महिलेने अर्ज केला असेल व तिला लायसन्स मिळाले असेल तर ते लायसन्स रद्द करता येत नाही.

श्री. विनायक मेटे : ज्यांच्या नावाने शॉप आहे त्यांनीच ते चालवले पाहिजे, ते शॉप दुसऱ्याने चालवता कामा नये.

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, एखाद्या ठिकाणचे दुकान बंद करण्याच्या संदर्भात दोन शासन निर्णय आहेत.

यानंतर श्री. अजित......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे....

दिनांक 25 मार्च, 2008 आणि दिनांक 12 फेब्रुवारी, 2009 असे दोन शासन निर्णय काढण्यात आलेले आहेत. एखाद्या ठिकाणी ऑब्जेक्शन घेण्यात आले असेल, काही प्रश्न निर्माण झाले असतील, एखादे दारुचे दुकान बंद करायचे असेल तर त्या ग्रामपंचायतीतील, त्या प्रभागाच्या मतदारयादीतील 25 टक्के महिलांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदन देणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी ती यादी तपासून मतदान घेतील. दारुचे दुकान बंद करण्यासाठी 52 टक्केपेक्षा जास्त मतदान झाले तर ते दारुचे दुकान बंद करण्यात येईल. उभी बाटली आडवी करता येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी येथे सांगितले की, मतदार यादीतील 25 टक्के महिलांनी निवेदन दिल्यावर उभी बाटली आडवी बाटली होऊ शकते. माझ्या माहिती प्रमाणे राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये असे हजारो ठराव महिलांनी दिलेले आहेत. मागील तीन-चार वर्षापासून त्या ठरावांचा आढावा घेण्यात आलेला नाही. बारामती जिल्ह्यातील माळेगाव येथे दारुबंदीसाठी अंगणवाडी शिक्षिकेने मागणी केल्यावर त्या ठिकाणी संघर्ष झाला. परंतु माळेगाव येथे अजूनही दारुबंदीसाठीची प्रक्रिया सुरु झालेली नाही. ज्या गावांमध्ये 25 टक्के महिलांनी दारु बंदीची मागणी केलेली आहे त्या ठिकाणी पुढील एक महिन्यात दारुबंदीची प्रक्रिया सुरु करण्यासाठी संबंधितांना निर्देश देण्यात येतील काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, आतापर्यंत अशा ठरावाच्या अंतर्गत 112 दुकाने बंद करण्यात आली आहेत. सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेली आहे की, ज्या गावांमध्ये अशाप्रकारचे ठराव झालेले आहेत तसेच त्यांनी माळेगावचा उल्लेख केला, त्याबाबत सांगू इच्छितो की, ज्या ठिकाणी असे ठराव झाले असतील त्याचा आढावा घेऊन त्याबाबतची अंमलबजावणी शासनाकडून लवकर करण्यात येईल.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** जैतापूर जि.रत्नागिरी येथील मोर्चा संबंधी
**मु.शी.:** जैतापूर, जि.रत्नागिरी येथील मोर्चासंबधी
मानसनीय गृहराज्यमंत्र्यांचे निवेदन

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री ) : सभापती महोदय, आज जैतापूर, जि.रत्नागिरी येथे मोर्चा निघाला होता. खासदार श्री. विनायक राऊत, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्री.राजन साळवी व श्री.उदय सामंत यांच्या नेतृत्वाखाली दुपारी 1.00 वाजता हा मोर्चा निघाला होता. या मोर्चामध्ये साधारणतः हजार ते बाराशे लोक होते. दुपारी 2.00 वाजता मोर्चा संपुष्टात आला. मोर्चामध्ये ताब्यात घेतलेल्यांची संख्या 612 आहे. कुठेही अनुचित प्रकार घडलेला नाही. सर्वत्र शांतता आहे.

--------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**विशेष उल्लेख**

**पृ.शी./मु. शी.** : आमदारांना देण्यात येणाऱ्या "स्थानिक विकास कार्यक्रम निधीच्या" मार्गदर्शक तत्वांमध्ये बदल करणे याबाबत ॲड.रामहरी रुपनवर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"आमदारांना विकास कामांसाठी देण्यात येणारा "स्थानिक विकास कार्यक्रम निधी" वितरित करण्यासाठी शासनाने काही मार्गदर्शक तत्वे बनविलेली आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांची व्याप्ती अतिशय मर्यादित असल्यामुळे अनेक लोकप्रतिनिधींना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. स्थानिक पातळीवरील लहान-लहान कामांची व्याप्ती या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नाही. त्याचप्रमाणे अनेक कामांच्या वैधतेची स्पष्ट वाच्यता नाही. त्यामुळे वेगवेगळे जिल्हा नियोजन अधिकारी एकाच कामाचे वेगवेगळे निकष ठरवितात असे आढळून आले आहे. "स्थानिक विकास कार्यक्रम निधी" वितरणासंबंधीच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये काही बदल करण्याची आवश्यकता असल्याने विधानसभा व विधानपरिषद सदस्यांची एक समिती गठीत करण्यात यावी व सर्व आमदारांकडून त्यांच्या सूचना / अभिप्राय मागविण्यात यावेत. तसेच हा निधी शासकीय दिरंगाई व होणारा विलंब यामुळे वर्षा अखेरीस व्यपगत न करता पुढील वर्षाकरिता वर्ग करण्यात यावा, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या बाबीकडे मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे."

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी./मु. शी.** :मुंबईतील कोळी बांधवांना मासळी सुकविण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणे याबाबत श्रीमती विद्या चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"मुंबईचे मूळ नागरिक असलेले कोळी बांधव पारंपारिक पद्धतीने मासेमारी करीत असणे, त्यांची मासळी सुकविण्यासाठी समुद्रावर जागा अपुरी असणे, त्यामुळे मासे वाळवायाचे कुठे असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण होणे, राज्यात सुक्या मासळीची मागणी मोठ्या प्रमाणात असणे, कुक्कुटपालनासाठी सुक्या मासळीचा वापर केला जाणे, मात्र मढ किनाऱ्यावर पर्यटकांना मोकळा श्वास घेता यावा व मच्छीमारांचाही रोजगार न बुडविण्यासाठी सरकारने मच्छी सुकविण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. मच्छीमारांना मासे वाळविण्यासाठी सिमेंट क्रॉंक्रिटचे ओटे बांधण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारा शासनास करीत आहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी./मु. शी.** : थेऊर ता.हवेली, जि.पुणे, येथील ग्रामपंचायत सदस्य श्री.राजेंद्र कांबळे या दलित तरुणावर त्या गावचे सरपंच आणि इतर 11 साथीदाराने केलेला प्राणघातक हल्ला याबाबत ॲड.जयदेव गायकवाड, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.जयदेव गायकवाड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"थेऊर तालुका हवेली, जिल्हा पुणे या गावी दिनांक 16 नोव्हेंबर, 2014 रोजी रात्री 8.00 च्या सुमारास ग्रामपंचायत सदस्य श्री.राजेंद्र बाबू कांबळे या दलित तरुणावर त्या गावचे विद्यमान सरपंच आणि त्यांच्या 11 साथीदारांनी कट रचून संगनमताने जातीयवादातून प्राणघातक हल्ला करण्यात येणे. सदर हल्ल्यात श्री.राजेंद्र कांबळे गंभीर जखमी झाला असता त्याच्यावर ससून रुग्णालयात उपचार केले असून या प्रकरणी लोणीकाळभोर पोलीस स्टेशन येथे 11 जणांवर ॲट्रॉसिटी ॲक्ट अन्वये तसेच प्राणघातक हल्ला, खुनाचा प्रयत्न याबाबत भा.दं.वि.307 व इतर कलमांन्वये गुन्हा दाखल केला असतानाही सरपंचासह त्यांचे पाच साथीदार फरार असून शासनामार्फत सदर घटनेस 4 महिन्यांचा कालावधी होऊन कारवाई करण्यात आली नसल्याने हल्लेखोरास पोलिसांमार्फत संरक्षण देण्यात येत असलेला संशय, याबाबत सदर हल्लेखोराचा तपास करुन कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी./मु.शी.** : राज्यात अनधिकृत लॅबवर व ज्या लॅबमध्ये पॅथॉलॉजिस्ट नाही अशा लॅबवर कारवाई करणे याबाबत श्री.किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, कोणताही आजार झाल्यानंतर त्याचे निदान करण्यासाठी रक्त तपासले जाते. पॅथॉलॉजी लॅबमधून रिपोर्ट आल्यावर रुग्णास कोणता आजार झाला आहे हे समजते. माझ्याकडे अनधिकृत लॅब आणि अनधिकृत पॅथॉलॉजिस्टची यादी आहे. आपण यावर नियंत्रण ठेवले नाही तर ज्यांना जो आजार झालेला नाही तो आजार दाखविला जाईल आणि अशाप्रकारच्या केसेस घडत आहेत. या संदर्भात मी विशेष उल्लेख मांडत आहे.

"मुंबईसह राज्यभर आजच्या घडीला सर्वसाधारण 2 हजार पॅथॉलॉजिस्टची संख्या असणे, मात्र पॅथॉलॉजी लॅबची संख्या दुप्पट म्हणजे जवळपास 5 हजार इतकी असणे, अधिकृत लॅब म्हणजे पॅथॉलॉजिस्ट असणारा व महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमध्ये नोंदणी असणाऱ्या पॅथॉलॉजिस्ट लॅब, परंतु अनेक शहरे, ग्रामीण, महानगरपालिका क्षेत्रामध्ये जवळजवळ एकूण 270 अनधिकृत लॅब असून अशा लॅबमध्ये अप्रशिक्षित कर्मचारी वर्ग कार्यरत असणे. काहींचे शिक्षण बी.एससी, दहावी, बारावी पर्यंत झालेले असणे, तरीही अशा व्यक्तींकडून सर्रासपणे पॅथॉलॉजिकल (रक्त, लघवी व तत्सम) चाचण्या सर्रासपणे केल्या जात असून त्याप्रमाणे निदानाच्या या रिपोर्टवर विश्वास ठेवून रुग्ण औषधोपचार घेत असल्याने असंख्य रुग्णांचा जीव धोक्यात येत असणे, संपूर्ण राज्यात लॅबची परिस्थिती अतिशय भीषण असल्याचे दिसून येत असल्याने याबाबत चौकशी करुन अनधिकृत लॅब व ज्या लॅबमध्ये पॅथॉलॉजिस्ट नाही अशा लॅबवर तातडीने कारवाई करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारा शासनास करीत आहे."

-----

..7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आज माझ्याकडे ज्या विशेष उल्लेखाच्या सूचना आलेल्या आहेत तेवढ्याच सूचना मी येथे घेणार आहे. त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही सदस्यांस विशेष उल्लेखाची सूचना मांडण्याची परवानगी देणार नाही. तेव्हा सन्माननीय सदस्य्ांनी माझ्याकडे विशेष उल्लेख मांडण्याचा आग्रह धरु नये.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : ऑनलाईन नेटवर्क नादुरूस्त असल्याने तसेच कर्मचाऱ्यांना सॉफ्टवेअरची योग्य माहिती नसल्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात सुकन्या समृध्दी योजनेचे खाते उघडण्यात येत असलेली अडचण, याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

"राज्यात स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी शासनाकडून सुकन्या समृध्दी योजना राबविण्यात येणे, सदर योजना दिनांक 2 डिसेंबर, 2014 पासून लागू होणे, सदर योजनेचे खाते राज्यातील डाक विभागाअंतर्गत ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येत असणे, सदर ऑनलाईन नेटवर्क नादुरूस्त असल्याने चंद्रपूर जिल्ह्यात ऑनलाईन नेटवर्कच्या अभावामुळे खाते उघडण्यास अडचण निर्माण होणे, तसेच तज्ज्ञ कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे व त्यांना सॉफ्टवेअरची योग्य माहिती नसल्यामुळे सुकन्या समृध्दी योजनेचे खाते उघडण्यात होत असलेली अडचण, त्यामुळे सदर योजना प्रभावी करण्याच्या दृष्टीने तातडीने करावयाची कार्यवाही."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : वालधुनी नदी पात्रातील पाण्याचे संरक्षण व संवर्धन करणे, याबाबत श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"दिनांक 26 जुलै, 2005 च्या अतिवृष्टीमध्ये वालधुनी नदीला आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात वित्तहानी झालेली असताना भविष्यात अशी अप्रिय घटना घडू नये वा जीवितहानी होऊ नये यासाठी नदीपात्रातील पाण्याचे संरक्षण व संवर्धन होऊन त्याचा योग्य विनियोग व्हावा या उदात्त हेतूने तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली वालधुनी नदी विकास प्राधिकरणाची स्थापना केलेली असणे, या प्राधिकरणाच्या कामात सुसूत्रता यावी यासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली एक उप समिती गठीत केलेली असणे, दिनांक 22 फेब्रुवारी, 2011 रोजी स्थानिक लोकप्रतिनिधीने तत्कालीन केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांना या नदीच्या दुरवस्थेबाबत केलेल्या पत्रव्यवहारानुसार माननीय संचालक, भारतीय नदी संरक्षण निदेशालय, नवी दिल्ली यांनी महाराष्ट्राच्या तत्कालीन पर्यावरण सचिव यांच्याकडे सदरहू वालधुनी नदीसंदर्भात अहवाल मागविलेला असणे, या बाबत वालधुनी नदी विकास प्राधिकरणाची बैठक दिनांक 30 जुलै, 2011 रोजी माननीय जिल्हाधिकारी ठाणे यांच्या कार्यालयात संपन्न होऊन या बैठकीमध्ये निरी या संस्थेने तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे सादरीकरण झाल्यानंतर हा अहवाल दिनांक 3 ऑगस्ट, 2011 रोजी शासनाच्या नगरविकास विभागाकडे सादर केलेला असणे, याच वालधुनी नदीपात्रात अंबरनाथ येथील रासायनिक कंपन्या, उल्हासनगर येथील जीन्स उद्योग व जिल्ह्याबाहेरील काही रासायनिक कंपन्यांमधून विना प्रक्रिया रसायन मिश्रित सांडपाणी सोडण्यात येत असल्याने उल्हासनगर येथील सुमारे 600 जणांना वायुबाधा झाल्याची घटना नुकतीच घडलेली असतानाही शासनाकडून या नदीपात्रातील पाण्याचे संरक्षण व संवर्धन करण्यात यावे, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : मुंबई महापालिकेने 1 एप्रिल पासून 14.52 टक्के दराने कर वसुली करण्याचा निर्णय घेतल्यामुळे पुढील वर्षी मुंबईतील जनतेवर पडणारा आर्थिक बोजा, याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"महापालिकेने मालमत्ता कराची आकारणी करताना अवलंबलेल्या मूल्याधारित मालमत्ता कर प्रणालीमुळे सन 2010 पासून बिल्टअप क्षेत्रफळावर मालमत्ता कराची आकारणी करणे, बिल्टअप क्षेत्रफळावर मालमत्ता कराची आकारणी करणे योग्य नसल्यामुळे काही लोकांनी या बाबत न्यायालयात धाव घेतली असता, न्यायालयाच्या आदेशानुसार मालमत्ता कराची प्रत्यक्ष चटईक्षेत्रावर (कार्पेट) आकारणी करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेणे, त्याच बरोबर पालिकेने 1 एप्रिलपासून 14.52 टक्के दराने कर वसुली करण्याचा निर्णय घेणे, यामुळे पुढील वर्षी मुंबईतील जनतेवर आर्थिक बोजा पडणे, म्हणून सन 2010 पासून आतापर्यंत बिल्टअप क्षेत्रफळावर वसूल केलेली अतिरिक्त रक्कम आगामी मालमत्ता बिलात समाविष्ट करून मुंबईतील जनतेला दिलासा देण्यात यावा, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : भाईंदर (पूर्व) येथील सेंट फ्रान्सिस हायस्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची होत असलेली छळवणूक, याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"सेंट झेवियर व रेयॉन ग्रुप ऑफ स्कूल या संस्थेच्या भाईंदर (पूर्व) येथील सेंट फ्रान्सिस हायस्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची होत असलेली छळवणूक तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांची होत असलेल्या आर्थिक पिळवणुकीबाबत माहे नोव्हेंबर, 2014 पासून आजतागायत शासनाकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत, परिणामी या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह शाळेच्या मुख्याध्यापिका यांची देखील शालेय व्यवस्थापनांकडून गेल्या तीन वर्षांपासून छळवणूक करण्यात येऊन संस्था चालकांकडून मुख्याध्यापिका व अन्य शिक्षकांना भाडोत्री गुंडांकरवी मारहाण करण्यात येऊन धमक्या देण्यात आलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर सदर मुख्याध्यापिका यांना जबरदस्तीने आपल्या पदाचा राजीनामा देण्यास भाग पाडून त्यांचा राजीनामा घेणे, त्या प्रकरणी मुख्याध्यापिकेने दनांक 7 जून, 2014 रोजी नवघर पोलीस ठाणे, भाईंदर येथे शाळेच्या संचालक व व्यवस्थापनाविरुध्द लेखी तक्रार नोंदविण्यात येऊनही पोलिसांकडून शाळा व्यवस्थापनाविरुध्द कारवाई न करता त्यांना पाठीशी घालण्यात येत आहे. इतकेच नव्हे तर ठाणे जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकारी तसेच शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांनी देखील संबंधित संस्थेविरुध्द कारवाई करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करणे, संबंधित मुख्याध्यापिका यांच्याकडून जबरदस्तीने लिहून घेतलेला राजीनामा त्या परत घेत असल्याने संस्थेस दिनांक 10 जुलै, 2014 रोजी लेखी कळवूनही त्यांना नोकरीत पुन्हा न घेता त्यांच्यावर अन्याय करण्यात येत असल्याचे माहे फेब्रुवारी, 2015 च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे, परिणामी सदर सेंट फ्रान्सिस हायस्कूल, भाईंदर (पूर्व) या शाळेच्या संचालक व्यवस्थापनाविरुध्द कारवाई करुन तेथील मुख्याध्यापिका व शिक्षक यांना पुन्हा सेवेत घेण्यात यावे, एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी मांडलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या अनुषंगाने सांगतो की, शिक्षण उपसंचालकांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांना आदेश दिले होते की, तातडीने त्या शाळेची चौकशी करुन संबंधित शिक्षिकेला न्याय द्यावा. परंतु अद्यापपर्यंत ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी या प्रकरणी कोणतीही हालचाल केलेली नाही. त्यामुळे संबंधित शिक्षक या संदर्भातील चौकशी करण्यासाठी शिक्षणाधिकारी कार्यालयात येत आहेत. परंतु त्यांची गंभीर दखल घेतली जात नाही. हा गंभीर विषय आहे. एका बाजूला शाळेचे व्यवस्थापन शिक्षकांना त्रास देत आहेत आणि दुसऱ्या बाजूला विभागाचे अधिकारी सुध्दा त्या शिक्षकांना सहकार्य करीत नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे व श्री.रामनाथ मोते यांनी सभागृहात ज्या विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या बाबतीत जे स्पष्टीकरण केलेले आहे त्या बाबतीत मी निदेश देतो की, जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी या सर्व प्रकरणाची व्यवस्थित चौकशी करुन त्या बाबतचा अहवाल येत्या सात दिवसात सभागृहासमोर ठेवावा. जर त्यांनी हा अहवाल ठेवण्यास विलंब केला तर त्या शिक्षणाधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

श्री.दिलीप कांबळे : होय.

---------

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : धारणी, जि.अमरावती येथील संजय गांधी योजनेचे नायब तहसीलदार व कर्मचाऱ्यांनी बोगस लोकांना पात्र दाखवून शासनाचे आर्थिक नुकसान करणे, याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"धारणी (जि.अमरावती) येथे शासनाकडून निराधार वृध्दांसाठी राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी योजना, वृध्दापकाळ योजना, श्रावणबाळ योजना, राजीव गांधी योजना इत्यादींमध्ये संजय गांधी योजनेचे नायब तहसीलदार व कर्मचाऱ्यांनी 25 ते 40 वयोगटातील 2 हजार बोगस लोकांना पात्र दाखवून शासनाचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान केले आहे. शेकडो बोगस लाभार्थ्यांना खोटे दस्तऐवज तयार करुन देणारे दहापेक्षा अधिक दलाल तहसील कार्यालयामध्ये सक्रीय आहेत. सबब, शासनाने या गंभीर प्रकरणाची दखल घेण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : झुडपी जंगल कायद्यातील जाचक अटींमुळे अपूर्ण राहिलेले विदर्भातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याची आवश्यकता, याबाबत श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"विदर्भात दहापेक्षा अधिक महत्त्वाकांक्षी सिंचन प्रकल्प असून ते झुडपी जंगल कायद्यातील जाचक अटींमुळे अपूर्ण राहणे, याविषयी सरकारमार्फत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, तसेच ते सर्व 20 प्रकल्प 20 वर्षांपेक्षा जास्त कालावधीचे असणे, त्यापैकी काही प्रकल्पांचे काम अपूर्ण असणे, अपूर्ण प्रकल्पात चंद्रपूर जिल्ह्यातील हुमन प्रकल्प, उमा प्रकल्प, राजुरा तालुक्यातील हत्तीटोला प्रकल्प, नागभीड तालुक्यातील गराडीनाला प्रकल्प, काळा गोटा प्रकल्प, गडचिरोली जिल्ह्यातील चेन्ना प्रकल्प, बुलबुली प्रकल्प या प्रकल्पांचा समावेश असणे, याशिवाय अन्य प्रकल्प झुडपी जंगली कायद्यान्वये कार्यान्वित होऊ शकलेले नाहीत, सदर प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व झुडपी जंगल कायद्यात जाचक अटी असल्यामुळे सर्व प्रकल्प कार्यान्वित करण्यास केंद्र सरकारकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी राज्य शासनाने शिफारस करावी, अशी मागणी मी शासनास या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

---------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : शासकीय विज्ञान संस्थेत गेल्या 30 वर्षांपासून पूर्ण वेळ संचालकांची नेमणूक न होणे याबाबत श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"विज्ञानाच्या विविध शाखांमध्ये संशोधनाला न्याय मिळावा यासाठी तत्कालीन ब्रिटिश सरकारने मुंबईत सन 1911 मध्ये विज्ञान संस्थेची स्थापना केली आहे. शिक्षणाचा दर्जा वाढावा, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली पाहिजे अशा प्रकारच्या घोषणा सातत्याने शासनाकडून दिल्या जातात. परंतु देशातील प्रतिष्ठित अशा आणि जेथे विद्यार्थ्यांच्या व अध्यापकांच्याही संशोधनाचा कस लागावा अशा शासकीय विज्ञान संस्थेत गेल्या 30 वर्षांपासून कायमस्वरूपी पूर्ण वेळ संचालकांची नेमणूक न होणे, कायमस्वरूपी संचालकाची फाईल गेल्या 10 महिन्यांपासून उच्च शिक्षण विभागात पडून असणे, सन 1973 ते 1982 व सन 1982 ते 1985 हा अपवाद वगळता त्यानंतर आतापर्यंत 12 व्यक्तींकडे प्रभारी संचालक अथवा अतिरिक्त कार्यभार सोपविला जात असल्याने संशोधनाबाबत भरीव कार्य होऊ शकलेले नाही. परिणामी संशोधक, विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली आहे असे समजते. तरी या प्रकरणी शासनाने त्वरित लक्ष घालून संस्थेला पूर्णवेळ व कायमस्वरूपी संचालक देण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

----

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : रुग्णालयातील खाजगी औषधे दुकानदारांना विशिष्ट कालमर्यादेपर्यंत परवाना देण्यात येणे याबाबत श्री. मितेश भांगडीया, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. मितेश भांगडीया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांतर्गत रुग्णांना स्वस्त दरांत औषधे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने राज्यातील 14 शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांतर्गत शासनामार्फत खाजगी दुकानदारांना सवलतीच्या दरात सामान्य जनतेला औषधे उपलब्ध करून देण्याच्या हेतूने दुकाने लावण्याची परवानगी देण्यात येणे, मात्र त्या दुकानदारांमार्फत औषधे मूळ किंमतीतच विक्री केली जात असणे, या रुग्णालयांतर्गत उपचार घेत असलेल्या गोरगरीब जनतेला याचा प्रचंड त्रास होत असणे, रुग्णालयातील या खाजगी औषधे दुकानदारांना जेनेरिक औषधे उपलब्ध करण्याबाबतचा केंद्र शासनाच्या धोरणांतर्गत सक्तीचे करणे अत्यावश्यक असून यामुळे सामान्य जनतेला औषधांच्या महागड्या किंमतीपासून थोडासा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. या औषधे दुकानदारांना एका विशिष्ट कालमर्यादेपर्यंत परवाना देण्यात यावा, जेणेकरून या औषधे दुकानदारांवर शासनाचा अंकुश राहील याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.**: अंगणवाडी शिक्षिकांना वेतन वाढ देणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"अंगणवाडी शिक्षिकांच्या प्रश्नावर माननीय महिला व बाल विकास मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी सभागृहात आश्वासन दिले आहे की, अंगणवाडी शिक्षिकांना वेतन वाढ देण्यात येईल. सन 2014 ची भाऊबीज देखील या अंगणवाडी शिक्षिकांना मिळालेली नाही. त्यामुळे त्या सातत्याने गेली दीड वर्षे संघर्ष करीत आहेत. मी या विशेष उल्लेखाद्वारे वेतनवाढीची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे व भाऊबीज भेट, 2014 देणे याकडे लक्ष वेधत आहे. "

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : शासनाने स्त्री आरोग्याबाबत विशेष कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी तातडीने करणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"वैद्यकीय क्षेत्रामध्ये स्त्री आरोग्याचा प्रश्न केंद्रबिंदू ठेवून जनजागृतीचे कार्यक्रम राबविण्यात आले. परंतु कुटुंब नियोजनाच्या साधनांच्या वापराबद्दल समाजामध्ये अद्यापही उदासीनता आहे. कुटुंब नियोजनाच्या साधनांचा योग्य वापर न झाल्यामुळे, अकुशल डॉक्टरांमुळे तसेच जाहिराती पाहून गर्भनिरोधक गोळ्यांचा भडीमार केल्याने गर्भपातांचे प्रमाण वाढले आहे. बदलती जीवनशैली, उशिरा होणारी लग्ने यामुळे व्यंधत्वाच्या तक्रारींचे प्रमाण एकीकडे वाढत असताना राज्यात गर्भपाताच्या प्रमाणामध्येही वाढ होत आहे. गर्भधारणेत येणाऱ्या समस्या, वारंवार करण्यात येणारे गर्भपात, अनैतिक संबंधामुळे होणारे गर्भपात, शिकाऊ डॉक्टरांकडून करण्यात येणारे गर्भपात यामुळे अनेक महिला दगावतात. सन 2013-14 मध्ये एकूण गर्भपातांची संख्या 30,117 तर गर्भपाताच्या दरम्यान झालेले मृत्यू 276 असल्याचे दिसून आले, यावरून शासन स्त्री आरोग्याबाबत उदासीन असल्याचे स्पष्ट होत आहे. स्त्री आरोग्याबाबतचा नवीन अहवाल आला आहे, त्याची दखल घेऊन आरोग्य विषयक दक्षता घेण्याच्या दृष्टीने सुरक्षित स्त्री आरोग्य याकडे लक्ष द्यावे. स्त्री आरोग्याबाबत विशेष कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, याबद्दल शासनाने तत्काळ निवेदन करावे."

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : मनमाड-नांदेड रेल्वे मार्गाचे द्विपदरीकरण करण्यासाठी शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणे याबाबत श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"देशामध्ये प्रवासाचे सुलभ साधन म्हणून रेल्वेकडे पाहिले जाते. देशभरात दिवसभरामध्ये लाखो लोकांना ने-आण करण्याचे काम रेल्वे करीत असते. रेल्वे वाहतुकीमुळे उद्योग क्षेत्रालाही फार मोठी चालना मिळते. देशाच्या व राज्याच्या विकासामध्ये रेल्वे सेवा ही मानबिंदू ठरत आहे. देशातील एकूण माल वाहतुकीमध्ये रेल्वेचा सिंहाचा वाटा आहे. रेल्वे प्रवास हा सुखकर व आरामदायी असल्यामुळे जनतेची रेल्वेला पहिली पसंती आहे. जगामध्ये भारतीय रेल्वे सेवा ही क्रमांक एकवरती आहे आणि याचा भारतीय जनतेला अभिमान आहे.

दरवर्षी रेल्वे अर्थसंकल्पामध्ये नवीन रेल्वे मार्गांची घोषणा व्हावी व ती कामे पूर्ण करावी अशी लोकांची अपेक्षा असते. मनमाड-नांदेड हा मराठवाड्यातील 5 जिल्ह्यांना जोडणारा रेल्वे मार्ग मराठवाड्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या मार्गावरून दिवसभरामध्ये मोठ्या संख्येने रेल्वेची ये-जा होते, माल गाड्यांचीही ये-जा होते, हा मार्ग एकेरी असल्यामुळे रेल्वे प्रवाशांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागते. मराठवाड्याच्या विकासाला आणखी गती देण्यासाठी मनमाड-नांदेड या रेल्वे मार्गाचे द्विपदरीकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो. विशेष उल्लेख मर्यादित स्वरूपात सचिवांकडून येत असतात. आपण दर दिवशी 6-7 ऐवजी 18-20 विशेष उल्लेख घेतो आणि तरीही सन्माननीय सदस्य विशेष उल्लेख मांडण्यासाठी हात वर करतात. मला देखील अवघडल्यासारखे होते. माझी विनंती आहे की, आपण आपले विशेष उल्लेख ठरलेल्या वेळेच्या आधी कार्यालयात आणून द्यावेत, त्यानंतर ते शॉर्ट लिस्ट हातील आणि मग मी त्या सन्माननीय सदस्यांना संधी देईन. मला रोज असे बोलावे लागू नये याची काळजी आपण घ्यावी.

----

..7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : नागपूर धंतोली येथील पटवर्धन ग्राऊंडवर शताब्दी भवन व शोध केंद्र उभारणे याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"सन 1991 हे वर्ष भारत सरकारने परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्ष घोषित केले होते. संपूर्ण देशभर शताब्दी वर्ष साजरे करण्यात आले. जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने नागपूर महानगरपालिकेने धंतोली येथील पटवर्धन ग्राऊंडवर शताब्दी भवन व शोध केंद्र उभारण्याची घोषणा केली होती व नागपूर महानगरपालिकेने सभागृहात ठराव करून जनभावनेचा सन्मान केला होता. नागपूर महानगरपालिकेने मौजा धंतोली येथील स.क्र.5/2, 6 व 7 आर.जी.2780 चौ.मी. रिक्रिएशन वापराकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 37 अन्वये फेर बदलाने सार्वजनिक/निम सार्वजनिक (डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन व शोध केंद्र) क्षेत्रात अंतर्भूत करून प्रस्तुत भूखंड नागपूर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करावा, अशी विंनती अनेक वेळा नागपूरचे माननीय जिल्हाधिकारी यांच्यामार्फत माननीय मुख्यमंत्री, प्रधान सचिव (नगरविकास), मंत्रालय, मुंबई यांच्याकडे केलेली आहे. पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्या वतीने देखील वारंवार नागपूर महानगरपालिका, माननीय मुख्यमंत्री, प्रधान सचिव (नगरविकास) यांच्याकडे मागणी केलेली आहे. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री महोदयांचा महानगरपालिकेकडून सत्कार करण्यात आला होता. तेव्हा मुख्यमंत्री महोदयांनी आश्वस्त केले होते. शासनाच्या उदासीनतेमुळे तब्बल 24 वर्षांचा काळ उलटूनही अद्यापपावेतो या प्रकल्पाची पूर्तता झालेली नाही. नगरविकास विभागाने ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास शताब्दी भवन व शोध केंद्राचे काम लवकरात लवकर पूर्ण होऊ शकेल. फक्त एका ना हरकत प्रमाणपत्रासाठी 24 वर्षे लागतात. ही परिस्थिती खरोखरच गंभीर स्वरूपाची असून या संदर्भात शासनाने तातडीने निवेदन करावे अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : पालघर जिल्ह्यातील तलासरीमध्ये आदिवासी विद्यार्थिनींसाठी इमारत बांधणे व त्यांना इतर सुविधा तातडीने देणे याबाबत श्री. आनंद ठाकूर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. आनंद ठाकूर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"पालघर जिल्ह्यातील तलासरीमध्ये आदिवासी विद्यार्थिनींसाठी शासनाची इमारत नसल्याने दोन वसतिगृहे भाड्याच्या इमारतीमध्ये चालत असून दोन्ही वसतिगृहांवर प्रकल्पाने एकाच अधीक्षिकेची नेमणूक केल्याने वसतिगृहाच्या मुलींवर लक्ष ठेवणे त्यांना अवघड जाणे, मुलींच्या 2 नंबर वसतिगृहामध्ये जागेअभावी दाटीवाटीने रहावे लागत असून मुलींना झोपण्यासाठी कॉटचा पुरवठा न केल्याने वसतिगृहातील 120 मुलींना जमिनीवरच झोपावे लागत असणे, आश्रमशाळा व वसतिगृहातील मुलामुलींचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याच्या घटना घडलेल्या असताना सुध्दा अधिकारी विद्यार्थिनींबाबत गंभीर नसणे, परिणामी विद्यार्थिनींमध्ये पसरलेले तीव्र भीतीचे व चिंतेचे वातावरण, तलासरी शासकीय मुलींच्या दोनही वसतिगृहांमध्ये कॉट व इतर सुविधा तातडीने पुरविण्याची गरज, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, सदर विषय सावर्जनिक महत्त्वाचा असल्याने विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास शिफारस करीत आहे."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO.VI OF 2015 (A BILL FURTHER TO AMEND THE NANDED SIKH GURUDWARA SACHKHAND SHRI HAZUR APCHALNAGAR SAHIB ACT, 1956.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

श्री. संजय राठोड (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 6 - नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब अधिनियम, 1956 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. संजय राठोड : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 6 - नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब अधिनियम, 1956 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय राठोड........

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांनी दिनांक 18 फेब्रुवारी, 2015 रोजी नांदेड शीख गुरूद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) अध्यादेश, 2015 प्रख्यापित केला आहे. उक्त अध्यादेशास राज्य विधानमंडळाची सहमती आहे. नांदेड शीख गुरूद्वारा सचखंड श्री.हजुर अपचलनगर साहिब अधिनियम, 1956 या अधिनियमाच्या कलम 6 मध्ये 17 सदस्यीय मंडळाच्या रचनेची तरतूद आहे. या अधिनियमानुसार मंडळाची मुदत 3 वर्षे एवढी आहे. दर तीन वर्षांनी नवीन मंडळ गठीत होणे अपेक्षित होते. तथापि, असे दिसून येते की, बऱ्याचदा काही-ना-काही कारणामुळे वाजवी वेळात मंडळ गठीत होऊ शकलेले नाही. अनेकदा निवडणूक झाल्यानंतरही नवीन मंडळ गठीत न केल्यामुळे मावळत्या मंडळाचा 3 वर्षाचा कालावधी पूर्ण होऊन सुध्दा ते कायम राहिले. बऱ्याच प्रसंगी काही कारणामुळे मंडळ बरखास्त करणे आवश्यक झाले होते. दिनांक 10 जुलै, 1997 रोजी महाराष्ट्र शासनाने मंडळ बरखास्त केले होते आणि तेव्हापासून अधिनियमातील तरतुदीनुसार मंडळ गठीत होऊ शकलेले नाही. मंडळ गठीत करण्यासाठी अधिनियमातील तरतुदीनुसार 17 सदस्यांची एकाच वेळी नियुक्ती करणे आवश्यक आहे. तथापि, काही कारणास्तव एकाच वेळी 17 सदस्य नियुक्त करणे शक्य होत नाही. त्यामुळे मंडळ गठीत करता येत नाही. याकरिता शक्य तितक्या लवकर मंडळ गठीत करता यावे या हेतूने एकूण सदस्यांच्या किमान 50 टक्के एवढे सदस्य नामनिर्देशित केलेले असतील किंवा निवडून दिलेले असतील तर राज्य शासनाला मंडळ गठीत करता येईल, अशी तरतूद करण्यासाठी सन 1956 च्या अधिनियमात सुधारणा करणे तसेच अशा प्रकारे गठीत केलेले मंडळ अधिनियमाच्या प्रयोजनार्थ वैध रितीने गठीत केलेले मंडळ मानण्यात येईल. अशीही तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे की, राज्य शासनाला मंडळाच्या सदस्यांमधून एक सदस्य मंडळाचा अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करता येईल.

सभापती महोदय, सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे, अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता): सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 6-नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब अधिनियम, 1956 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 21 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**उप सभापती :** आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न आणि विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव या दोन्ही प्रस्तावांवर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 6-नांदेड शीख गुरूद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब अधिनियम, 1956 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता शासनाने अध्यादेश काढला होता व त्या अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी हे विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आले आहे. या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, श्री हजुर अपचलनगर साहिब गुरूद्वारा हा जगभरातील शीख संप्रदायाच्या लोकांमध्ये श्रध्दास्थानी आहे. धार्मिक बाबीविषयी अध्यात्मिक अधिकार असणाऱ्या 5 तख्तांपैकी शीखांचे दहावे गुरु ,गुरु गोविंद सिंह यांनी या ठिकाणी अंतिम श्वास घेतलेला आहे. तत्पूर्वी सर्व शिखांनी दिलेल्या आज्ञेनुसार पवित्र ग्रंथ गुरुग्रंथ साहिब म्हणून ओळखला जातो. अशा महत्त्वपूर्ण गुरूद्वाराच्या प्रशासनासाठी हैद्राबाद विधानसभेने 1956 मध्ये कायदा केला होता.

सभापती महोदय, नांदेड शीख गुरूद्वारा सचखंड अधिनियम, 1956 अन्वये 17 सदस्यांच्या मंडळाच्या रचनेची तरतूद आहे. शासनाने नामनिर्देशित केलेले 2 सदस्य, राज्यातील शीखांमधून निवडलेले 3 सदस्य, हैद्राबाद व सिकंदराबाद या शहरातील शीखांमधून शासनाने नामनिर्देशित केलेला 1 सदस्य, मध्य प्रदेश राज्यातील शीखांमधून शिरोमणी गुरूद्वारा प्रबंधक कमिटी, अमृतसर यांनी नामनिर्देशित केलेला 1 सदस्य, संसदेच्या शीख सदस्यांनी त्यांच्यामधून निवडलेले 2 सदस्य, शिरोमणी गुरूद्वारा प्रबंधक कमिटी यांनी नामनिर्देशित केलेले 3 सदस्य, प्रमुख खालसा दिवाण, अमृतसर यांनी नामनिर्देशित केलेला 1 सदस्य, सचखंड हजुरी खालसा, नांदेड यांनी नामनिर्देशित केलेले 4 सदस्य, अशी मंडळाची रचना आहे.

सभापती महोदय, या मंडळाची मुदत 3 वर्षाची असून दर 3 वर्षांनी निवडणूक झाल्यानंतर नवीन मंडळ गठीत करणे अपेक्षित आहे. परंतु, 20 वर्षे हा प्रश्न प्रलंबित पडलेला आहे. हे मंडळ आतापर्यंत गठीतच झालेले नाही. यापूर्वी न्यायमूर्ती जे.एच.भाटिया यांची एक समिती गठीत करण्यात आली होती. भाटिया समितीने ज्या काही शिफारशी केल्या होत्या, त्यापैकी या विधेयकात एकाचाही समावेश केलेला नाही. या समितीच्या शिफारशी राज्यासाठी आणि नांदेड गुरूद्वाराच्या

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.........

प्रशासनासाठी महत्त्वाच्या आहेत. आमची अशी मागणी आहे की, नांदेड गुरूद्वारा मंडळाची नियुक्ती करण्याबाबत सुधारणा व्हाव्यात.

सभापती महोदय, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीने दिनांक 8 ऑगस्ट, 2014 रोजी शासनाला आपला अहवाल दिलेला आहे. समितीने 1956 चा आंध्र प्रदेश विधानसभेने केलेला कायदा कालबाह्य ठरविला असून सुधारित कायद्याची सूचना केली आहे. पूर्वी 17 सदस्यांची समिती होती. त्याऐवजी 21 सदस्यांची समिती करावी, अशी एक शिफारस आहे. तीच आमची देखील सुधारणा आहे. 9 प्रतिनिधी हे नांदेड मधील असावेत, 2 सदस्य महाराष्ट्र शासनाने सुचविलेले, महाराष्ट्रातील इतर शहरांमधील असावेत, अशा ज्या तरतुदी भाटिया समितीने सुचविल्या आहेत, त्यांचा अंतर्भाव या विधेयकात असण्याची आवश्यकता होती. म्हणून मी आपल्या माध्यमातून विनंती करतो की, हे विधेयक 21 सदस्यांच्या संयुक्त समितीपुढे पाठवावे.

सभापती महोदय, यामधील अनेक गोष्टींबाबत विरोधाभास आहे. नांदेड सचखंड गुरूद्वारा प्रशासनाच्या बाबतीत चंदीगडहून आदेश होत आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, आम्ही ज्या काही सुधारणा या विधेयकाला सुचविलेल्या आहेत, त्या सुधारणा विचारात घेता, हे विधेयक संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठवावे. एवढी विनंती करुन मी थांबतो.

-------------

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरनाथ राजूरकर (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, वि.स.वि.क्र.6 ला विरोध करण्यासाठी आणि या विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी आणण्यात आलेल्या विधेयकाला आमचा पूर्ण विरोध आहे. त्यामुळे हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, सन 1956 चा कायदा फार जुना आहे मंडळाच्या निवडणुकीसाठी मराठवाड्यातील 8 जिल्हे आणि चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुका एवढा मतदारसंघ आहे. मुंबई किंवा महाराष्ट्रातील अन्य भागातील सर्व शीख बांधवांना यामध्ये भाग घेता यावा, यासाठी आघाडी शासनाने भाटिया यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली होती. श्री.यु.पी.एस.मदान साहेब हे त्या समितीचे सदस्य होते. या समितीने केलेल्या शिफारशी जशाच्या तशा मान्य करुन हे विधेयक पुन्हा आणावे, अशी मी विनंती करतो आणि थांबतो.

------------

यानंतर श्री.वि.खर्चे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री): सभापती महोदय, 1956 मध्ये हैद्राबाद निजाम ॲक्ट नुसार त्या कालखंडात गुरुद्वारा अस्तित्वात आले. त्यानंतर 1960 मध्ये महाराष्ट्र राज्य स्वतंत्र झ ाले. तेव्हा पासून आजतागायत हैद्राबाद निजामांचा कायदा अस्तित्वात होता. हा कायदा ॲबॉलिश करुन नवीन कायदा आणवा यासाठी राज्य सरकारकडून कार्यवाही करण्यात आली होती. न्यायमूर्ती भाटिया यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली होती. न्यायमूर्ती भाटिया यांनी ज्या शिफारशी केल्या आहेत, त्यापैकी बहुतांशी शिफारशी राज्य सरकारने स्वीकारल्या आहेत. शिफारशीच्या अनुषंगाने विधेयक आणले आहे, यामध्ये राज्य सरकारला फारसा वाव नाही, हे धार्मिक विधेयक आहे, यामध्ये ज्या कॅटेगिरी दिलेल्या आहेत, त्यानुसार अमृतसर सुवर्ण मंदिराच्या विश्वस्त मंडळाकडून चार सदस्य घेण्यात येणार आहेत.

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, अमृतसर सुवर्ण मंदिराच्या शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीचे चार सदस्य घेण्यात येणार आहेत. जी समिती आहे त्या समितीने एक कॅलेंडर प्रसारित केले आहे. बिअंतसिंग यांनी इंदिरा गांधीचा खून केला आहे, त्यांचा त्यांनी जयजयकार केला आहे, अशी संपूर्ण माहिती वर्तमानपत्रात आलेली आहे, सदर वर्तमानपत्र माझ्याकडे आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या समितीवर कोणाला पाठवावे व कोणत्या सदस्यांची नियुक्ती करावी याचा पूर्ण अधिकार अमृतसर येथील सुवर्ण मंदिराच्या विश्वस्तांना आहे. गुरुग्रंथ्स साहिबांचे धार्मिक सचखंड आहे. ते फक्त हिंदुस्थानसाठी मर्यादित नाही. जगभरातील शीख बंधू येथे येतात, त्यांचे ते श्रध्दास्थान आहे. त्यांचे मोजके श्रध्दास्थान आहे, त्यातील दुसऱ्या क्रमांकावर नांदेड येथील गुरुद्वारा आहे. ही केस सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेलेली आहे. हायकोर्टात पहिल्यांदा अपिल झाले व त्यांनी काही सूचना केल्या. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात गेल्यावर त्यांनी याबाबत समिती नियुक्त करुन त्यासंदर्भातील काही शिफारशी स्वीकाराव्यात अशी सूचना केली. न्यायमूर्ती भाटिया हे स्वतः शीख समाजाचे आहेत, शीख समाजाच्या व्यतिरिक्त दुसरा कोणीही त्यात नसेल अशा स्वरुपाची तरतूद पूर्वी होती व आता देखील ज्या शिफारशी करण्यात आल्या आहेत, त्यामध्ये आहे. फक्त प्रशासनिक अधिकारी सोडला तर यामध्ये शीखपंथीय असले पाहिजेत असे आहे. अमृतसर येथील सुवर्ण मंदिराचे सदस्य असतील तसेच मध्य प्रदेशामधून एक शीख

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

पंथीय, हैद्राबाद येथून एक शीखपंथीय, महाराष्ट्रातील गुरुद्धाराच्या माध्यमातून असणारे प्रतिनिधी व राज्य सरकारकडून नियुक्त केलेले दोन प्रतिनिधी. लोकसभेत खासदारांमधून जे शीखपंथीय खासदार निवडून आले आहेत, त्यांच्यामधून नियुक्त केलेले दोन प्रतिनिधी अशा प्रकारचे हे बोर्ड राहणार आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन धार्मिक भावनेने प्रतिनिधी निवडले जावेत, असा या मागील हेतू आहे. या विधेयकाचे प्रयोजन असे आहे की, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आजतागायत या विधेयकात दुरुस्ती झाली नव्हती. ती दुरुस्ती आता करण्यात येत आहे, आतापर्यंत हैद्राबाद निजाम ॲक्ट होता. नांदेड हा भाग त्यामध्ये समाविष्ट असल्यामुळे त्यावेळी हैद्राबादचे प्रतिनिधी अधिक संख्येने नियुक्त केले जात होते. आता नांदेड शहरातील चार सदस्य, शासनाने नियुक्त केलेले दोन सदस्य, अशा प्रकारे महाराष्ट्रातील किमान 9 ते 10 सदस्य या बोर्डावर नियुक्त करता येतात. गुरुद्धाराच्या माध्यमातून निवडले जात असले तरी ते आपल्या राज्यातील आहेत. त्यामुळे माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्यांचा जरूर विचार करण्यात येईल. पुढील काळात आणखी काही सुधारणा करण्याचा देखील विचार करता येईल. हे विधेयक धार्मिक आहे, यासंदर्भात शीख पंथीयांमध्ये अत्यंत तीव्र भावना आहेत. त्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे की, हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याचा आग्रह न धरता सदर विधेयक मंजूर करण्याची अनुमती सभागृहाने द्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, नांदेड शीख गुरुद्धारा या विधेयकावर सदस्य नियुक्त नियुक्त करणे हा विषय अत्यंत संवेदनशील आहे. मला असे वाटते की, गट नेत्यांची एक बैठक सभापती महोदय आपल्या दालनात घ्यावी. चर्चा करून हे विधेयक आपण उद्या चर्चेला घ्यावे. कायदा व सुवस्थेवरील चर्चा दोन आठवड्यापासून अपूर्ण आहे, आता पाच वाजले आहे. त्यावर अजून बरेच वक्ते बोलणार आहेत, या विधेयकाच्या अनुषंगाने गट नेत्यांची बैठक आपल्या दालनात घ्यावी, जेणेकरुन या विधेयकाबाबत एकमत होईल व हे विधेयक नंतर मंजूर करता येईल.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आजपर्यंत नांदेड शीख गुरुद्धारा सचखंड यावर हैद्राबादचा प्रभाव होता, हैद्राबादचा कायदा रद्द करुन महाराष्ट्राचा कायदा आपण करीत आहोत.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

यामध्ये कायद्याने तुम्हा आम्हाला कोणालाही समावेश करता येत नाही. यामध्ये सरदारजी शिवाय दुसऱ्या कोणाचीही नियुक्ती करता येत नाही. त्यामुळे या विधेयकाला उगाच विलंब लावणे योग्य होणार नाही. या लोकांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. हैद्राबादचा कायदा आणखी किती दिवस चालविणार आहात. सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्यांनी त्या द्याव्यात त्यावर विचार करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या अगोदर मंत्री महोदयांनी आमचे ऐकले नाही. हैद्राबाद निजाम यांनी 1956 मध्ये जो कायदा केला होता, त्या कायद्याबाबत न्यायमूर्ती भाटिया यांची समिती नियुक्त करण्यात आली होती. त्या समितीने तो कायदा कालबाह्य ठरविला असून नवीन शिफारशी केल्या होत्या.

**उप सभापती** : ठीक आहे, या विधेयकावर उद्या चर्चा घेण्यात येईल.

---

**भारतीय क्रिकेट टीमचे अभिनंदन**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आनंदाची बातमी अशी आहे की, भारताने आज बांग्लादेश सोबत असलेली क्रिकेट मॅच जिंकली आहे व सेमिफाईनल मध्ये प्रवेश केला आहे. याबाबत भारतीय टीमचे मी अभिनंदन करतो.

**उप सभापती** : सभागृहाच्या वतीने भारतीय टीमचे अभिनंदन करण्यात येत आहे.

----

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : विद्यापीठ (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. V OF 2015**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.)

श्री. रवींद्र वायकर (उच्च व तंत्र शिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-5 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.रवींद्र वायकर : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-5 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

**उप सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती**: विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-5 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-5 संमत झाले आहे.

------

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**<u>सभागृहाच्या कामकाजाबाबत</u>**

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये दिलेला प्रस्ताव आता चर्चेला घेण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सकाळी म.वि.प. नियम 260 अन्वये राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात आली होती. या प्रस्तावावरील अपूर्ण राहिलेली चर्चा केव्हा घेण्यात येणार आहे ?

**उप सभापती :** मी आपल्याला सांगू इच्छितो की, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावरील चर्चेसाठी बराच वेळ देण्यात आला होता. आज सभागृहासमोर इतरही कामकाज आहे. मला योग्य वाटेल त्यावेळी मी कायदा व सुव्यवस्था या विषयावरील प्रस्ताव चर्चेला घेईन. आता माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात होईल. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित आपण या प्रस्तावावर बोलणार आहात काय ?

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. अशासकीय कामकाज उद्या सकाळी घेतले तर बरे होईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्था या विषयावरील प्रस्ताव लॅप्स झाला काय ?

**उप सभापती :** मी आपल्याला सांगू इच्छितो की, मला योग्य वाटेल त्यावेळी मी कायदा व सुव्यवस्था या विषयावरील प्रस्ताव चर्चेला घेईन. परंतु, सन्माननीय सदस्य एक-एक तास बोलणार असतील तर इतर सन्माननीय सदस्यांनी काय करावयाचे ? मी योग्य वेळी कायदा व सुव्यवस्था या विषयावरील प्रस्ताव चर्चेला घेईन.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांचा प्रस्ताव आहे. माननीय विरोधी पक्षनेते सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे हा प्रस्ताव उद्या घेण्यात यावा.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी या प्रस्तावावर बोलणार आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसतील तर मंत्री महोदयांना सभागृहात बोलविण्यात यावे, असे विरोधी पक्षातर्फे नेहमी सांगितले जाते.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते मीडियाला बाईट देण्यासाठी गेलेले आहेत, ते दोन मिनिटात सभागृहात येतील. मी या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करणार आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, त्यासाठी आमची हरकत नाही. परंतु सभागृहात 8-8 मंत्री उपस्थित असताना त्याच विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित असले पाहिजेत, असा विरोधी पक्षातर्फे आग्रह धरला जातो. त्यामुळे त्यांनी देखील काळजी घ्यावी. काल यांनीच हरकत घेतली होती.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्ही अमुक विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित असले पाहिजेत, असा आग्रह धरला नव्हता.

**तालिका सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते सभागृहात उपस्थित नाहीत. मग म.वि.प. नियम 260 अन्वये दाखविण्यात आलेला पुढील प्रस्ताव चर्चेला घ्यावयाचा काय ?

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करणार आहे. माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय गट नेत्यांनी मला तसे सांगितलेले आहे. शासनाची या प्रस्तावावर चर्चा करण्याची तयारी नाही काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, शासनाची या प्रस्तावावर चर्चा करण्याची तयारीआहे. परंतु, काल सभागृहात 6 राज्यमंत्री आणि 2 कॅबिनेट मंत्री उपस्थित असताना यांनीच हरकत घेतली होती. माझे एवढेच म्हणणे आहे की, यापुढे तुम्हीही हरकत घेऊ नका, आम्हीही हरकत घेणार नाही आणि चर्चा सुरु होईल. ज्यावेळी तुम्ही हरकत घेता त्यावेळी आम्ही तुमचे म्हणणे ऐकून घेतो. तुम्हीही हरकत घेऊ नका, आम्हीही हरकत घेणार नाही, एवढेच माझे म्हणणे आहे. सभागृहात 8-8 राज्यमंत्री उपस्थित असताना हरकत घेणे बरोबर आहे काय ? सभागृहात एक कॅबिनेट मंत्री उपस्थित असले तरी ती शासनाची सामूहिक जबाबदारी आहे. काल सभागृहात 8 मंत्री उपस्थित असताना यांनीच हरकत घेतली होती. सभागृहात दुष्काळाच्या प्रस्तावावर चर्चा सुरु

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे........

होणार आहे आणि माननीय विरोधी पक्षनेते मीडियाला बाईट देण्यासाठी गेलेले आहेत. मग दुष्काळाच्या प्रस्तावावरील चर्चा महत्वाची आहे, का मीडिया महत्वाचा आहे का ?

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी जी सूचना केली ती योग्य आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांचा आक्षेप आहे काय ? त्यांची हरकत असेल तर मी खाली बसतो.

श्री.एकनाथराव खडसे : माझी कोणतीही हरकत नाही. तुम्ही सुद्धा हरकत घेऊ नका. आपण हरकत घेतली तर मी तुम्हाला याची आठवण करुन देईन.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी जी सूचना केली ती योग्य आहे. त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेते आल्यानंतर...

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करण्यास परवानगी दिलेली आहे. आता त्यांनी प्रस्ताव मांडावा.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा असणे

**मु.शी.:** मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा असणे या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, सुनिल तटकरे, अशोक ऊर्फ भाई जगताप, हेमंत टकले, जर्नादन चांदूरकर, सतिश चव्हाण, ॲड.हुस्नबानू खलिफे, सर्वश्री विक्रम काळे, आनंदराव पाटील, जयंत पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे, अमरनाथ राजूरकर, अब्दुल्ला खान दुर्राणी, प्रकाश गजभिये, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यात विशेषतः मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात दुष्काळ आणि तीव्र टंचाईची परिस्थिती निर्माण होणे, सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा आणि अवेळी व अल्प पर्जन्यामुळे भूजल पातळीत मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेली घट, गोदावरी नदीखोऱ्यातील पाणी अडविण्याचे नियोजन नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्राच्या वाट्याचे पाणी आंध्र प्रदेशात वाहून जाणे, मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात सिंचनाचा अनुशेष दरवर्षी वाढत असणे, अनेक सिंचन प्रकल्प प्रशासकीय मान्यतेस्तव मंत्रालयीन पातळीवर प्रलंबित असणे, सिंचन क्षेत्रात वाढ करण्यासाठी शासनाने कोणतीही ठोस उपाययोजना न करणे, सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणा यामुळे वैफल्यग्रस्त शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करणे, माहे ऑक्टोबर, 2014 ते फेब्रुवारी, 2015 दरम्यान 362 शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, अल्पशिक्षित, अल्पभुधारक आणि कोरडवाहू शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या होणे, दुधासह कापूस, सोयाबीन यासह अनेक पिकांचे गडगडलेले भाव, यामुळे आर्थिक विवंचनेत शेतकरी सापडणे, शेतकरी कुटुंबाचे अर्थकारण बिघडल्यामुळे अनेक उपवर मुलींचे विवाह लांबणीवर पडणे, घरातील मुलांचे शिक्षण बंद पडून अनेक कुटुंबांवर मजुरीसाठी स्थलांतरित होण्याची आलेली वेळ, शेतकरी आत्महत्येसंदर्भात शासनाकडून कोणत्याही ठोस उपाययोजना करण्यात न येणे, सरासरी दररोज

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.........

दोनपेक्षा अधिक शेतकरी आत्महत्या करणे, गारपीट आणि वादळी पावसामुळे आलेले पीकही वाया जाणे, यावर झालेल्या खर्चामुळे शेतकऱ्यांच्या कर्जात मोठी वाढ होणे, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी शासनाने अद्यापपर्यंत कर्जमाफीचे न स्वीकारलेले धोरण, मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्र या भागातील शेतकऱ्यांचे आत्महत्यासत्र थांबविण्याबाबत शासनाने करावयाची दीर्घकालीन उपाययोजना, शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेवून करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.....

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा मराठवाड्यात अलीकडच्या काळात सुरु झालेला विषय आहे. मराठवाडा मागील दोन वर्षे आणि यंदाच्या तिसऱ्या वर्षी दुष्काळाला सामोरा जात असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा ग्राफ अधिक वेगाने उंचावत आहे. मराठवाड्याच्या दृष्टीकोनातून राज्य सरकार दक्षता घेत असल्याचे दिसून येत नाही. आज मराठवाड्यात शेतकरी करीत असलेल्या आत्महत्यांबाबत विचार करण्याची वेळ राज्य सरकारवर आलेली आहे.

सभापती महोदय, दिनांक 17 सप्टेंबर, 1948 रोजी मराठवाडा महाराष्ट्रात विलीन झाला. निजामाच्या जोखडातून सुटून आम्ही महाराष्ट्रात विलीन झालो असा शब्दप्रयोग त्यावेळी केला गेला. आज खऱ्या अर्थाने या सरकारपेक्षा निजाम बरा होता की काय असा विचार करण्याची वेळ आमच्यावर आली आहे. सरकारच्या प्रतिनिधींनी हा विषय गांभीर्याने घेतला पाहिजे.

सभापती महोदय, केळकर आणि दांडेकर समितीचे निष्कर्ष तसेच 'इकॉनॉमिकल सर्व्हे ऑफ महाराष्ट्र' या पुस्तिकेतील माहिती आणि नेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचा परामर्श घेतल्यानंतर जे चित्र समोर उभे राहिले आहे ते मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो. लहान व कुटीर उद्योग महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात केवळ 7.52 टक्के, विदर्भात 12.45 टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रात 80 टक्के आहेत. मोठे उद्योग उद्योग महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात केवळ 11 टक्के, विदर्भात 14 टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रात 75 टक्के आहेत. दरडोई उत्पन्न मराठवाड्यात 60,103 रुपये, विदर्भात 65,502 रुपये आणि उर्वरित महाराष्ट्रात 1,05,488 रुपये एवढे आहे. आज मराठवाड्यातील दरडोई उत्पन्न 47 हजारापेक्षा कमी झालेले आहे.

सभापती महोदय, परकीय गुंतवणूक महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात केवळ 2 टक्के, विदर्भात 8 टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रात 90 टक्के आहे. हा आलेख पाहता पुढील चार-सहा महिन्यात विदर्भात आमूलाग्र बदल दिसून येतील. परकीय गुंतवणूक विदर्भात 15 ते 20 टक्के वाढेल आणि विदर्भाची टक्केवारी अधिक पुढे जाईल. परंतु मराठवाड्यात परकीय गुंतवणूक वाढण्याची शक्यता नाही. हे पाप यांच्याकडून होणार नाही......(अडथळा)...तुमच्याकडून आमच्याकडून अशा कॉमेंट्स करु नका. बाहेर तुम्ही कॉमेंट्स केल्या की विरोधी पक्षाला गप्प केले म्हणून छापून येते. जे काही बोलायचे असेल ते उठून बोला, बसून बोलू नका.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, माझा माननीय सदस्यांच्या म्हणण्याबद्दल आक्षेप असा होता, त्याबाबत मी उठून बोलणे आवश्यक होते. माननीय सदस्य म्हणाले की, तुमच्याकडून अन्याय झाला. मराठवाड्यात फक्त 2 टक्के परकीय गुंतवणूक आली. यांच्याकडून हे पाप होणार नाही. याचा अर्थ चुकीचा होतो. मागील सरकारने अन्याय केला, तुम्ही करु नका. माननीय सदस्यांनी जे वाक्य उच्चारले त्याचा अर्थ काय अभिप्रेत होतो हे त्यांनी पहावे.

श्री.अमरसिंह पंडित : मंत्री महोदयांनी चेष्टा करण्यापेक्षा माझ्या बोलण्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय सदस्य सदनाचे सदस्य असले तरी प्रस्ताव मांडत असताना ते मराठवाड्याच्या गंभीर समस्येकडे सभागृहाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहेत, मराठवाड्याचा नागरिक या नात्याने व्यथा व्यक्त करीत आहेत. त्यांच्या वक्तव्याबद्दल अनर्थ काढणे चुकीचे आहे.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) :** कोणीही बसून बोलू नये आणि माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी बसून बोलले गेल्यास त्याची दखल घेऊ नये.

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जे वाक्य उच्चारले आहे त्याचा अर्थ काय होतो हे त्यांनी चेक करुन घ्यावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रस्ताव मांडताना जे काही भाष्य करीत आहेत त्याबद्दल आक्षेप असतील तर उत्तराच्या भाषणात ते खोडून काढण्याची मंत्री महोदयांना संधी आहे. असे असताना माननीय सदस्यांना भाषण करण्यामध्ये अडथळा निर्माण करणे चुकीचे आहे. आपण माननीय सदस्यांना संरक्षण दिले पाहिजे आणि मंत्री महोदयांना समज दिली पाहिजे.

**तालिका सभापती :** कोणीही बसून कॉमेंट्स करु नयेत आणि माननीय सदस्यांनी अशा कॉमेंट्सकडे लक्ष देऊ नये.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : परकीय गुंतवणुकीचे प्रमाण महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात केवळ 2 टक्के, विदर्भात 8 टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रात परिणामकारक वाढल्याचे दिसून येते. दुर्दैवाने महाराष्ट्राचा विचार करायला या मंडळींना वेळ आहे की नाही अशी शंका वाटू लागली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्याबाबत बोलायचे झाले तर ऑक्टोबर, 2014 ते फेब्रुवारी, 2015 या काळात 362 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. 2014 मध्ये मराठवाड्याच्या तुलनेत विदर्भात 362 पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

सभापती महोदय, टाटा इन्स्टिटट्यूट ऑफ सोशल सायन्सेस या संस्थेने शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात शासनाला एक अहवाल सादर केला आहे. या अहवालामध्ये नापिकी, उत्पादन मूल्यापेक्षा कमी बाजारमूल्य, त्यामुळे तोट्यात गेलेला शेती व्यवसाय ही दोन मुख्य कारणे आढळल्याचे नमूद केले आहे. 70 टक्के शेती कापूस उत्पादक आहे याची शासनाने नम्रपणे नोंद घ्यावी. मी डिसेंबरच्या अधिवेशनात हा विषय उपस्थित केला होता. मराठवाड्यातील कर्ज देणाऱ्या बँकाची मर्यादा कमी झालेली आहे. मराठवाड्यात प्रामुख्याने आयसीआयसीआय बँक, आयएफसीआय बँक, ॲक्सीस बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बरोडा या बँकांचा उल्लेख करावा लागेल. डीएनबीसीमध्ये पाहिले तर या बँकांचा सीडी रेश्यो 80 ते 82 टक्क्यापर्यंत गेला आहे.

नंतर 2जे.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

त्या बँकांनी आज पर्यंत लोकांकडून रूपये 600 कोटीचे डिपॉझिट गोळा केले आहे. त्यांनी आता पर्यंत फक्त 12 ते 14 कोटी रूपयांपर्यंतच कर्ज वितरित केले आहे. आम्ही त्यांच्याकडे सीडी रेशिओ चेक करता की नाही अशी विचारणा केली होती. डीएलबीसी मध्ये ही बाब माननीय जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली असता त्यासंबंधी देखील त्यांच्या मनात कुठलही भीती नव्हती. त्यांच्यावर कुणाचाही अंकुश नाही. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले की, आम्ही आमचा सीडी रेशिओ स्टेटला चेक करतो. 800 कोटी रूपये डिपॉझिटच्या रूपाने या दुष्काळी भागातून गोळा करायचे आणि कर्ज वितरण करत असताना सीडी रेशिओ स्टेट लेव्हलवर चेक करायचा हे कितपत योग्य आहे याचा देखील विचार करणे अतिशय गरजेचे आहे.

बीड, उस्मानाबाद, नांदेड, जालना या मराठवाड्यातील जिल्हा मध्यवर्ती बँका आजारी पडलेल्या आहेत. औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चांगली काम करीत आहे. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अतिशय व्यवस्थित काम करीत आहे. बीड बँक सुद्धा डबघाईस आलेली आहे. नागपूर, बुलढाणा, अकोला या तीन, चार सहकारी बँकांना थेट प्रधानमंत्री कार्यालयातून मदत मिळते. स्वतंत्र विदर्भाचा निर्णय व्हायचा आहे काय ? या तीन बँकांना आपण थेट मदत देत आहात. हा विषय विधानसभा सभागृहात देखील निघाला होता. त्यावेळी माननीय सहकार राज्यमंत्र्यांनी सांगितले की, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला लाइसेन्स नसल्यामुळे आम्ही त्यांना मदत देऊ शकत नाही. त्यांनी दुसऱ्या दिवशी सुधारणा केली व सांगितले की, या बँकेकडे लाइसेन्स आहे. परंतु, त्यावेळी त्यांनी मदत देणार आहे किंवा नाही हे मात्र सांगितले नाही. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला मदत देणे गरजेचे आहे. केवळ बीडच नाही, परभणी, नांदेड, उस्मानाबाद या बँकांना एक संधी देणे अतिशय गरजेचे आहे. खानदेश, विदर्भ या भागातील बँकांना आपण 200 ते 250 कोटी रूपयांची मदत देऊ शकता मग मराठवाड्यातील बँकांसाठी आपण दुजाभाव कशासाठी करत आहात ? मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा संसार आपल्याला पुन्हा नीट उभा करावयाचा असेल तर उद्याचा हंगाम सुरू होण्याआधी, पावसाळा सुरू होण्यापूर्वी मराठवाड्यातील सहकारी बँकांना अर्थसहाय्य करण्यासंबंधातील धोरण आखणे किंवा निर्णय घेणे अतिशय गरजेचे आहे. हा विषय एवढ्या पुरताच मर्यादित आहे असे नाही.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

7 कि.मी.च्या परिसरामध्ये किमान 1 बँक असणे आवश्यक आहे, अशा प्रकारचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतल्याचे मी मध्यंतरी वर्तमानपत्रात वाचले. परंतु, दुर्दैवाने आपण मराठवाड्यातील बँकेचे ॲव्हरेज पाहिले तर साधारणपणे 20 कि.मी.पेक्षा अधिकचे अंतर येते. त्यामुळे बँक सांगते की, आमच्याकडे अधिक काम आहे. आमच्याकडे कर्मचारी कमी आहेत. आता वेळ कमी आहे. यात आमचा शेतकरी भरडला जात आहे. ही एक अतिशय महत्त्वाची बाब असून सरकारने त्याची नोंद घ्यावी. यासंबंधी देखील शासनाकडून मला उत्तर अपेक्षित आहे.

आमच्या बीड जिल्ह्यात मानव लोक ही एक नामांकित स्वयंसेवी संस्था असून या संस्थेने एक सर्व्हे केला आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यामध्ये सर्वात जास्त आत्महत्या होत आहेत. मी त्यांना विनंती केली की, गेवराई तालुक्यामध्ये जाऊन ज्या कुटुंबातील लोकांनी आत्महत्या केल्या आहेत त्यांना आत्महत्येचे कारण काय आहे ते विचारावे. त्यांनी प्रत्येकाच्या घरी जाऊन सर्व्हे केला. त्यावेळी त्यांच्या निदर्शनास आले की, बीड जिल्ह्यात मानव निर्देशांक हा सर्वात कमी आहे. येथे अशिक्षितांचे प्रमाण जास्त आहे. दळणवळणाची अपुरी साधने आहेत. मागील 25-30 वर्षात रस्त्यांची जी काही कामे झाली आहेत त्यानंतर कोणतीच कामे हाती घेण्यात आलेली नाहीत. आज रस्ते खराब झाल्यामुळे एस.टी.गाड्यांच्या फेऱ्या सुद्धा बंद झाल्या आहेत. मानव लोक या स्वयंसेवी संस्थेचे म्हणणे आहे की, आष्टी तालुक्यातील एका गावामध्ये सन 2013-14 मध्ये एकही लग्न झालेले नाही. एवढी वाईट अवस्था आहे.

आज मराठवाड्यातील मायग्रेशनचे प्रमाण वाढत चालले आहे. पूर्वी हे प्रमाण 37 ते 38 टक्क्यांवर होते. आज ते प्रमाण 60 ते 62 टक्क्यांवर गेले आहे, त्याला नेमके कारण काय आहे? कोणताही माणूस हौसेने मायग्रेशन करीत नाही. आज आमचा माणूस पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सांगली, सातारा, मुंबई येथे जात आहे. आज महानगरांमध्ये मायग्रेशन होण्याचे कारण काय आहे ? आज आम्ही पिंपरी-चिंचवड, कल्याण-डोंबिवली, सीबीडी बेलापूर येथे मराठवाड्यातील मजूर पाहतो. आज हा मजूर हौसेने येथे येत नाही. तो आपल्या लेकरा बाळांना गावाला सोडून येतो. तो फक्त आपल्या तान्हुल्याला घेऊन येतो आणि महानगरामध्ये राब-राब राबतो. पाऊस असला की, तो पाईपाखाली आश्रय घेतो, पुलाखाली आश्रय घेतो. ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

असे जीवन जगण्यासाठी कोणीही हौसेने येत नाही. आमच्या येथील मायग्रेशनचे प्रमाण वाढत चालले असल्यामुळे आज चिंता व्यक्त करण्याची व त्यावर चिंतन करण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, सन 1983 मध्ये राज्य शासनाने दांडेकर समिती नेमली. या समितीने मराठवाड्यातील सहाही जिल्हे अतिशय दुर्बल असल्याचा अहवाल दिला. सन 1992 मध्ये पी.सी.सरकार समिती नेमली. या समितीने देखील मराठवाड्यातील सर्व जिल्हे दुर्बल असल्याचे नमूद केले. सन 2007 मध्ये आर.राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली देशभरातील 100 गरीब जिल्ह्यांचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमण्यात आली. या समितीने देखील मराठवाड्यातील सातही जिल्हे अतिशय संवेदनशील जिल्हे म्हणून घोषित केले. या समितीने शेतीच्या संदर्भातील अभ्यास केला आणि त्याअनुसार त्यांनी अहवाल दिलेला आहे. नुकताच शासनाने श्री.विजय केळकर समितीचा अहवाल पटलावर ठेवला. त्यावर चर्चाही होऊ शकली नाही. पण या अहवालासंबंधी देखील कधी कधी शंका वाटते की, या समितीचा अहवाल मराठवाड्यासाठी होता की, विदर्भाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी होता. केळकर समितीच्या अहवालामध्ये मराठवाड्यातील अपूर्ण प्रकल्पांचा उल्लेख आहे. परंतु, या अहवालामध्ये विदर्भातील अपूर्ण प्रकल्प पूर्ण केले पाहिजेत असे नमूद केले आहे. आमचे दुखणे, आमच्या व्यथा आमच्या माणसाला कळल्या पाहिजेत. केळकर समितीचा अहवाल येतो. त्यावर डॉ.माधवराव चितळे यांचे लोकसत्तामध्ये स्टेटमेंट येते की,मराठवाड्यातील साखर कारखानदारी हद्दपार करावी. केळकर समितीचा अहवाल मराठवाड्यातील बॅकलॉग कॅलक्युलेट करण्यासाठी होता. त्यात लिहिले आहे की, विदर्भातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तसे करण्यास आमचे दुमत नाही. आपण मराठवाड्यातील प्रकल्पांसंबंधी काही बोलणार आहात की नाही ? परवाच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असताना मी विचारणा केली तेव्हा जलसंपदा विभागाला कामे पूर्ण करण्यासाठी 7000 कोटी रूपयांचा निधी देण्यात आला आहे असा उल्लेख माननीय मंत्र्यांनी केला



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

होता. त्यात मराठवाड्यातील एकही प्रकल्प नाही. आपल्या निकषामध्ये मराठवाड्यातील एकही प्रकल्प बसत नाही. 75 टक्के काम पूर्ण झालेल्या प्रकल्पांना आपण पैसे देणार आहात. दुधना, जायकवाडी हे 75 टक्के पूर्ण झालेले प्रकल्प आहेत. जायकवाडीचा दुसरा टप्पा अजूनही अपूर्ण आहे. तीच परिस्थिती दुधना प्रकल्पाची आहे. या प्रकल्पाची कामे वर्षानुवर्षे अपूर्णावस्थेत आहेत. जेव्हा पैसे देण्याची वेळ येते तेव्हा त्या प्रस्तावांवर नव्याने विचार करण्याची वेळ येते. तेव्हा त्या कामाचे अंदाजपत्रक 200 पट वाढलेले असते. कारण आपण 15 ते 20 वर्षानंतर पुन्हा त्याचे एस्टीमेट करीत असतो.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित.......

त्यामुळे मराठवाडयातील एकही प्रकल्प सुरु होईल की, नाही अशी शंका आम्हाला वाटू लागली आहे.

श्री. एकनाथराव खडसे (अडथळा) : केळकर समिती माजी माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण साहेबांनीच स्थापन केली होती.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेबांमुळेच तुमचे सरकार आले आहे. नुकताच केळकर समितीचा अहवाल आला त्यामध्ये मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्राचा तुलनात्मकदृष्टया अभ्यास केला तर मराठवाडयात विदर्भापेक्षा 16 टक्के दरडोई उत्पन्न कमी असल्याचे आढळून आलेले आहे. हेच प्रमाण उर्वरित महाराष्ट्रापेक्षा 34 टक्क्याने कमी आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येची जी काही मूळ कारणे आहेत त्यावर आपण बारकाईने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, जल युक्त शिवार योजनेमध्ये कमांडमधील गावांचा सुध्दा समावेश केला गेला नाही. कमांड म्हणायचे तरी कशाला हा आमच्या समोर प्रश्न आहे. आमच्या भागात सातत्याने 3 वर्षापासून दुष्काळ असताना आमच्या भागातील व्यवहारांना कमांड लागू असल्या कारणाने सामान्य व्यवहाराच्या दीड पटीने जमिनीचे व्यवहार करावे लागत आहेत. आमच्याकडे गेल्या 3 वर्षापासून पाणी मिळत नाही तरीही आमच्या येथे कमांड लागू आहे. पाणी देत असताना तुम्ही एकीकडे कमांडही म्हणता. काल झालेल्या गारपिटीची तुम्ही जी काही नुकसान भरपाई दिलेली आहे त्याबद्दल तुम्ही सांगता की, तुमचे क्षेत्र बागायती क्षेत्र नाही, जिरायत क्षेत्र आहे. त्यामुळे तुम्ही एक काही तरी म्हणा. तुम्ही बागायती म्हणत असाल तर बागायतीचे पैसे द्या. जिरायत म्हणत असाल तर अन कमांडचे प्रमाणपत्र द्या. त्यामुळे तुम्ही एक तरी काही तरी करा. तुम्ही कमांड लागू करुन जिरायती प्रमाणे नुकसान भरपाई देता. आमचे क्षेत्र कमांडमध्ये असेल तर बागायती प्रमाणे पैसे द्या. परंतु तुम्ही दोन्ही बाजूने ढोलके वाजवत आहात. चित भी मेरी, पट भी मेरी असे करु नका.

सभापती महोदय, कमांडच्या संदर्भात माननीय मंत्र्यांकडून सकारात्मक उत्तर येईल अशी अपेक्षा करीत असताना मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, कमांडमध्ये जल युक्त शिवाराच्या

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित.......

कामाच्या संदर्भात निर्णय करीत असताना त्या आराखडयात कमांडमधील कामे सुध्दा करण्याची परवानगी देणे गरजेचे आहे. नाला बांध बंदिस्ती, दुरूस्ती, सिमेंट बंधाऱ्याची सुध्दा कमांडमध्ये आपल्याला चांगली कामे करता येऊ शकतील. कमांडमध्ये वर्षातून एक दोन वेळेस पाणी येते आणि त्या कॅनॉलमधील जे वेस्ट वॉटर आहे, त्यावर जर सिमेंट बंधाऱ्याची कामे झाली तर या बंधाऱ्यामध्ये पावसाळा वगळून वर्षातून 8-9 वेळेस हा सिमेंट बंधारा पाण्याने भरेल. सिमेंट बंधारा पाण्याने भरला तर त्या भागातील आजूबाजूच्या भागातील वॉटर लेवल टेबल निश्चितपणे वाढल्याशिवाय राहणार नाही. सभापती महोदय, मला मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये हे अपेक्षित आहे की, या कमांडमध्ये केवळ जल युक्त शिवार योजनेचीच नाही तर जलसंधारणाची सुध्दा कामे करण्याचा निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय, मी सन 2005 मध्ये विधानसभेचा सदस्य होतो. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भातील कै.माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख साहेबांनी सांगितले होते की, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात उपाययोजनेचा भाग म्हणून सामूहिक विवाह सोहळे करीत असताना राज्य सरकारने भरभक्कम मदत दिली होती. सामूहिक विवाह सोहळे मोठया प्रमाणात घेतले जावे यासाठी त्या भागात काम करणाऱ्या संस्था आणि सामूहिक विवाह सोहळयामध्ये समावेश असलेले जे काही वर-वधू आहेत त्यांना सुध्दा बऱ्यापैकी सामूहिक विवाह सोहळयाच्या निमित्ताने मदत केली होती. त्यावेळेस विदर्भाच्या पॅकेजमध्ये त्याचा उल्लेख करून मदतही दिली होती. मी माननीय महसूल मंत्र्यांना पुन्हा एकदा विनंती करतो की, विदर्भाला सामूहिक विवाह सोहळयाच्या निमित्ताने जे काही पॅकेज दिले होते त्याच धर्तीवर मराठवाडयातील शेतकऱ्यांना मदत करण्याच्या हेतूने मराठवाडयाला एक पॅकेज देण्याच्या संदर्भात विचार व्हावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, या शासनाने ड्रिपसाठी 330 कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. जैन एरिगेशन ड्रिपसाठी एक हेक्टरला साधारणतः 1.20 लक्ष खर्च येतो. नेटाफेमसाठी 1 हेक्टर ड्रिपसाठी 1.47 लक्ष रूपये खर्च येतो. 330 कोटी रूपयामध्ये केवळ साडेसात हजार एकर जमिनीवर



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित.......

ड्रिप लागू शकणार आहे. यांनी काही दिले नाही म्हणून आम्ही तुमच्याकडे आशेने पाहतो आहोत.

मी माननीय महसूल मंत्र्यांना नम्रपणे विनंती करतो की, मराठवाडयातील शेतकऱ्यांना न्याय द्यावयाचा असेल तर विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत असताना जे पॅकेज विदर्भाला दिले होते व त्यासंदर्भातील को-ऑर्डीनेटींग ॲथोरिटी विभागीय आयुक्त होते व आयुक्तांच्या स्तरावरच त्याचे वितरण केले जात होते त्याच धर्तीवर मराठवाडयाला ड्रिपच्या संदर्भात को-ऑर्डीनेटींग ॲथोरिटी म्हणून विभागीय आयुक्तांकडे मराठवाडा पॅकेजच्या नावाखाली ड्रिपची सबसिडी देण्याच्या संदर्भातील घोषणा मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, 1 हजार कोटी रुपये जल युक्त शिवार योजनेला देण्याची घोषणा काल मंत्री महोदयांनी या सभागृहात केली होती. आपल्याला दर वर्षी 5 हजार गावे टंचाईमुक्त करावयाची आहेत. आपण जो आकडा सांगितला आहे ऐकायला फार मोठा वाटतो. 5000 गावांना आपण 1 हजार कोटी रुपये दिलेले आहे त्याचा आपण भागाकार केला तर साधारणपणे एका गावाला 2 लाख रुपये येतात. म्हणजे एका एकराला 100 रुपयांपेक्षा कमी पैसे येतात. आता 2 लाखामध्ये माती बंधारा सुध्दा होत नाही. एक सिमेंट बंधारा करावयाचा म्हटला तर त्याचे ई-टेंडरींग एस्टिमेट 22 लाखामध्ये जाते.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित..

आपण साधारणत: 450 ते 500 सिमेंट बंधारे बांधणार आहात. आपण मोठमोठ्या घोषणा केल्या परंतु ग्राऊंट रिॲलिटी काय आहे ते आपण पाहून घ्यावे. दोन लाख रुपयांमध्ये साधा माती बंधारा होत नाही तर सिमेंट बंधाऱ्याची काय अवस्था आहे ?

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.बबनराव लोणीकर हे मराठवाड्यातील आहेत. मी त्यांना विचारु इच्छितो की, आपण याचा विचारविनिमय करणार आहात की नाही ? भाऊंना मी खालच्या सभागृहात काम करताना पाहिलेले आहे. मला चांगले आठवते की, खानदेशमध्ये अवकाळी पावसामुळे केळी बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यावेळी आपण केलेले भाषण माझ्याकडे आहे. मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर भाऊंनी मंत्री महोदयांना निर्णय बदलण्यास भाग पाडले होते. आज त्यांच्यातील शेतकरी कुठे गेला आहे ?

सभापती महोदय, आम्ही मराठवाड्यातील आहोत म्हणून दुजाभाव केला जात आहे काय ? याच मराठवाड्याला ओलांडून आपणास पंढरीच्या विठ्ठलाच्या दर्शनास जावे लागते. मराठवाड्यास कोणी वाली आहे की नाही ?

सभापती महोदय, आम्ही काल अर्थसंकल्पात रेल्वेसंबंधीची तरतूद पाहिली. मराठवाड्यातील रेल्वेसाठी फक्त 67 कोटी रुपये दिलेले आहेत आणि बीड जिल्ह्याची मॅचिंग ग्रँट 144 कोटी रुपये आहे. मराठवाड्याचे नेतृत्व कमी पडत आहे काय ? पहिल्यापासून मराठवाड्यातील नेतृत्वावर अन्याय करण्याचे काम तुम्ही मंडळी करीत आला आहात. आपण आजची परिस्थिती सांगावी. रेल्वेचा एक किलोमीटर रुळ पुढे सरकत नाही. हा अर्थसंकल्प तीन महिन्यांचा नसून तो वर्षभराचा आहे. आपली अर्थसंकल्पीय भेट आता पुढच्या वर्षी होणार आहे. मराठवाड्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याचे पाप आपण करीत असाल तर मराठवाड्यातील जनता आपणास जाब विचारल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, शेतमालाच्या भावाबाबत नव्याने काही सांगण्यासारखी परिस्थिती नाही. आमच्याकडे 70 टक्के पीक खरीपाचे आहे. यापैकी 20 ते 22 टक्के लोक कापसाचा खोडवा घेतात. आम्ही सहा महिने कापूस पिकवीत नाही. आमच्याकडे खोडवा घेण्याची पद्धत आहे.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित..

आमच्याकडे ड्रीप लाईन असेल तर 30 मार्चपर्यंत कापूस घेतला जातो आणि एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात कापसाचा उपटा करण्यास सुरुवात करतो. आज या कापसाच्या पिकावर अवलंबून असलेला शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे. माननीय श्री.शरद पवार साहेब कृषी मंत्री होते त्यावेळी 45 ते 70 दिवसांपर्यंत कापसाला 7 हजार रुपये भाव मिळत होता. पाच हजाराच्याखाली कधीच भाव मिळाला नाही. आज कापसाला एका क्विंटलला चार हजार रुपये देखील भाव मिळत नाही. सीसीआयचा भाव 4 हजार रुपये होता, परंतु तो 3 हजार 950 रुपये करण्यात आला. आता वेचणीसाठी दिवसाला 200 ते 225 रुपये द्यावे लागतात. कारण आता कापूस मिळत नाही. मी मराठवाड्यातील दुष्काळाच्या संदर्भात पोटतिडिकीने बोलत असताना माननीय राज्यमंत्री महोदयांच्या चेहऱ्यावर विकृत आनंद मिळत असल्याचा भाव दिसत आहे. या पेक्षा महत्वाचा विषय आहे काय ? त्यांचा मराठवाड्याशी संबंध नाही काय ? माननीय राज्यमंत्री श्री.दादाजी भुसे यांचा मराठवाड्याशी संबंध नाही, अशातऱ्हेने ते बोलत आहेत. माननीय राज्यमंत्री श्री.विजय शिवतारे यांचा मतदारसंघाशी काही संबंध नाही, कारण ते मुंबईत राहतात म्हणून आपण मराठवाड्याच्या प्रश्नावर एवढे जागरुक दिसत नाही.

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य हेत्वारोप करीत आहेत. मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, माझे शिक्षण मुंबईत झाले असले तरी गेल्या पाच वर्षात मी फक्त 13 वेळा मुंबईतील घरी गेलो होतो. माझ्या मतदारसंघातील लोकांना हे माहीत आहे. बाकी संपूर्ण वेळ मी मतदारसंघाची सेवा करण्यासाठी दिलेला आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी माझ्या संदर्भात जो चुकीचा उल्लेख केला तो रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावा.

सभापती महोदय, दिनांक 4 रोजी केकपांगरी संदर्भात बैठक बोलविली होती. परंतु एक अर्जंट काम आल्यामुळे ती बैठक पुढे ढकलण्यात आली. आज ती बैठक आहे आणि त्या बैठकीचे निमंत्रण आपणास मिळालेले आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी चुकीचे रेकॉर्डवर काही आणू नये.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, अधिवेशन संपल्यानंतर तातडीने बैठक घेण्यात येईल असे सांगण्यात आले होते. परंतु ती बैठक झाली नाही. आपण ती बैठक अधिवेशन काळात घेत आहात ही चांगली गोष्ट आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, ते मतदारसंघात राहतात

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित..

हा संशोधनाचा विषय आहे. ते मतदारसंघात गेले किंवा नाही याच्याशी माझा काही संबंध नाही. मी या ठिकाणी महत्वाचा विषय मांडत असताना मंत्री महोदयांची चर्चा सुरु होती आणि त्यांचे लक्ष वेधण्यासाठी मी बोललो.

सभापती महोदय, ज्या ठिकाणी एकरी 25-30 क्विंटल कापसाची सरासरी होती त्या ठिकाणी एकरी 40-42 किलोचे उत्पादन होत असेल त्या कापूस उत्पादक शेतकऱ्याला आपण काय देणार आहात ? दुर्दैवाने त्यांना काहीही मदत मिळत नाही. मी त्या संदर्भातील उपाययोजना करण्याच्या संदर्भात माझे मत मांडत आहे. आज सीसीआयची खरेदी 3950 रुपये आहे. 200 रुपयांपर्यंत वेचणी होत असेल तर शेतकऱ्याला रुपये 3200 ते 3300 पर्यंत देखील भाव मिळत नाही. शेतीची मशागत, एकूण खर्च, बी-बियाणे, फवारणी यावरील खर्च काढला तर शेतकऱ्यांच्या पदरात काय पडते याचा आपण देखील विचार करावा असे मला वाटते.

सभापती महोदय, सोयाबीनचा भाव सहा हजार रुपयांपर्यंत गेला होता. त्यानंतर 3400, 3200 आणि 2600 रुपयांपर्यंत आला. शेतीमालाच्या भावाच्या बाबतीत काय परिस्थिती निर्माण झालेली आहे ? यास केंद्राचे धोरण कारणीभूत आहे काय, राज्य शासनाचा या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे का, राज्य सरकार कुठे कमी पडते आहे काय, शेतीमालास भाव न मिळण्याची कारणे काय असू शकतात ? मराठवाड्यातच हे का घडते याचा निश्चितपणे शोध घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या पीक कर्जाच्या हप्त्यांचे पुनर्गठन करण्यात आले, हे मी मान्य करतो. शेतकरी एमटीओचे कर्ज मोटार आणि पाईपलाईनसाठी घेतात. शेती अपग्रेड करण्यासाठी तो कर्ज घेतो. शेतकरी होंडा सिटी गाडी खरेदी करण्यासाठी एमटीओचे कर्ज घेत नाही. शेतीतील साधनसुविधांचा अभाव असणाऱ्या गोष्टी घेण्यासाठी एमटीओचे कर्ज देण्यात येते. शेतामध्ये पिकले नाही तर तो विकणार काय ? मग तेच धोरण एमटीओच्या कर्जासाठी का लागू करण्यात येत नाही ? मराठवाड्यातील शेतकरी मागील तीन वर्षापासून दुष्काळाला सामोरा जात आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये मराठवाड्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित..

एमटीओच्या कर्जाबाबत निर्णय घेण्यात यावा. आम्ही कर्जाची माफी मागत नाही. आपण कर्जाची माफी देऊ श्‍कत नाही. माननीय श्री.शरद पवार साहेबच शेतकऱ्यांना कर्जाची माफी देऊ शकतात म्हणून त्यांना "जाणता राजा" म्हणतो. "जाणता राजा" म्हणजे काय, असा परवा आक्षेप घेण्यात आला होता, पण आक्षेप घेणारे सन्माननीय सदस्य आता सभागृहात दिसत नाही. आपण शेतकऱ्यांना माफी देऊ शकत नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित....

किमान सरकारने एमटीओच्या कर्जाच्या हप्त्याचे आणि व्याजाचे पुनर्गठन करावे. सभापती महोदय, सरकार अशाप्रकारे पुनर्गठन करणार आहे की नाही, या बाबतचा निर्णय मला माननीय मंत्र्यांच्या उत्तरातून अपेक्षित आहे.

सभापती महोदय, या संदर्भातील उपाययोजना करीत असताना जायकवाडी धरणातून समन्यायी पाणी वाटप करण्यासंदर्भातील मागणी सातत्याने होत आहे. दोन-अडीच वर्षांपासूनचा हा विषय आहे. हे काम आमच्या पक्षाचे सरकार करु शकले नाही तर, निदान आपण तरी करुन दाखवावे. महोदय, या संदर्भातील निर्णय करुन मराठवाड्याला दिलासा देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, अशी मी मागणी करतो. मग तेथील एमआयडीसी असेल किंवा अन्य काही बाबी असतील त्या दृष्टीने सकारात्मक कार्यवाही करावी. आज मराठवाड्यात अशी स्थिती आहे की, या वर्षी ऊस लावला तर दुसऱ्या वर्षी तो मोडणे परवडणारे नाही. बेणे, बी-बियाणे, खते, रासायनिक खते किंवा शेतीच्या मशागतीवरील खर्च मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. एक वर्षे पीक घ्यायचे आणि जायकवाडी धरणातून पाणी सोडले नाही म्हणून त्या भागातील शेतकऱ्यांनी ऊसाची शेती नांगरुन टाकायची काय ? मराठवाड्यातील सर्व बॅरेजेस भरायचे असतील तर सहा महिन्यांपूर्वी 223 एमएम क्यूबिक पाणी लागत होते. परंतु आज तेच बंधारे भरण्यासाठी केवळ 150 एमएम क्युबिक पाणी लागणार आहे. मराठवाड्यातील नेतृत्व कै.विलासराव देशमुख आणि माजी उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी आमच्या भागात अनेक बॅरेजेस उभे केलेले आहेत. त्या बॅरेजेसमध्ये पाणी आले तर मराठवाड्यातील शेती पुन्हा उभी राहून तो शेतकरी जगू शकेल. त्यामुळे त्या बॅरेजेसना पाणी सोडण्याबाबतचा निर्णय या चर्चेच्या माध्यमातून घेणे आवश्यक आहे.

महोदय, मध्यंतरी आम्ही 18 टीएमसी अंतर्गत असलेल्या प्रकल्पांच्या बाबतीत अर्धा-तास चर्चा उपस्थित केली होती. परंतु ती चर्चा होऊ शकली नाही. माननीय राज्यमंत्री श्री.विजय शिवतारे, आपण त्या चर्चेला उत्तर देण्यासाठी तयार होता, त्यामुळे आपल्याला हा विषय अवगत आहे. जायकवाडी खोऱ्यातील 22 टीएमसी तुटीचे खोरे आहे. 18 टीएमसी अंतर्गत असलेले अनेक अर्धवट प्रकल्प आहेत. काही ठिकाणी केटी वेअर आहेत, काही ठिकाणी पूर्ण न झालेले प्रकल्प, सुरु न होऊ शकलेले प्रकल्प असे अनेक अनेक आहेत. तत्कालीन जलसंपदा मंत्र्यांनी

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित....

18 टीएमसी पाणी उपलब्ध असल्याबाबतची घोषणा करुन निर्णय केला होता. महोदय, 22 टीएमसी तुटीचे खोरे असताना त्यावेळी त्या भागाला 18 टीएमसी पाणी मिळाले. सन्माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे या ठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांना सांगतो की, या छोट्याछोट्या प्रकल्पांसाठी भूसंपादन करण्याची गरज नाही. कारण हे 600 हेक्टरपर्यंतचे लहानलहान प्रकल्प आहेत. हे प्रकल्प जलसंधारण विभागाचे आहेत. बीड जिल्ह्यातील या छोट्याछोट्या प्रकल्पांना दीड, दोन, अडीच, तीन कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येणार नाही. या प्रकल्पांसाठी 100-150 कोटी रुपये देण्याची गरज नाही. केवळ दोन-तीन कोटी रुपयांमध्ये ही कामे पूर्ण होऊ शकतात. त्यामुळे शासनाने या प्रकल्पांसाठी पुरेसा निधी देऊन मराठवाड्यातील 173 प्रकल्प पूर्णत्वाकडे नेले तर एकट्या बीड जिल्ह्यातील 37 हजार एकर जमीन सिंचनाखाली येईल. त्यामुळे या दृष्टिकोनातून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य, आपण भाषण सुरु करुन 45 मिनिटे झालेली आहेत.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या प्रकल्पांच्या संदर्भात निर्णय करीत असताना त्या बाबतचा आराखडा तयार केलेला आहे. परंतु दुर्दैवाने त्या आराखड्यात मराठवाड्यातील 173 प्रकल्पांपैकी केवळ 28 प्रकल्पांचा समावेश झाला आहे. हे प्रकल्प अधिकारी स्तरावर झालेले आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या विषयी आपण बैठक घेऊन, त्यामध्ये सकारात्मक निर्णय करणार काय, हे मला उत्तराच्या भाषणातून अपेक्षित आहे. मंत्रिमंडळाने माननीय राज्यपालांच्या परवानगीसाठी प्रस्ताव पाठविला होता. परंतु दुर्दैवाने या संदर्भातील परवानगी मिळू शकली नाही. त्यामुळे या बाबतचा निर्णय करण्यासाठी मराठवाड्यातील प्रमुख लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन त्या प्रकल्पांना न्याय देण्याचा निर्णय घ्यावा. माझी तर मागणी आहे की, या बाबतचा खुलासा माननीय मंत्र्यांनी आपल्या उत्तरातून करावा.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शन प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना माननीय मंत्र्यांनी दमणगंगा-पिंजाळ व पारतापी-नर्मदा लिंक प्रकल्पाच्या बाबतीत उल्लेख केला होता. परंतु या बाबतीत शासन स्तरावर नेमकी काय कार्यवाही सुरु आहे

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित....

या बाबतची आम्हाला माहिती नाही. या विषयी सकारात्मक निर्णय झाला तर निश्चितच त्याचे परिणाम मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रामध्ये जे वाद होत आहेत, त्यातून मार्ग काढण्यासाठी नामी संधी असेल, असे मी नम्रपणे नमूद करतो.

सभापती महोदय, मराठवाड्यावर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भात काय, किती आणि कोठवर सांगावे ? डॉ.केळकर समितीच्या अहवालात उल्लेख आहे की, मराठवाड्यात भले मोठे प्रकल्प होत नसतील, कदाचित परकीय गुंतवणूक होत नसेल, पण पायाभूत सुविधांच्या अपग्रेडेशनसाठी स्कील्ड लेबर निर्माण करण्याचे काम मराठवाड्यातून सुरु करु शकलो तर ते मराठवाड्याच्या दृष्टीने अधिक सोयीचे होईल. मग तो आय.टी. च्या संदर्भातील निर्णय असेल किंवा अन्य बाबतचा मुद्दा असेल.

महोदय, मराठवाड्यामध्ये आयआयएम स्थापन करण्याबाबत आमची मागणी होती. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांच्यासह माननीय गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने केंद्रीय स्तरावर भेट घेतली होती. त्या शिष्टमंडळाने सांगितले होते की, आयआयएम स्थापन करताना मराठवाड्याचा विचार करावा. महोदय, ज्या दिवशी त्या शिष्टमंडळाने भेट घेतली त्याच्या दुसऱ्याच दिवशी मराठवाड्याच्या नाकावर टिच्चून नागपूरलाच आयआयएम स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. महोदय, मी विचारु इच्छितो की, आयआयएम सुरु करण्यासाठी या सरकारला नागपूरशिवाय अन्यत्र सुपीक जमीन किंवा सुपीक ठिकाण मिळू शकले नाही काय ? प्रत्येक वेळी जर असे होत असेल तर तुम्ही या मराठवाड्याला काय देणार आहात ? मराठवाड्यातील उरले सुरले प्रकल्प विविध कारणे सांगून बंद केले जातात. मराठवाड्यात इन्फ्रास्ट्रक्चरचा अभाव असल्याचे कारण सांगून मंजूर झालेले प्रकल्प सुध्दा अन्यत्र स्थलांतरित करावयाचे आहेत काय ?

सभापती महोदय, विदर्भातील वर्धा, नागपूर व बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सरकारने भरीव स्वरुपात मदत केली आहे. त्या बँकांना थेट पंतप्रधान कार्यालयातून 250 कोटी रुपयांचे शासकीय भाग भांडवल देण्यात आले. केंद्र सरकारकडून एका एका बँकेला 100 कोटी रुपये मदत देण्यात आली. महोदय, या ठिकाणी बँकांचा विषय निघाला आणि माननीय सहकार

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 17:50

श्री.अमरसिंह पंडित....

राज्यमंत्री येथून निघून गेले. महोदय, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला सरकारने कसल्याही प्रकारची मदत केली नाही. माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब, आपण बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला मदत न करण्याची कारणेच शोधत गेला तर पुढील पाच वर्षे सुध्दा मदत करु शकणार नाही. माननीय श्री.एकनाथरावजी खडसे, कदाचित तुमचा आमच्यावर राग असेल. परंतु मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी तुम्हाला मते दिली. त्या शेतकऱ्यांनी तुम्हाला मते दिली म्हणून तुम्ही या ठिकाणी राज्यकर्ते म्हणून बसला आहात. त्या शेतकऱ्यांनी तुम्हाला मते देऊन कोणते पाप केले ? आपला आमच्यावर राग असणे स्वाभाविक आहे. महोदय, आपण उस्मानाबाद, परभणी जिल्हा सहकारी बँकांना मदत केली नाही.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित ....

तुमच्या काळात हे सर्व केले आहे. तुम्ही थेट प्रधानमंत्री कार्यालयातून मदत देत आहात आणि मग बीडच्या संदर्भातील उदासीनता कशामुळे आहे, तुमचा जुना राग काढत आहात काय, सर्वजण मिळून बीडवरील राग काढत आहात काय ? बीडवरचा जुना राग काढत असाल तर ते योग्य नाही, ते आता तरी थांबवा.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण माझ्याकडे बघून बोलावे. एकमेकांमध्ये बोलू नये.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी मुद्यावरच बोलत आहे. माननीय मंत्र्यांचा राग असणे स्वाभाविक आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ संध्याकाळी 06.00 वाजेपर्यंत होती. पुढील आदेश होईपर्यंत सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी समजू शकतो की, काही जुना राग असू शकेल. परंतु किमान मराठवाड्यातील जे लोक खांद्यावर घेऊन नाचले आहेत, त्यांच्यावर तरी अन्याय करू नये, ही माफक अपेक्षा व्यक्त केली तर तो अतिशयोक्तीचा भाग होऊ नये. मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचा अध्यक्ष नेमू शकलेले नाहीत. अध्यक्ष पद कोणाला द्यायचे या संदर्भातील निर्णय केला, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचा अध्यक्ष नेमला तर कदाचित मराठवड्याचा असमतोल दूर होईल. मंडळाने पायाभूत सुविधा व मानव निर्देशांक वाढीसाठी 100 कोटी रूपयांची तरतूद करण्याची विनंती केली होती. परंतु दुर्दैवाने या अर्थसंकल्पामध्ये त्या संदर्भातील नोंद घेतली असल्याचे दिसून येत नही. वैधानिक विकास महामंडळ शासन स्तरावरील आयएएस, डेप्युटी कलेक्टर, कलेक्टर चालवित आहेत. मग ते तुम्हाला या संदर्भात काय मागणी करणार आहेत ? ज्याची मराठवाड्याचे दुःख, वेदना, जनतेच्या भावना यांच्याशी नाळ जुळलेली आहे अशी मराठवाड्यातील एखादी व्यक्ती सापडू शकत नसेल तर ते दुर्दैव आहे. आपण या संदर्भातील निर्णय लवकरच घ्याल अशी अपेक्षा आहे. आपण या संदर्भात आपल्या उत्तरात खुलासा करावा.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आपले भाषण सुरू करून 1 तास झाला आहे. आता आपण कन्क्लूड करावे. इतर सन्माननीय सदस्यांनाही भाषणे करायची आहेत.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाच्या संदर्भातील निर्णय लवकर घ्यावा अशी मी विनंती करतो. आमच्या येथील मनरेगाचे अनेक कामे थांबली आहेत. 44 हजार विहिरी करण्याचा संकल्प होता. परंतु, बीड जिल्ह्यात एकाही विहिरीचे काम सुरू नाही. किंबहुना मराठवाड्यातही विहिरीचे काम सुरू नाही. मनरेगा अंतर्गत रस्त्यांची, विहिरींची, बांध-बंदिस्तीची कामे होत नाहीत, ही कामे होणार नसतील तर आपणाला कोणती कामे करायची आहेत ? मनरेगाच्या कामांची मजुरी, कितीही काम करा 165 रूपयांपेक्षा अधिकची मजुरी मिळत नाही. माननीय केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सांगितले की, सातवा वेतन आयोग लागू व्हायचा आहे, कारण कर्मचारी संघटित आहेत. परंतु असंघटित मजुरांचे काय करणार आहात ? सातवा वेतन आयोग देण्याची आमची हरकत नाही. पण मनरेगा मजुरांना 165 रूपयांपेक्षा अधिकची मजुरी मिळत नाही. सभापती महोदय, एकाच समाजात राहणाऱ्या लोकांचे पगार दोन लाख रूपयांपेक्षा अधिक जाणार असतील तर ही विषमता कशी दूर करणार ? मजूर सकाळी 7 वाजता कामाला लागतो आणि संध्याकाळी 7 वाजता त्याच्या श्रमाप्रमाणे त्याने केलेल्या कामाचे पैसे त्याला मिळावेत, एवढी त्याची माफक अपेक्षा असते. परंतु तुम्ही कायदा करून 165 रूपयांपेक्षा जास्त मजुरी देणार नाही असे ठरविले आहे. सातवा वेतन आयोग लागू होणार आहे. मग आता दोन्ही वर्ग कुठे कुठे जाणार आहेत याकडे आपण पाहिले पाहिजे आणि त्या संदर्भात विचार करून ठरविले पाहिजे. हा फरक कशामुळे होणार आहे याबाबत तुम्हाला लोक विचारणार आहेत. माझी विनंती आहे की, मनरेगा अंतर्गत मराठवाड्यातील, बीड मधील कामांच्या संदर्भातील उल्लेख उत्तरात करावा. आपण मनरेगा अंतर्गत काम करणाऱ्या मजुरांची हजेरी वाढविणार का, विहिरींची, रस्त्यांची बंद कामे सुरू करणार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित ....

का, या संदर्भात उल्लेख उत्तरात आला पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे. आपण मला माझे मत मांडण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण येथेच संपवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे आणि इतर सन्माननीय सदस्यांनी निमम 260 अन्वये प्रस्ताव मांडला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सव्वा तास भाषण केले आहे. आपण चर्चेच्या संदर्भात वेळ ठरवून घ्यावा. आज चर्चा उत्तरासहित पूर्ण होणार आहे किंवा कसे याबाबत सांगावे. आम्ही सकाळपासून बसलो आहोत. आपण वेळ ठरवून घ्यावा.

**तालिका सभापती** : मी या संदर्भातील वेळ ठरवून सांगतो.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे भाषणासाठी उभे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सन्माननीय सदस्य श्री. ख्वाजा बेग बोलणार आहेत. आज प्रस्तावावरील चर्चा संपू शकते. मात्र चर्चा आज संपणार नसेल तर या संदर्भातील वेळ ठरवून घ्यावा. मागच्या आठवड्यातील प्रस्ताव देखील पूर्ण झालेला नाही, या आठवड्यातील प्रस्ताव सुध्दा पूर्ण होणार नाही. मागच्या आठवड्यातील नियम 260 च्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर अजूनही काही सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. आज देखील मराठवाड्याच्या प्रस्तावावर 1-2 सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. आपण आजच्या प्रस्तावावरील उत्तर उद्या ठेवावे. परंतु सन्माननीय सदस्यांची भाषणे आज संपवून घ्यावीत अशी माझी विनंती आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्र येथे दुष्काळ आणि तीव्र टंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. अपुरी सिंचन सुविधा व अवेळी अल्प प्रमाणातील पाऊस यामुळे भूजल पातळीत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व इतर अडचणींमुळे मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र येथे अत्यंत जीवघेणी परिस्थिती निर्माण झाली आहे. मरावाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र येथील दुष्काळ व तीव्र टंचाई याबद्दलचा प्रस्ताव आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी अत्यंत पोटतिडीकीने मराठवाड्याच्या व्यथा, वेदना, दुःख मांडल्या आहेत. मराठवाड्याचे अत्यंत भयावह चित्र असून ते महाराष्ट्राच्या वेशीवर टांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

साहजिकच, शेती, उद्योग, पिण्याचे पाणी, सिंचनाचे पाणी, सांस्कृतिक क्षेत्र, अशा बाबतीत जेव्हा भेदभाव केला जातो, तेव्हा कशा प्रकारची परिस्थिती निर्माण होते, याचे चित्र सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आपल्यासमोर आताच रेखाटले आहे. विदर्भाच्या संदर्भातही त्यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. ते खरेही असतील. आमच्या काही मित्रांनी वेगळ्या विदर्भाचे राज्य निर्माण करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु नाही ना, अशी शंकाही उपस्थित केली आहे. विदर्भाचे राज्य निर्माण व्हायचे ते होईलच, कुणी ते थांबवू शकणार नाही. पण एक गोष्ट निश्चित आहे की, मराठवाडयातील, विदर्भातील, उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची अवस्था एकसारखीच आहे. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, खानदेश, पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी तालुके हे सर्व एकाच नावेतील प्रवासी आहेत.

सभापती महोदय, कृषी विकास, औद्योगिक विकास यांच्याबाबतीत ज्यावेळी आपण बोलतो त्यावेळी एक सर्वसाधारण तत्त्व आपण लक्षात घेतले पाहिजे. ज्याला भूक असेल त्याच्या ताटात अगोदर वाढले पाहिजे, ज्याचे पोट भरलेले आहे, त्याच्या ताटात वाढण्याचा प्रयत्न होता कामा नये. ऑक्टोबर, 2014 ते फेब्रुवारी, 2015 या दरम्यान 362 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. उपवर मुलामुलींचे विवाह सोहळे लांबणीवर पडले आहेत. टंचाईसदृश परिस्थितीमुळे पोटापाण्याची व्यवस्था करण्यासाठी मराठवाडा आणि विदर्भातील जनता मुंबई, नागपूर, पुणे या महानगरांमध्ये स्थलांतरित झाली आहे आणि या स्थलांतरितांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. कारण, त्या ठिकाणी त्यांना काहीच मिळत नाही मग ते जाणार कोठे ? आपण मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे कोठेही गेला तर मराठवाड्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील कुटुंबे आपल्याला तेथे दिसून येतील. झाडाखाली, पुलाखाली, पाईपखाली, झोपडपट्टयांमध्ये ते आपल्याला दिसतील. मराठवाड्यातील जनतेच्या नशिबी हे जे बकालपण आलेले आहे, ते थांबले पाहिजे. शेतकऱ्यांची अवस्था चांगली झाली पाहिजे.

सभापती महोदय, मी तांत्रिक बाबींमध्ये शिरणार नाही. माझ्या मित्रांनी या सर्व बाबी मांडलेल्या आहेतच. परंतु, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी युध्द पातळीवर कोणते प्रयत्न शासन करणार आहे, याचा उलगडा झाला पाहिजे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनापासून या क्षणापर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत आपण सर्व चिंताग्रस्त आहोत, काळजी करीत आहोत.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

असे असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी युध्दपातळीवरुन काही करता येण्यासारखे असेल तर ते करण्याचा प्रयत्न सरकारने केला पाहिजे, ही आमची मागणी आहे.

सभापती महोदय, या चर्चेत सिंचनाचा मुद्दाही चर्चेला आला आहे. आपल्या राज्याचे सिंचनाचे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत फार कमी म्हणजे फक्त 17.50 टक्के एवढेच आहे. ही परिस्थिती गौरव करण्यासारखी नाही. राज्यातील अनेक धरणे वर्षानुवर्षे अपूर्ण आहेत. सिंचनासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद झाली, कोट्यवधी रुपये खर्च झाले, पण ही धरणे काही पूर्ण झाली नाहीत. नदी, नाले, धरणे, तलाव यामधील पाण्याचे जनावरांसाठी, माणसाच्या पिण्यासाठी, शेतीसाठी करावयाचे व्यवस्थापन याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाड्याचे मुख्य पीक कापूस हे आहे. मराठवाडा, विदर्भ आणि खानदेश येथील कापूस सी.सी.आय.कडून विकत घेतला जातो. यापूर्वी या राज्यात कापूस एकाधिकार योजना होती. परंतु, ती डबघाईला आल्यामुळे बंद पडली. त्यामुळे कापूस पिकविणाऱ्या या भागातील शेतकऱ्यांची अवस्था "ना घर का, ना घाट का," अशी झाली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सांगितले की, मराठवाड्यातील शेतकरी आपल्या मुला, मुलींची लग्ने करु शकत नाहीत. त्यामुळे सामूहिक विवाह सोहळ्यांची संख्या वाढत चालली आहे. विदर्भातही अशाच प्रकारचे सामूहिक विवाह सोहळे होतात. यासाठी सामाजिक न्याय विभाग आणि महिला व बालकल्याण विभागातर्फे मदत केली जाते. त्याच धर्तीवर मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील दुष्काळपीडित शेतकऱ्यांच्या मुला, मुलींच्या लग्न सोहळ्यासाठी देखील राज्य शासनाने मदत केली पाहिजे, अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या कर्जामध्ये वाढ होत चालली आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी सरकारने जे उदार धोरण स्वीकारले पाहिजे. परंतु, तसे स्वीकारताना दिसून येत नाही. उद्योगपतींच्या संदर्भात, उद्योगांच्या संदर्भात जे उदार धोरण शासनातर्फे स्वीकारले जाते, तेवढे उदार धोरण शेतकऱ्यांच्या संदर्भात दाखविले जात नाही, ही अत्यंत दु:खदायक बाब आहे.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांची कर्ज माफी केली पाहिजे. जेणेकरुन विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबू शकतील. सहकारी बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका, सावकार यांच्याकडून घेतलेले शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसलेले कर्जरुपी भूत उतरवून टाकण्याचा प्रयत्न शासनाने केला पाहिजे, अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, शासनाने अनुशेषासंदर्भात अनेक समित्या गठीत केल्या आहेत. दांडेकर समिती, सरकार समिती, केळकर समिती आणि राधाकृष्णन समिती शासनाने गठीत केल्या. या मधील पहिल्या तीन समित्यांमध्ये शेवटी 'र' आणि शेवटच्या समितीमध्ये सुरुवातीला 'र' आहेच. या समित्यांचे अहवाल एकदा सरकारने वाचावेत. परवाच केळकर समितीचा अहवाल सभागृहाला सादर करण्यात आला. त्याची चर्चा या सभागृहात होणे आवश्यक आहे. या अहवालामध्ये मराठवाड्याच्या बाजूने शिफारशी आहेत, विदर्भाच्या बाजूने आहेत, अशा प्रकारे गैरसमज निर्माण होत आहेत. ते दूर झाले पाहिजेत. या समित्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रासाठी विकास योजना राबविणे अत्यंत आवश्यक आहे. या समित्यांचे अहवाल कधी सादर होतात आणि कधी गडप होतात, हे कळतच नाही.

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

या समित्यांवर शासन कोट्यवधी रुपये खर्च करते. त्या समित्यांच्या उपयुक्ततेबाबत शासनाने विचार केला पाहिजे. ज्या उद्देशाने व हेतूने समित्या स्थापन करण्यात येतात, त्या समित्यांच्या सदस्यांकडून मोठ्या कष्टाने माहिती गोळा करुन शासनाकडे अहवाल सादर केला जातो व काही शिफारशी केल्या जातात. विकासाच्या संदर्भात किंवा दैन्य, दारिद्र्य व दु:ख दूर करण्याबाबत ज्या शिफारशी करण्यात येतात, त्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत, अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, जायकवाडी धरणातून अहमदनगर जिल्ह्यातील भंडारदरा धरणात पाणी सोडण्याबाबत अनेक वेळा आंदोलने झाली. कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली होती. मराठवाड्यात पाण्याची टंचाई आहे. मराठवाडा तहानलेला प्रदेश आहे. पाण्याअभावी तेथील जनावरे मरत आहेत, पिकांचे नुकसान होत आहे, म्हणून जायकवाडी धरणाचे पाणी भंडारदरा धरणात सोडले जावे असे ठरविण्यात आले तेव्हा त्या जिल्ह्यातील काही लोकांनी त्यासाठी विरोध केला. आम्ही आमच्या जिल्ह्याचे पाणी देणार नाही. आंदोलने केलीत, रास्ता रोके केला. आपल्या शेजारच्या जिल्ह्यातील शेतकरी अडचणीत आहे, त्यांना शेतीसाठी व इतर गोष्टींसाठी पाण्याची गरज असेल तर त्यांना पाणी देण्यास विरोध केला जातो, अशा प्रकारचे चित्र निर्माण होते. त्यामुळे महाराष्ट्र एकसंघ राहणार आहे काय ? अशा प्रकारची भीती निर्माण होते. याबाबत राज्य सरकारने अतिशय गंभीरपणे निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातून ही परिस्थिती कशी दूर होईल याकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. आपण मराठवाड्याला दोष देणार, मराठवाडा विभाग विदर्भाला दोष देणार, विदर्भ खान्देशाला दोष देणार असा प्रकार यापुढे चालणार नाही. समान दृष्टीकोन ठेऊन समन्यायी विकासाची वाटचाल सुरु केली तर कोणताही प्रदेश अशा प्रकारे आक्षेप घेणार नाही. ज्या प्रदेशाला आज गरज आहे त्यांना पाणी दिले पाहिजे.

सभापती महोदय, परवा मी औरंगाबाद येथे गेलो होतो, त्यावेळी मला पत्रकार मित्रांनी प्रश्न विचारला की, आयआयएम ही संस्था नागपूरला पळविण्यात येत आहे. मी त्यांना सांगितले की, औरंगाबादला देखील आयआयएम संस्था स्थापन झाली पाहिजे. नांदेड औरंगाबाद जेथे पाहिजे तेथे एक संस्था स्थापन करण्यात यावी, त्यामुळे शासनाचे काय बिघडते. ज्या ठिकाणी उच्च

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

शिक्षणाची गरज असेल, तेथे संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न राज्य व केंद्र सरकारने केला पाहिजे. मुख्यमंत्री महोदय नागपूरचे असल्यामुळे सर्व संस्था नागपूर येथे घेऊन जात आहेत, उद्योग तिकडे नेले, मिहान प्रकल्प नागपूरला नेला. आता मिहान प्रकल्पाचे काय हाल आहेत, याची आम्हाला चांगली जाणीव आहे. मुख्यमंत्री महोदय विरोधी पक्षात असताना त्यांनी मिहान संदर्भात किती वेळा सभागृहात भाषणे केली आहेत. आता मिहानची काय अवस्था आहे ? जेव्हा वेळ येईल तेव्हा त्यावर भाष्य करता येईल. मिहान प्रकल्प पूर्ण झालेला नाही, उद्योग आलेले नाहीत. "नाव सोनू बाई हाथी कथलाचा वाळा" अशी विदर्भाची परिस्थिती झालेली आहे. मराठवाड्यातील सिंचनाची अत्यंत भयानक अवस्था आहे, तेथील शेतकरी कर्जबाजारी आहे. विदर्भ, उत्तर महाराष्ट्रात देखील तीच परिस्थिती आहे. सर्व प्रदेशांचे दु:ख समान आहे. या समान दु:खांवर सहानुभूतीची, प्रेमाची व न्यायाची फुंकर मारण्याची गरज आहे. समतेची फुंकर शासनाने हळूवारपणे मारली तर निश्चितपणे मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र या प्रदेशातील दु:खी कष्टी शेतकरी, सर्व सामान्य जनतेला न्याय मिळेल. त्यामुळे शासनाने या सर्व प्रदेशावर सहानुभूती दर्शवावी अशी विनंती करतो. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल सभापती महोदयांचे आभार मानतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------------

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सभागृहात मांडण्यात आला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील माझा विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या तिन्ही प्रादेशिक विभागावर दुष्काळाची परिस्थिती ओढवली आहे. तेथे पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबत हा प्रस्ताव विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी मांडला आहे. एक काळ असा होता की, विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात अत्यंत चांगली धनसंपदा होती. आम्ही शाळेत शिकत होतो, शाळेला सुट्या लागल्यानंतर आम्ही मामाच्या गावाला जात होतो. तेव्हा एक गीत होते की, 'मामाच्या गावाला जाऊ या, आगीन गाडीत बसू या', सभापती महोदय, आपण देखील मामाच्या गावाला गेले असावेत. आपण सर्व शेतकऱ्यांची मुले आहोत. शेतात गेल्यावर दुपारच्या वेळी पाऊस पडलेला असायचा, विहिरी भरलेल्या असायच्या, विहिरीवर मोट चालत होती. त्यातून पाणी झुळूझुळू वाहत होते. त्या काळात फार श्रीमंती होती, असे मी म्हणणार नाही. शेतकऱ्याचे पोट भरावे इतके धान्य शेतात पिकत होते. निसर्गाची देखील त्यावेळी भरभरुन साथ होती. भरपूर पाऊस पडत होता. आमचे आजोबा गोष्ट सांगताना असे सांगत होते की, इतका पाऊस पडत होता की, नदीला पूर आला तर दोन-दोन दिवस शेतकऱ्यांना शेतामध्ये मुक्काम करावा लागत होता. गावातील नदी व ओढ्याचे पाणी ओसरत नव्हते. ही परिस्थिती मंत्री महोदय त्या काळात होती हे आपण देखील पाहिले आहे. हल्लीच्या काळात पूर तर लांबच राहिला आहे. आमच्या मुलांनी पूर कसा असतो, असे विचारल्यावर त्याला सिनेमा दाखवावा लागतो. चित्रामध्ये असलेला पूर त्याला दाखवावा लागतो. अशी परिस्थती निसर्गाने आपणा सर्वांवर आणली आहे. गेल्या तीन वर्षापासून सातत्याने जून महिना आला की, शेतकरी आकाशाकडे डोळे लावून सात तारखेची वाट पाहतो. आता निसर्गाचे चक्र विचित्र झाले आहे. मृग नक्षत्र कधी लागते व सात तारीख केव्हा येते याची लोक वाट पाहात होते. आता 7 जून, 7 जुलै व 7 ऑगस्ट आला तरी पावसाला सुरुवात होत नाही. यावर्षी पावसाला केव्हा सुरुवात होईल याची शाश्वती नाही. अशी भयानक परिस्थिती राज्यात निर्माण झाली आहे. या पूर्वी राज्यात 1972 मध्ये भीषण दुष्काळ पडला होता. आता त्यापेक्षाही वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे. ऋतूचा कालावधी बदलला आहे. पावसाळा हिवाळ्यात गेला, हिवाळा उन्हाळ्यात घुसला आहे. एका ऋतूने दुसऱ्या ऋतूवर आक्रमण

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे....

केले की, काय अशी परिस्थिती राज्यात निर्माण झाली आहे. पावसाचा लहरीपणा, गारपीट, अवकाळी पाऊस या सर्व प्रकारामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. याचे वर्णन मला असे करावेसे वाटते की, यामधून फार विदारक चित्र स्पष्ट होत आहे.

दुष्काळाच्या झळा लागूनी जळाला शेत मळा,
पाण्यासाठी टाहो फोडूनी सुकला ओला गळा,
डाळिंबाचे होऊनी हाल, द्राक्षबागही ती उखडली,
गहू होणे दूरच होते, मान मोडूनी बाजरी पडली.

सभापती महोदय, गव्हासारखे साधे पीक ज्याच्या आपण रोज चपात्या खातो. बाजरी ही अत्यंत हलक्या जमिनीवर येते, तिला भारी जमीन लागत नाही. कोठेही बाजरी टाकली तरी ती उगवते. असे हे हलके पीक आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे ऑनलेग आहेत. त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री ख्वाजा बेग आणि प्रकाश झांबड हे थोडक्यात आपले विचार मांडतील. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण होईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या शुक्रवार, दिनांक 20 मार्च, 2015 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरले.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 30 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 20 मार्च, 2015 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION